साप्ताहिक
# माणूस

शनिवार । १९ जून १९७६ । एक रुपया

इनामदारांची लाल किल्ल्यातील
अभियोगाची कहाणी संपत आली.
पाठोपाठ :एक वेगळी धक्कादायक कादंबरी

## वात्स्यायन

तिसऱ्या शतकात भारतात होऊन गेलेल्या
एका जगन्मान्य कामसूत्रकाराची रम्य कथा
लेखक : दि. बा. मोकाशी
३ जुलै अंकापासून क्रमशः सुरू
कारण
यापुढील २६ जूनचा अंक ‘ बंद ’ आहे.
३ जुलै अंकाची किंमतही कमी राहील ‘ कदाचित ’
कारण
पृष्ठसंख्याही थोडी कमी राहील ‘ कदाचित ’

सगळेच कदाचित कदाचित, अनिश्चित अनिश्चित
वर्ष उलटले !
स्वतंत्र पत्रिकारितेवरची ही
अनिश्चिततेची टांगती तलवार !
असो, असो.
३ जुलैला भेटू शकतो आहोत
हे काय कमी आहे ?

## साप्ताहिक माणूस

वर्ष सोळावे – अंक तिसरा

१९ जून १९७६

मूल्य : एक रुपया

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये

सहामाही वर्गणी : वीस रुपये

परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पेठ

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

¤

दूरध्वनी : ४३४५९

¤


भारत लवकरच एक समाजवादी प्रजासत्ताक म्हणून घोषित होत आहे. अशा वेळी......

# रजनीशांचा समाजवादविरोध !

सुहास तारे, इचलकरंजी

आचार्य रजनीश यांच्या पाच हिंदी व्याख्यानांचा अनुवाद 'समाजवादापासून सावध' या नावाने पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाला आहे. स्वामी धर्मव्रत यांनी हा सुंदर अनुवाद केला आहे, असे प्रशस्तीपत्र प्रकाशकांनीच दिले आहे. त्यामुळे मूळ व्याख्यानांशी सर्वथा सुसंगत असाच विचार या पुस्तकात मांडलेला असावा, असे गृहीत धरू.

असली व्याख्याने दिल्याबद्दल रजनीशांवर खटला भरता येईल की काय, हा कायदेतज्ज्ञांच्या अभ्यासाचा विषय आहे. परंतु 'समाजवादापासून सावध' सारखी पुस्तके प्रसृत करणे ही नक्कीच दंडनीय कृती आहे. उलट या पुस्तकातील विचारांचा प्रसार व्हावा, सभा–संमेलनातून ते गाजावे, चर्चा व्हाव्या अशीही चिथावणी प्रस्तावनेतच आहे. केवळ प्रसिद्धीसाठी भंपक पांडित्याच्या आधाराने हे विचार मांडण्यात आले आहेत. कारण या विषयावर चर्चा व्हावी, विवाद व्हावा व त्यातून अधिक चांगले बाहेर पडावे असे काही रजनीश मांडीतच नाहीत.

ते मांडतात की, गरीब हे नालायक–मूर्ख असतात–मत्सरी असतात. सगळे गुण श्रीमंतीच्या वातावरणात निपजतात. श्रीमंतच खरे समाजसेवक आहेत. राज्य (state) हे हमालापेक्षा मूर्ख असते. महात्मा गांधी शुद्ध 'बनिया' होते त्यांमुळेच हिंदु–मुसलमान दंगे झाले. ते अहिंसक नव्हते–हिंसक व्यक्तित्वाचे होते इ. इ. मुख्यतः समाजवाद–सध्याच्या समाजवादाला विरोध करता करता रजनीशांनी आपल्या बुद्धीला–पांडित्याला–तत्त्वज्ञानाला अक्षरशः वाटेल त्या क्षेत्रातल्या अनेक गोष्टींवर भरकटलेली मते मांडण्यासाठी मोकाट सोडले आहे.

एखाद्या अर्थशास्त्रातील अधिकारी व्यक्तीच्या आवेशात त्यांनी समाजवादी तत्त्वज्ञानाचा समाचार घेतला असून जमेल तितकी त्या तत्त्वज्ञानाची थट्टा केली आहे. मार्क्स यांचे 'शास्त्रीय समाजवाद' हे तत्त्वज्ञान व त्यानंतर रशिया वगैरे ठिकाणी झालेला त्याचा विकास याबाबत रजनीशांना एकही धड भूमिका घेता आली नाही. या सर्वच बाबतीत एक आक्रस्ताळी, गोंधळून टाकणारी असमंजस भूमिका त्यांनी स्वीकारली आहे. मार्क्स–त्याचे तत्त्वज्ञान खोटे म्हणवत नाही. समाजवाद हा अंतिम पर्याय आहे. भांडवलशाहीनंतर तो स्वीकारण्याशिवाय पर्याय नाही, परंतु पैसा–संपत्ती–श्रीमंती यांचे गोडवे गायल्याशिवाय चैन पडत नाही, असा हा विरोध त्यांच्या स्वतःच्याच मनात निर्माण झाला आहे. भांडवलशाही विकसित झाली की, आपोआप त्यातून समाजवाद येईल हे अर्थशास्त्राचे म्हणणे मान्य करूनही ते रशियाच्या अर्थकारणावर घसरतात व गरिबीबद्दलची आपली नावड पुन्हा पुन्हा दाखवतात.

पहिली गोष्ट अशी ध्यानात घतली पाहिजे की, समाजवादाचे आंदण रशियाला मिळालेले नाही. रशिया अयशस्वी झाला की, समाजवाद संपला असे होणार नाही. त्यामुळे रशियाची नाचक्की करून त्याच्या चुका व पराभव यांचे भांडवल करून भांडवलशाहीचा बचाव होणार नाही. कारण भांडवलशाहीचा पाडाव ही एक स्वतंत्र व हळूहळू पण निश्चितपणे विकास पावणारी घटना आहे. रोज संकटांना तोंड देता देता कणाकणाने बदलत जात भांडवलशाही आपले रूप बदलत आहे. त्यातच ती संपत आहे. परंतु रशियात स्टॅलिनने केलेली हिंसा, तेथील टंचाई यांचा आधार घेऊन व तुलनेने अमेरिकेची संपत्ती, तेथील टोलेजंग इमारती यांचे कौतुक करून

समाजवादाला रोखून धरण्याचा प्रयत्न रजनीश करतील, तर ते समुद्राला बांध घालण्याची खटपट करीत आहेत असे म्हणावेसे वाटते.

शिवाय या रशिया-विरोधाला सत्याचीही जोड असावी याबद्दल त्यांचा मुळीच विरोध नाही. रशियात भयंकर दारिद्र्य आहे–तेथे नव्या, तरुण रक्ताला कसलाही उत्साह नाही. क्रांतीनंतर शास्त्रज्ञान, तंत्रज्ञान खुंटले आहे इत्यादी भरमसाट विधाने विधाने ते करतात. चांद्रविजयाची जी कामगिरी अमेरिकेने केली तिच्या संदर्भात ते हे विसरतात की, हाच विजय रशियाने माणूस न पाठविता केवळ यंत्र चंद्रावर पाठवून ते परत आणविण्याचा चमत्कार केला आहे. मग अवकाश-शास्त्रात दूरगामी दृष्टीने योजना आखणाऱ्या व जी भौतिक प्रगती युरोप–अमेरिकेने तीन-चारशे वर्षांत साधली तिची बरोबरी करण्याचा प्रयत्न पन्नास वर्षांत करणाऱ्या रशियाला त्याचे श्रेय ते का देत नाहीत ?

रशियात जे विकास–कार्यक्रम झाले ते रजनीशांना नाकारता येत नाहीत म्हणून ते म्हणतात की, धाक, दडपशाही व स्वातंत्र्याचा संकोच या आधाराने रशियाने प्रगती केली. अमेरिकेत त्याग, जबरदस्ती, कुर्बानी काही करावे लागले नाही. सगळे कसे आपोआप निर्माण झाले. हीच रजनीशांच्या पांडित्याची मर्यादा आणि अकलेची दिवाळखोरी ! प्रचंड भांडवली पसारा, जीवघेणी स्पर्धा व नावीन्यासाठी चाललेली धडपड यांतून जे एक भयंकर चक्र बनते त्यात रोज–दिवाळे निघते–भांडवलाचा नाश होतो, धंदेवाले देशोधडीस लागतात, बेकारांच्या लाटा उसळतात आणि दौडता–दौडता भांडवलशाहीची छाती फुटायची वेळ येते तरीही थांबता येत नाही. सदैव वाढत्या गरजा–नव्या गरजांची निर्मिती व त्यासाठी नवी उत्पादने, त्यांच्या खपासाठी अवाढव्य जाहिरातबाजी या सर्वांमुळे भांडवलशाही अर्थव्यवस्थेत जो भयानक ताण निर्माण होत आहे व जागतिक महामंदी, महायुद्धे यांसारख्या घटनांमुळे सुबत्ता आणि संपत्ती यांचे जे क्षणभंगुरत्व कळू लागले आहे, त्यापुढे भांडवलशाहीचे मागच्या शतकातले फायदे सांगण्यात फारसा अर्थ नाही.

त्यांच्या मते श्रीमंताच्या आधाराने गरीब जगतात. हवेली झोपड्यांना तगवते–वाचवते. पुढे त्यांना वाटते की, श्रमिकाची समाजाला गरजच राहणार नाही. कारण खरे काम मेंदू करतो व कामगार हा शेवटी उपरा ठरेल. अर्थात हात नसतील तर केवळ बुद्धी हवेतून स्वयंचलित यंत्रे आणून देईल असे रजनीशांना वाटत असल्यास नकळे. हवेतून घड्याळे, अंगठ्या काढणारे, सत्य आणि असत्य बाबा खूप असले तरी, जनतेच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी असले प्रकार करण्याची त्यांची मुळीच तयारी नाही हे स्पष्ट झाले आहे. त्यांच्या मते संपन्न, यशस्वी लोकांबद्दल मत्सर वाटून गरीब समाजवादाच्या मागे लागले आहेत–त्यामागे मानवता वगैरे काहीही उदात्त भावना नाही. या आचार्यांना असे वाटत असावे की, गरीबाने श्रीमंताच्या आसऱ्याला रहावे. फार तर श्रीमंत होण्याचा प्रयत्न करावा–त्यासाठी काहीही मार्ग अवलंबावे. उगीच दीन–दुःखितांचा कळवळा, बंधुभाव, मानवी मूल्यांबद्दलचा आदर वगैरे भानगडीत पडू नये. संपत्तीचे अजीर्ण झाल्याशिवाय या भावना सच्च्या असू शकत नाहीत असे रजनीशांना वाटत असावे. हा उच्च मानवी मूल्यांचा किती घोर अपमान !

त्यांच्या मते या द्वेष, मत्सरामुळे रशिया–चीनमध्ये क्रांती झाली. मत्सर वा ईर्षा सृजनात्मक कार्य करू शकत नाही–उभं करू शकत नाही–विधायक असे घडविण्याची या मत्सराला कल्पना नसते. रशिया वा चीनने गेल्या पन्नास वर्षांत काहीच घडविले नाही असे सुचविण्याचा रजनीशांचा प्रयत्न असेल तर तो खोटाच नाही तर दुष्ट आहे.


त्यांचा दुसरा एक आरोप असा की, रशियात क्रांतिपूर्वी खूप महापुरुष होते–टॉलस्टॉय, डोस्टोव्हस्की, तुर्गनेव्ह, गॉर्की, चेकॉव्ह इत्यादी. नंतर मात्र सगळे खुजे झाले. स्टॅलिनच्या दडपशाहीतूनच अंकुरलेली सोल्झेनित्सिनची प्रतिभा रजनीशांना जाणवली नाही. पास्तरनाकच्या डॉ. झिवॅगोबद्दल आचार्यांना काहीच वाटले नाही ?

मागे म्हटल्याप्रमाणे रजनीशांचा डोळा आहे तो रशियावर आणि त्याचे खंडन म्हणजे समाजवादाचे खंडन या भोळ्या समजुतीवर. परंतु त्यांच्या डोक्यातला पंडित चुळबुळ करीत असल्याने ते समाजवाद संपूर्ण नाकारीत नाहीत. आजवर समाजवादाला तोंडावर विरोध न करता छुपा विरोध करणाऱ्यांनी हाच मार्ग स्वीकारला. रशियावर दुगाण्या ! आज भांडवलशाहीतही पूर्वीच्या तुलनेने महापुरुष व शास्त्रज्ञ निर्माण होणे अशक्य झाल्याचा प्रत्यय येत आहे. आचार्यांच्याच म्हणण्यानुसार जीवनाची जटिलता इतकी वाढली आहे की, एक शास्त्रज्ञ–एक शोध हा प्रकार संपून आता Body of men–शास्त्रज्ञांचा एक संघ व त्याद्वारे प्रयोग ही पद्धत स्वीकारावी लागत आहे. तीत कमीपणा नाही. विकास–कार्यातला तो एक अटळ टप्पा असेल. आचार्यांना त्याचीही कल्पना नसेलच असे नाही. त्यामुळे शेवटी ते कबूल करतात की, भांडवलशाहीकडे स्वतःचे तत्त्वज्ञान नाही–अज्ञाने ती मरून जाईल. सध्या भांडवलशाही भयभीत झाली आहे. म्हणूनच परवाचे अमेरिकेचे अध्यक्ष आयसेनहॉवरनाही "कम्युनिस्ट म्हणतात ते खरे आहे' असे वाटायचे असे आचार्यच सांगून टाकतात.

रजनीशांच्या या सर्व व्याख्यानांतून एक धूर्त, लबाड, हुशार लांडगा डोकावतो. समाजाच्या उच्च, श्रीमंत थरामध्ये लोकप्रिय होण्यासाठी 'संभोगातून समाधीकडे' हा मार्ग सांगणारे आचार्य (हल्ली ते स्वतःला 'भगवान' म्हणवितात.) जगभरच्या श्रीमंतांना नकोसा वाटणाऱ्या समाजवादाविरुद्ध उभे ठाकतात तेव्हा आश्चर्य वाटत नाही. उलट आपणच समाजवादाचे चाहते आहोत – राज्यकर्ते शत्रू आहेत असा पवित्रा घेतात तेव्हा गंमत वाटते. आपले तर्कशास्त्र, तत्त्वज्ञान यांचा उपयोग करून आणि प्रभावी वाणीचे सहकार्य घेऊन समाजातल्या एका अतितृप्त घटकाला रिझविण्याचा त्यांचा उद्देश असेल तर, त्यासाठी त्यांनी मोक्ष–धर्म आणि पारलौकिक जीवन यात आपली प्रज्ञा चालवावी. राजकारण, सर्वोदय, अर्थशास्त्र व गांधीवाद लोकशाही इत्यादी विषयांवर आपली प्रच्छन्न मते मांडताना ती प्रक्षोभक असल्याचा अभिमान जरूर मिरवावा परंतु एखाद्या तत्वज्ञानाला सामोरे जाताना त्याला नेमका विरोध किंवा त्या तत्वज्ञानाच्या अनुयायांना विरोध, पद्धतींना विरोध यासंबंधी संदिग्धतेचा बुरखा हेतुतः पांघरून त्यातला विचार दडपू नये. आपल्या हस्तिदंती मनोऱ्यावर बसून शारीरिक श्रमांची हेटाळणी करताना बुद्धीचे जे प्रदर्शन ते करतात

पृष्ठ २९ वर

पुणे येथील सर परशुरामभाऊ महाविद्यालयाला २० जून १९७६ रोजी साठ वर्षे पूर्ण होत आहेत....



# सरस्वतीच्या स्वप्नांचे झाड हे इथे....असे....

प्रा. विजय कारेकर

कोणतातरी समाजाभिमुख प्रगल्भ विचारवंत हा एखाद्या महान कार्याचे स्फुल्लिंग ठरतो.

'तर देशस्थिती सुधारण्याचा राजमान्य मार्ग म्हणजे लोकांस ज्ञानसंपन्न करणे हा होय. ही संपन्नता सिद्ध करण्यासाठी दोन मोठी साधने म्हटली म्हणजे रसना व लेखणी ही होत...'– 'मराठी भाषेचे शिवाजी' म्हणून गौरविलेल्या कै. विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे हे विचार शिक्षण प्रसारक मंडळीच्या संपन्न पसाऱ्याचे स्फुल्लिंग.

चार प्राथमिक शिक्षकांनी पुण्यातील इतिहासप्रसिद्ध मोरोबादादांच्या वाड्यात या सूर्यस्वी प्रेरणेने १ जानेवारी १८८३ ला 'नूतन मराठी विद्यालया'चे बीजारोपण केले. विष्णुशास्त्र्यांचे हे अमृत-स्मारकच.

पाहता पाहता हे बीज फोफावले. विविध समृद्ध ज्ञानशाखांनी बहरलेला, लहडलेला वृक्ष विस्तारू लागला. ज्ञान तृषार्तांचा ज्ञान-तरू बनून राहिला.

ह्या ज्ञान-तरूची एक समृद्ध शाखा म्हणजे पुण्यातील टिळक रोडवरील सर परशुरामभाऊ महाविद्यालय. एक ज्ञानवृद्ध तपोवन. महाविद्यालयाची भव्य पवित्र वास्तू म्हणजे सरस्वतीचा दरबार. जिथं विद्वत्तेची, संस्कृतीची, कलेची झुंबरं परंपरा आणि नवतेच्या संस्काराचा वैभवी प्रकाश सतत पाजळीत असतात.

पुणं आणि शिक्षण हे दोन शब्द अवियोज्य. पुण्यात ज्ञानाची दालनं पदोपदी संपन्न झालेली दिसतात. त्यात सदाशिव पेठ अग्रगण्य. परंपराच तशी भक्कम, उज्ज्वल, खोल.

१९१४ च्या डिसेंबरात शि. प्र. मंडळीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष डॉ. भांडारकर यांच्या सहीने मुंबई विद्यापीठाकडे द्वितीय श्रेणीचे (पहिले दोन वर्ग) महाविद्यालय काढण्यास परवानगी मिळावी, असा अर्ज करण्यात आला, पण लॉर्ड कर्झनच्या कारकीर्दीतला १९०४ मधला 'विद्यापीठ कायदा' मोठा ताठर आणि कठोर. त्याची पूर्तता करून मान्यता मिळविणे ही एक तपश्चर्याच. परंतु त्यावेळच्या आजीव सदस्यांपैकी श्री. द. रा. घारपुरे आणि श्री. वि. ग. आपटे यांच्या निष्ठापूर्ण, अविश्रांत तपाला फळ आले. डॉ. रा. गो. भांडारकर, श्री. दिवाणबहादूर गोडबोले, डॉ. वि. स. घाटे आणि महाराष्ट्राचे श्रेष्ठ कादंबरीकार, 'करमणूक'कर्ते ह. ना. आपटे यांचे प्रगल्भ मार्गदर्शन, प्रत्यक्ष परिश्रम व आशीर्वाद हे सूर्यासारखे मागे होतेच. त्यामुळे अल्पावधीतच म्हणजे १३ एप्रिल १९१६ रोजी मुंबई सरकारची या नव्या महाविद्यालयाला मंजुरी मिळाली. प्रा. द. रा. घारपुरे आणि ह्या महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य वि. ग. आपटे यांच्या मते महाविद्यालयाचे खरेखुरे संस्थापक म्हणजे हरिभाऊ आपटे हेच होत.

हरिभाऊ आपट्यांचं साहित्य म्हणजे सदाशिव पेठ आणि स. प. महाविद्यालय म्हणजे देखील सदाशिव पेठ, असं जरी म्हटलं तरी त्यातले अर्थ मोठे विलक्षण आहेत. ह्या दोन्ही मध्यमवर्गीयांच्या वास्तू. धार्मिकता, संस्कृती यांची मंदिरंच. त्याचबरोबर राष्ट्रीय बाणा फुलविणाऱ्या.

प्रथम 'न्यू पूना कॉलेज' या नावाने ह्या महाविद्यालयाची सुरूवात झाली. लोकमान्य टिळकांचाही सिंहाचा वाटा. त्यांच्या शब्दाने २५ एकरांची फळांफुलांनी बहरलेली नितांत रमणीय अशी भाऊमहाराज बागेची जमीन या महाविद्यालयाला लाभली. २० जून १९१६ रोजी महाविद्यालयाचे प्रत्यक्ष कार्य सुरू झाले. डॉ. भांडारकर यांनी उद्घाटनाचे भाषण केले. पहिल्या वर्षी इंटर

आर्टस्च्या वर्गात फक्त ३६ विद्यार्थी होते. पण कॉलेज सुरू होऊन एक आठवडा झाला नाही तोच, फर्स्ट इअरचा वर्ग पूर्णपणे भरून गेला आणि २०० विद्यार्थी दाखल झाले.

सुरुवातीच्या वर्षातच अध्यापकवर्गाला प्राचार्य आपटे, प्रा. ह. वि. तुळपुळे, प्रा. र. दा. करमरकर, प्रा. ना. सी. फडके, प्रा. गो. प. पटवर्धन, प्रा. एन् जी. दामले असे महाराष्ट्रातले विचारवंत, साहित्यिक लाभले. त्यानंतरच्या काही वर्षांतच प्रा. दि. ब. देवधर, प्रा. रा. कृ. लागू, प्रा. ना. ग. नारळकर, प्रा. शं. वा. दांडेकर, प्रा. द. वा. पोतदार यांच्यासारखी संपन्न अतीरथी माणसं ह्या महाविद्यालयाची शिल्पकार झाली.

म्हणता म्हणता वेलू गगनावरी गेला. १९२८ मध्ये शि प्र. मंडळीचे अध्यक्ष जमखंडीचे राजेसाहेब श्रीमंत अप्पासाहेब पटवर्धन यांनी वडिलांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दोन लाख रुपयांची उदार देणगी दिली. त्या देणगीचा स्वीकार करून २६ सप्टेंबर १९२८ रोजी 'न्यू पूना कॉलेज'चे 'सर परशुरामभाऊ कॉलेज' असे नामाभिधान झाले. श्रीमंत शंकरराव उर्फ अप्पासाहेब पटवर्धन १९ वर्षं संस्थेचे अध्यक्ष होते. त्यांचा अमोल राजाश्रय महाविद्यालयाला सतत लाभला. त्यांच्या पत्नी श्रीमंत लीलावतीदेवी पटवर्धन यांनी महाविद्यालयाला नुकतीच पन्नास हजार एक रुपयांची देणगी देऊन लोभ कायम ठेवला आहे

सरस्वतीच्या या दरबारात उच्च शैक्षणिक व सांस्कृतिक मूल्यांची जोपासना होऊ लागली. म्हणूनच राजाश्रयाबरोबरच शिक्षणाची कदर करणाऱ्या अगणित–प्रामुख्याने मध्यमवर्गीय–ज्ञानोपासकांची ही ज्ञानभूमी, तपोभूमी ठरली. बुद्धिमान, निष्ठावंत, चारित्र्यशील अशा प्राचार्यांच्या नेतृत्वाखाली संस्थेचा पसारा सतत वाढतच राहिला. १९४१ मध्ये बडोद्याचे महाराज प्रतापसिंह गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली महाविद्यालयाचा रौप्य महोत्सव साजरा झाला.

प्राचार्य करमरकरांनी १९३३ ते ४५ या काळात अनेक कठीण प्रसंगातूनही महाविद्यालयाला मोठे वैभव प्राप्त करून दिले. स्टुडंट्स् हॉल, विद्यार्थिनींचे वसतीगृह, ग्रंथालयाची इमारत वगैरे इमारती ह्याच काळात उभ्या राहिल्या. घनदाट जंगल कमी होऊन एक सुरम्य बाग साकारली.

कै. सोनोपंत दांडेकरांनी १९४५ मध्ये प्राचार्य पदाची सूत्रे आपल्या हाती घेतली. आणि हा दरबार अभंगमयी झाला. त्यांच्या वाऱ्या केवळ हृदयात वसणाऱ्या पंढरीच्या नव्हत्या, तर हृदयात वसणाऱ्या पंढरीपासून मस्तिष्कात फुलणाऱ्या ज्ञानेशांच्या आळंदीपर्यंत. अंतःकरण आणि बुद्धि यांच्या योगाच्या आणि शुचितेच्या वारीचा वारसा त्यांनी महाविद्यालयाला मोठ्या मनोभावे अर्पण केला. वैकुंठवासी प्राचार्य सोनोपंत म्हणजे या महाविद्यालयाच्या सरस्वतीच्या बागेतील सोन्याचा पिंपळच.

हे महाविद्यालय केवळ स्व-केंद्री नाही. हे केवळ स्वतःच्या अस्तित्वासाठी, विकासासाठी झगडले नाही, तर पुण्यात विद्यापीठ स्थापन व्हावे म्हणून त्याने प्रयत्नांची पराकाष्ठा केली. 'महाराष्ट्रासाठी विद्यापीठ' ह्या कल्पनेचा म. म. द. वा. पोतदारांनी पुरस्कार केला. ब्रिटिशांच्या वेळी विद्यापीठाच्या अस्तित्वासाठी बॅ. जयकर समिती नेमली होती. स. प. महाविद्यालयाने त्यासाठी आपले सर्वस्व देऊ केले. 'Lock, stock and barrel' हे वचन पदवीपूर्व वर्गाच्या (post–intermediate) केंद्रीकरणाची कल्पना पुढे आली आणि स. प. महाविद्यालयाने आपली जागा देवून पुणे विद्यापीठाच्या अस्तित्वास अमोल सहकार्य केले.

नंतरच्या काळात प्रा. भिडे, प्रा. हुल्याळकर, प्रा. मालेगावकर आणि आता प्रा. के. पं. मंगळवेढेकर यांनी महाविद्यालयाचा विस्तार उत्तरोत्तर विकसित केला. गुणवत्ता वाढवली. आधुनिकीकरण केले. नव्या युगातील शर्यतीत हे महाविद्यालय कधी मागे राहिले नाही. सांस्कृतिक आणि पारंपारिक मूल्यांचा वारसाही कधी गमावला नाही.

रसायन शास्त्र, पदार्थ विज्ञान, जीवशास्त्र यांच्या अद्ययावत् प्रयोगशाळा आणि भव्य वास्तू उभारल्या, ग्रंथालयाची उंची सर्वार्थाने वाढवली. पोहोण्याचा सुरम्य तलाव बांधला, क्रीडा–क्षेत्रातही भारतीय पातळीवरचे उच्च यश सतत संपादन केले.

सरस्वतीच्या ह्या दरबारात अनेक विद्यार्थी ज्ञानसंपन्न, संस्कारशील झाले. अनेक साहित्यिक, प्राध्यापक, मानव्य विद्यातील पारंगत प्राध्यापक विज्ञानांतील संशोधक, प्राध्यापक ह्यांनी दरबारात ज्ञानामृताचे कुंभ सतत भरते ठेवले. परिणामी सरकारमान्यता आणि लोकमान्यता वाढती राहिली.

भारतातील गुणसंपन्न, समृद्ध अशा अग्रगण्य महाविद्यालयांच्या मर्यादित यादीत स. प. चे नांव झळकले. आणि 'कॉसिप' योजनेसाठी तीन लक्ष रुपये मंजूर झाले. पाठोपाठ 'कोहसिप' योजनाही लाभली. ह्या दोन्ही योजनांच्या कार्यवाहीने स. प. आणखी नवे आकार घेत आहे.

या महाविद्यालयातून बाहेर पडलेले असंख्य विद्यार्थी विविध क्षेत्रांत नामांकित झाले आहेत. त्या सर्वांची यादी देणे म्हणजे आकाशातील नक्षत्रांचा संपूर्ण नकाशा सांगून त्यांची नावे सांगण्याएवढे अवघड काम झाले आहे.

आधुनिक विद्यार्थी निकेतन, माजी–विद्यार्थी भवन, ग्रंथालय वास्तूचा विस्तार, प्राध्यापकांची निवासस्थाने–असे अनेक संकल्प महाविद्यालय आता पुरे करणार आहे. असंख्य माजी विद्यार्थी कृतज्ञभावाने पुढे येतील, उदार उद्योगपती, विद्याप्रेमी श्रीमंत मोठ्या मनानं ह्या संकल्पांची पूर्ती करण्यासाठी सतत पुढे येतील.

आणि सरस्वतीच्या स्वप्नांचे झाड प्रत्यक्षात इथे...असे बहरते राहील.

□

# भारत-रशिया

## मॉस्को वाटाघाटीचे फलित

वा. दा. रानडे

पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींच्या भेटीने भारत-रशिया सहकार्य अधिक दृढ झाले आहे. या भेटीला भारताचा आर्थिक विकास आणि परराष्ट्रसंबंध या दोन्ही दृष्टींनी महत्त्व आहे. दोन्ही देशांतील व्यापार दीड-पट ते दोनपट वाढविण्याचे उद्दिष्ट रशियाचे नेते ब्रेझनेव्ह यांनी १९७३ साली भारतास दिलेल्या भेटीच्यावेळीच ठरविण्यात आले होते. ते साधण्यासाठी व्यापाराचे क्षेत्र व कक्षा वाढविण्यात येणार आहे. लोखंड सोडून इतर धातूंची कारखानदारी, कापडगिरण्या, इलेक्ट्रॉनिक्स नि शेती या क्षेत्रातील उत्पादन वाढीसाठी दोन्ही देश अधिक सहकार्य करणार आहेत. याबाबतीत रशियाच्या तंत्रज्ञानाचा भारतास काही प्रमाणात उपयोग होईल पण याबाबतीत रशियाच्या मर्यादा लक्षात घेतल्या पाहिजेत. रशियाच आज अमेरिकेकडून तंत्रज्ञानाच्या बाबतीत मदत घेत आहे तेव्हा रशियाच्या या मर्यादा लक्षात घेऊन अधिक प्रगत देशाकडून तंत्रज्ञान मिळविण्याचे प्रयत्न आपण केले पाहिजेत. अंतराळ विज्ञानक्षेत्रात रशियाने भारताला मोठी मदत केली. 'आर्यभट्ट' हा पहिला भारतीय उपग्रह रशियाच्या मदतीमुळेच अंतराळात पाठविण्यात यश आले. या क्षेत्रात रशियाची मदत मिळत आहे ती जरूर घ्यावी पण स्वतःच्या प्रयत्नांनी आपले अंतराळ विज्ञान विकसित करण्यावर अधिक भर हवा. कोणाचीही मदत न घेता भारताने पहिला शांततापूर्ण अणुस्फोट केला. अणुशक्ती आणि अंतराळ विज्ञान या दोन्ही क्षेत्रात हाच आदर्श आपण पुढे ठेवला पाहिजे. सुरुवातीस काही काळ परकीय तंत्रज्ञान घ्यावे लागेल पण तंत्रज्ञान स्वतःच विकसित करण्याच्या कार्यक्रमाला आपण अग्रस्थान दिले पाहिजे. याबाबतीत चीनचा अनुभव लक्षात घेण्यासारखा आहे. रशिया-चीनमध्ये संघर्ष निर्माण झाल्यावर रशियाने आपले सर्व तंत्रज्ञ परत बोलावले पण चिनी तंत्रज्ञांनी हे आव्हान स्वीकारले. आपल्या प्रयत्नांनी त्यांनी तंत्रज्ञान विकसित करून अपुऱ्या राहिलेल्या योजना पुऱ्या केल्या.


दुसरा महत्त्वाचा प्रश्न परराष्ट्रसंबंध आणि परराष्ट्र धोरणाच्या बाबतीत सहकार्याचा. भारतीय उपखंडात शांतता व स्थैर्य निर्माण करण्यासाठी श्रीमती गांधी यांनी चालविलेल्या प्रयत्नांचे ब्रेझनेव्ह यांनी स्वागत केले. उपखंडातील परिस्थिती बिघडविण्यासाठी, तणाव वाढविण्यासाठी काही परकीय शक्ती-प्रयत्न करीत आहेत, चिथावणी देत आहेत. त्याविरुद्ध कडक इशारा संयुक्त पत्रकात देण्यात आला तो योग्यच आहे. जागतिक तणाव कमी करण्यासाठी ब्रेझनेव्ह यांनी चालविलेल्या प्रयत्नांचे इंदिरा गांधींनी स्वागत केले.

पंतप्रधान श्रीमती गांधींनी भुट्टोंशी वाटाघाटी करून पाकशी राजकीय संबंध पुन्हा प्रस्थापित करण्याचे ठरविले व काही अनिर्णित प्रश्न सोडविले. या घटनांचे स्वागत ब्रेझनेव्ह यांनी केले पण त्याचबरोबर चीनशी वकिलातीच्या पातळीवर संबंध प्रस्थापित करण्याच्या भारताच्या प्रयत्नांचे स्वागत त्यांनी केलेले नाही. पत्रकात त्यासंबंधी काही उल्लेख नाही. चीनशी वकिलातीच्या पातळीवर संबंध प्रस्थापित करण्याच्या निर्णयाने भारत-रशिया मैत्रीस काही बाध येणार नाही ही भारताची भूमिका रशियाने समजून घेतली आहे असे मला वाटते असे श्रीमती गांधींनी मॉस्कोतील पत्रकार परिषदेत सांगितले, पण ब्रेझनेव्ह स्वतः याबाबतीत काही बोललेले नाहीत, तसेच संयुक्त पत्रकातही यासंबंधीचा काही उल्लेख नाही. यावरून त्यांची याबाबतीत पुरेशी खात्री पटली नाही काय, अशी शंका मनात येते. चीनचे धोरण यापुढे काय राहील, याबाबत दोन्ही नेत्यांचे काय अंदाज आहेत, यावर चर्चा झाली असणारच. पण नुसती या प्रश्नाची चर्चा झाली, यापलीकडे दोन्ही नेत्यांनी उघडपणे आपले विचार मांडलेले नाहीत. रशिया-चीन संघर्ष हे जागतिक तणावाचेच एक क्षेत्र आहे. भारताने चीनमध्ये वकील पाठविण्याचा निर्णय घेतला त्यावेळी रशियाही आता चीनशी संबंध सुधारण्याचा प्रयत्न करील असे अंदाज प्रसिद्ध झाले होते, पण तसे काही घडले नाही. आशियात टिकाऊ शांततेच्या दृष्टीने रशिया-चीन संघर्षही मिटावयास हवा. याबाबत प्रयत्न करण्याचे आवाहन पंतप्रधानांनी ब्रेझनेव्ह यांना केले असण्याची शक्यता आहे. रशियाच्या याबाबतीत काही हालचाली चालू असतीलही, पण या हालचालींतून फलदायी असे काहीतरी हाती पडत आहे अशी खात्री झाल्याशिवाय त्यासंबंधी उघड काही बोलावयाचे नाही, असे रशियननेत्यांनी ठरविले असावे. भारताच्या प्रयत्नांना याबाबतीत कितपत यश येते ते पाहून आपण हालचाल करावी, असाही रशियाचा उद्देश असणे शक्य आहे. माओ असेपर्यंत चीनच्या धोरणात बदल होणार नाही. तेव्हा सध्या प्रयत्न करण्यात फारसा अर्थ नाही, असाही विचार रशियन-नेत्यांनी केला असण्याचा संभव आहे. ते काहीही असले तरी, आशियाच्या शांततेच्या दृष्टीने हा प्रश्न महत्त्वाचा आहे.

रशियासारख्या बड्या राष्ट्राशी सहकार्य वाढविण्याने आपल्या अलिप्ततेच्या धोरणावर मर्यादा पडतील काय ? आपल्या धोरणावर रशियाचा प्रभाव वाढेल काय ? असे प्रश्न पूर्वीपासून उपस्थित केले जात आहेत त्यांचाही मॉस्को-वाटाघाटीच्या संदर्भात पुन्हा विचार केला पाहिजे. या प्रश्नाचा विचार करताना एक निकष लावला पाहिजे. रशियाच्या अयोग्य वाटणाऱ्या धोरणांनाही भारत पाठिंबा देत असेल, तर त्याची अलिप्तता सुटून त्याच्या धोरणावर रशियाचा प्रभाव वाढला असे म्हणता येईल. पंडित नेहरूंच्या काळापासून भारताचे रशियाशी मैत्रीचे व सहकार्याचे संबंध आहेत, पण दोन मोठ्या घटनांच्या बाबतीत भारताने आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना रशियाच्या अयोग्य धोरणांबद्दल आपली नापसंती पुरेशा ठामपणाने व्यक्त केलेली नाही. एक घटना हंगेरीमधील रशियन फौजांच्या हस्तक्षेपाची व दुसरी चेकोस्लोव्हाकियातील वॉर्सा-करार राष्ट्रांच्या लष्करी हस्तक्षेपाची. या दोन्ही घटना म्हणजे रशियाचे अंतर्गत प्रश्न नव्हेत. कम्युनिस्ट राष्ट्रगटाचे ते अंतर्गत प्रश्न असतील. तरीही प्रत्येक कम्युनिस्ट राष्ट्राचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व अबाधित राहायला हवे. आपल्या कलाने चालणाऱ्या राजवटी प्रत्येक कम्युनिस्ट देशात असल्या पाहिजेत हा आग्रह रशियाने सोडला पाहिजे. स्वतःच्या मार्गाने समाजवाद आणण्याचा प्रत्येक कम्युनिस्ट राष्ट्राचा हक्क नुसता कागदावर नव्हे, तर कृतीने मान्य करण्यात आला पाहिजे. अलीकडच्या काळात अशी कोणती घटना झालेली नाही, पण अशा घटना घडतील तेव्हा भारताने त्याबद्दलची आपली नापसंती स्पष्टपणे व्यक्त केली पाहिजे.

दोन्ही बाजूंनी एकमेकांच्या अंतर्गत प्रश्नांबद्दल बोलायचे नाही, हा संकेत इंदिरा गांधींनी पाळला, पण ब्रेझनेव्ह यांनी पाळला नाही. प्रतिगाम्यांविरुद्ध इंदिरा गांधींनी योजलेल्या उपायांबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. भारताच्या धोरणांवर त्यांनी टीका केली नाही हे खरे, पण अंतर्गत प्रश्नाबाबत बोलायचे नाही म्हणजे नाही, त्यात फक्त टीका नको, गौरव चालेल अशी सूट नको. हे पथ्य कटाक्षाने पाळण्याची दक्षता पुढील वाटाघाटीत तरी घ्यावयास हवी. □

चिं. त्र्यं. खानोलकर स्मृतिनिमित्त
एक विशेष लेखमाला...



विसाव्या शतकाचा परिपाक–
–माणुसकीचा, सद्‌गुणांचा

चिखल, चिखल आणि चिखल....
तो चिखल
दोन्ही हातांनी जगाच्या तोंडावर फेकत निघालेला
अफलातून जर्मन नाटककार

# बरटॉल्ट ब्रेख्ट

## प्रा. शांताराम शिंदे

' मी आहे नाटककार. मी दाखवतो–
जे मी देखलंय्, माणूसजातीच्या मंडईला मी देखलंय, कशी माणुसकी विकते खरीदते. ते मी दाखवतो, मी, नाटककार. '
–ब्रेख्टच्या एका कवितेची सुरुवात.

माणूसजातीच्या मंडईत सैरभैर फिरलेला हा नाटककार आणि कवी. हासुद्धा एक माणूसच. जन्मला जर्मनीत. दोन महायुद्धांचा वणवा जिथं उसळला त्या दुर्दैवी देशात. महाकवी गटे जिथं जन्मला आणि नीत्शे ज्या मातीत आपलं अभूतपूर्व तत्त्वज्ञान फुलवून गेला तिथं. नीत्शे म्हणाला 'आजच्या जगात देव मेला आहे!' ब्रेख्ट एका नाटकात म्हणतो– ' आपण हे जगच बदलून टाकूया! की माणसंच बदलून टाकूया? की आपले देवच बदलून टाकूया?...'

साम्यवादी नाटककार म्हणून त्याची पश्चिम युरोपात हेटाळणी झाली.

'बूर्झ्वा' नाटककार म्हणून रशिया आणि पूर्व जर्मनीमध्ये त्याची उपेक्षा झाली.

–आणि १९५६ मध्ये त्याचा अंत झाल्यानंतर शेक्सपीअरच्या तोडीचा महान नाटककार म्हणून अमेरिकेपासून चीनपर्यंत त्याचा गौरव झाला.

१९५७–५८ च्या जर्मनीतल्या नाटकांच्या हंगामात त्याने प्रयोगांचा उच्चांक कसा गाठला याची खालील आकडेवारीवरून कल्पना येईल–

| | | |
|---|---|---|
| शेक्सपीअर | २६७४ | प्रयोग |
| शिलर | २००० | प्रयोग |
| गटे | १२०० | प्रयोग |
| ब्रेख्ट | ११२० | प्रयोग |

ही आकडेवारी पाहून एका टीकाकाराला अगदी मळमळून आलं. तो म्हणतो– ' जर्मनीच्या इतिहासात दुसऱ्या कुठल्याही नाटककारानं इतका मोठा परिणाम आपल्या देशावर आपल्या स्वतःच्याच काळात केला असेल असं वाटत नाही, जितका या थोटक्या, चापट मार्क्सवादी नाटककारानं केला आहे..'

हे उद्‌गार १९५९ सालचे आहेत. म्हणजे त्याच्या मृत्यूनंतर तीन वर्षांनीसुद्धा त्याच्याबद्दलचे गैरसमज कित्येकांच्या मनात हुळहुळत होते. १९५५ मध्ये त्याला 'स्टॅलिन शांतता पारितोषिक' मिळालं हे सुद्धा याचं एक कारण असू शकेल. ब्रेख्ट शांततावादी होता यात शंकाच नाही. कॉलेजमध्ये शिकत असतानाच त्यानं शांततावादाच्या बाजूनं एक निबंध लिहिला म्हणून काही काळ त्याला कॉलेजमधून काढून टाकलं होतं आणि १९२३ सालीच हिटलर–लुडेंडॉर्फ या क्रांतिकारी दुक्कलीनं त्याचं नाव काळ्या यादीत – ब्लॅकलिस्टमध्ये– लिहून टाकलं होतं. हिटलर सत्तेवर येताच त्याला मुलाबाळांसकट हद्दपार व्हावं लागलं आणि हिटलरनं त्याची नाटकं भरचौकात जाळून टाकली. युद्धखोर धोरणासाठी ब्रेख्टनं आपल्या मातृदेशाला विरोध केला आणि राष्ट्रद्रोहाचा आरोप माथी घेतला. हद्दपारीच्या काळात त्याच्यावर, त्याच्या बायकोवर आणि दोन लहान मुलांवर उपासमारीचीसुद्धा अनेकदा पाळी आली त्याच्या मातृभूमीच्या राजकीय इतिहासानं त्याची जी ससेहोलपट झाली त्याला सीमा नाही. तरी तो एक मनस्वी कलावंत होता म्हणून त्याची कला अखंड बहरत राहिली. हद्दपारीच्या काळात तर हा बहर विशेष जोमानं तरारून आला. या काळातल्या नाटकांनीच त्याला 'एक महान नाटककार' म्हणून अजरामर करून सोडलं आहे त्याची कीर्ती अखंड वाढतच आहे. आणि ती वाढतच राहणार आहे. तिला आता कुणीही थोपवू शकणार नाही.

तशी आंतरराष्ट्रीय कीर्ती त्याला १९२८ साली – वयाच्या तिसाव्या वर्षीच मिळाली. या वर्षी त्याच्या 'द थ्रीपेनी ऑपेरा' या नाटकाचा प्रयोग बर्लिनमध्ये झाला. १९२९ मध्ये त्याचा प्रयोग म्युनिकमध्ये झाला. १९३० मध्ये पॅरिस आणि मॉस्कोत प्रयोग झाले. १९३३ मध्ये न्यूयॉर्कच्या एम्पायर थिएटरमध्ये, १९३५ मध्ये लंडन रेडिओ बी. बी. सी. वर आणि मग पुढे स्कँडिनेव्हिया आणि जपानमध्येही प्रयोग झाले. एक नवा आणि आगळा नाटककार म्हणून त्याचं नाव झालं. त्यातल्या गीतांनी तर श्रीमंत, गरीब आणि मध्यमवर्गीय सगळेच भारावून गेले.

न्यूयॉर्कजवळच्या एका छोट्या गावातल्या 'थिएटर द लिस' या नाट्यगृहात अखंड सहा वर्षं त्याच्या 'द थ्रीपेनी ऑपेरा' या नाटकाचे प्रयोग 'दणाणत' राहिले. 'दणाणत' म्हणण्याचं कारण त्याचं संगीत. हे संगीत बसवलं कुर्टवील या नव्या दमाच्या संगीतदिग्दर्शकानं. कुर्टवील ब्रेख्टचा दोस्त. त्यानं ओळखलं की, ब्रेख्ट काहीतरी एकदम देतोय. म्हणून त्यानं अमेरिकेत वादळवाऱ्यासारखं फोफावलेलं जॅझ संगीत या नाटकाला दिलं. या नाटकाच्या वादळी यशाचं किमान पन्नास टक्के श्रेय कुर्टवीलच्या या नव्या धडाकेबाज संगीताला दिलं पाहिजे.

या नाटकाचा विषय काय, तर गरीबी! भाकरीच्या चतकोर तुकड्यासाठी माणसाला करावी लागणारी अमानुष कृत्यं! नाटकातला अट्टल गुन्हेगार मॅकहीथ म्हणतो–

'माणूस शेवटी कशावर जगतो?
एखाद्या वावळटाला निर्धारानं खाऊन,
त्याला पिळून, मारून, फसवून, लुबाडून!
असाच फक्त माणूस जगतो अगदी निखालस
विसरून की तोही एक माणूस आहे
इतरांसारखा...'

त्याच्या या शब्दांच्या पाठोपाठ विंगेतून गायकवृंदाचं गाणं ऐकू येतं–

"म्हणून म्हणतो भुलू नका, फसू नका, माहे हो बाप
माणसं जगतात, फक्त फक्त करून पाप!"

नाटकाच्या प्रत्येक अंकाच्या शेवटी प्रेक्षकांना उद्देशून एक गीत. सगळ्या नटांनी मिळून म्हटलेलं. आणि प्रत्येक गीताचा एकच सूर– 'जग गरीब आहे, माणूस वाईट आहे आणि गुन्हेगारी, लूटमारी हा मानवी जीवनाचा आधार आहे.'

ब्रेख्टच्या अजरामर नाटकांपैकी एक नाटक म्हणजे, 'द गुड पर्सन ऑफ सेझ्वान' (सेझ्वानमधील एक सज्जन व्यक्ती). १९३८ ते १९४१ या काळात लिहिलेलं हे नाटक. म्हणजे 'द थ्रीपेनी ऑपेरा' नंतर दहा वर्षांनी. तरी मूळ विषय तोच आहे. गरीबी. या नाटकातलं एक दृश्य शहारे आणणारं आहे–पाणक्या वँग एका सुताराच्या छोट्या मुलाला शेन ते या सज्जन स्त्रीकडे घेऊन येतो. (शेन ते ही सेझ्वानमधली एक वेश्या. पण देव 'सज्जन व्यक्ती' म्हणून तिचीच निवड करून जातात. हा ब्रेख्टच्या उपरोधाचा कचकचीत लचका! अविस्मरणीय!) वँग तिला सांगतो की, सुताराचं ते पोरगं 'उपाशी आहे. त्याला तूच वाचवशील, म्हणून तुझ्याकडं आणलंय्...' शेन ते त्या पोराचा स्वीकार करते आणि त्याची काळजी घ्यायचं ठरवते. त्या पोराचा हात धरून त्याला फुटलाइट्स्जवळ आणते आणि प्रेक्षकांना म्हणते–

'बघा हो! कुणीतरी आश्रयासाठी भीक मागतंय्!
हा उद्याचा तुकडा तुमच्याकडे आजच्या चतकोराची
भीक मागतोय!'

इतक्यात कुणी कुणी येतं आणि त्यांच्याशी बोलण्यात तिचं त्या पोराकडं घडीभर दुर्लक्ष होतं. तेवढ्यात ते पोरगं जवळच्या कचरापेटीकडं जातं, दोन्ही हातानं कचरा चिवडतं आणि काहीतरी खायचं हाताला लागतं ते घेऊन खाऊ लागतं. शेन ते च्या ध्यानात येताच ती चटकन त्या पोराला कडेवर घेते, पुन्हा प्रेक्षकांकडं वळते, 'गरीबांच्या पोरांचे बघा हे हाल' म्हणून त्याचं खर्कट तोंड सर्वांना दाखवते.

असे शहारे आणणारे प्रसंग त्याच्या नाटकानाटकांतून विखुरलेले आहेत. सगळ्या नाटकांचा गाभा एकच–गरीबाविषयी कळवळा आणि भाकरीच्या चतकोरासाठी जगाच्या मंडईत चाललेला माणुसकीचा विक्रा. 'आपण हे जग बदलून टाकूया' हे त्याच्या नाटकातून वरचेवर येणारं पालुपद. यामुळं त्याच्यावर साम्यवादी आणि मार्क्सवादी असा शिक्का बसला. पण तो साम्यवादी पक्षाचा कधीही कसलाही– आपल्याकडच्या भाषेत सांगायचं म्हणजे, साधा चार आण्याचाही– सभासद नव्हता. तरी त्याची जिथेतिथे ससेहोलपट झाली. त्याच्या एका नाटकाचा प्रयोग रशियात एका लहानशा गावातल्या नाट्यगृहात झाला. तर ते नाट्यगृह आणि ती नाटककंपनी 'बूर्झ्वा' आहे म्हणून स्टॅलिननं बंद करून टाकली. ब्रेख्ट हा 'बूर्झ्वा' नाटककार आहे असं स्टॅलिनचं अखेरपर्यंत मत होतं. शेवटी पूर्व बर्लिनमध्ये त्यानं आपली अखेरची आठ वर्षं घालवली, तिथल्या साम्यवादी राजवटीशी जमवून घेतलं–(अर्थात पोटासाठी! जून १९३३ ते ऑगस्ट १९४७ ही श्रीरामचंद्राच्या वनवासाइतकी चौदा वर्षं त्यानं हद्दपारीत, परकीयांच्या जगात, अर्धपोटी राहत घालवली होती. आणि युद्ध संपल्यानंतर पूर्व बर्लिनमध्ये त्याला नाटककंपनी उभारण्यासाठी भरपूर पैसा राज्य सरकारनं देऊ करून बोलावलं तेव्हा तो स्वतःच्या, बायकोच्या, दोघा मुलांच्या पोटासाठी मूग गिळून तिथं आठ वर्षं राहिला, एकही नवं नाटक लिहिलं नाही, फक्त आपल्या आणि इतरांच्या नाटकांचे प्रयोग केले, यात काय बिघडलं?)–म्हणून त्याला 'स्टॅलिन शांतता पारितोषिक' मिळून गेलं असाव.

ब्रेख्टच्या व्यक्तिमत्त्वातला हा अंतर्विरोध त्याच्या देशाच्या आणि त्याच्या काळातल्या वादळी राजकीय परिस्थितीमुळं निर्माण झाला असावा. दोन भीषण महायुद्धं, रशियात झालेली एक विराट क्रांती, त्या क्रांतीचे यूरोपभर आणि विशेषतः जर्मनीत उठलेले उग्र पडसाद– या भीषण संहारविश्वात त्यानं आपली कल्पकता, प्रतिभा, शाबूत ठेवली हे मोठंच अनाकलनीय आश्चर्य आहे. जणू हिमवादळं, भूकंप आणि महापूर यांच्या आक्रमक हल्ल्यानंतरही, एखाद्या कोसळलेल्या प्रचंड वृक्षाला आलिंगून राहिलेली वेल पानाफुलांनी बहरत रहावी अशी ही ब्रेख्टची चिरंजीव प्रतिभा. एका कवितेत तो म्हणतो–

'मी पाहतो हल्ला हिमवादळांचा
मी पाहतो भूकंप गालिच्यासारखे उलगडत येणारे
मी पाहतो पर्वत रस्त्यात मधोमध उभे
आणि नद्या मी पाहतो दोन्ही तीर फोडून उसळणाऱ्या.
पण हिमवादळांच्या डोक्यावर आहेत हॅट्स्
भूकंपांच्या खिशात आहेत नोटांची बंडलं
पर्वत तर थेट मोटारीतून आले आहेत
आणि उसळत्या नद्या पोलिसांवर नियंत्रण करताहेत.'

ब्रेख्टचा जन्म झाला जर्मनीतल्या बव्हेरिया या राज्यातल्या ऑक्सबर्ग या गावी. (१० फेब्रुवारी, १८९८.) त्यावेळी ऑक्सबर्ग हे एक लहानसं निसर्गरम्य गाव होतं. नंतर वीसएक वर्षांत ते एक प्रचंड औद्योगिक शहर झालं. याच ऑक्सबर्गमध्ये रूडॉल्फ डिझेल याने प्रारंभी आपली डिझेल इंजिनं बनविण्याचा कारखाना सुरू केला होता.

याच बव्हेरिआच्या राजधानीत—म्युनिकमध्ये—२५ फेब्रुवारी १९२० रोजी नाझी पक्षाची स्थापना झाली. नव्वद टक्के बव्हेरिअन जनतेनं नाझी पक्षाला पाठिंबा दिला होता. हे एक ठळक राजकीय वैशिष्टच. ब्रेख्ट बव्हेरिअन असून त्याचा पाठिंबा नव्हता. हिटलरला दातओठ खायला दुसरं काय पाहिजे होतं?

नैसर्गिक दृष्टिकोनातून बव्हेरिया हा एक अफलातून प्रदेश आहे. जिकडं बघावं तिकडं घनदाट अरण्य आणि आल्प्स् पर्वताच्या रांगाच रांगा. उघडेबरड डोंगर, तुटके टकमक कडे आणि डॅन्यूब नदीचा दगडाळ पात्रातून आवेशपूर्ण खळखळाट! आल्प्स पर्वताचं सर्वांत उंच शिखरसुद्धा बव्हेरिआमध्येच आहे. गर्दीपासून दूरदूर, राजकीय, सामाजिक किंवा सांसारिक व्यापातापापासून दूर दूर चार दिवस जाऊन राहावं असं कुणाला वाटलं, तर त्यानं खुशाल बव्हेरिआची वाट धरावी. हिटलरनंसुद्धा स्वतःसाठी निवांत असा एक बंगला बव्हेरिआत बांधला होता.

अशा या उघड्याबरड, घनदाट अरण्यांच्या, किर्र हिंस्र प्रदेशात ब्रेख्टचा जन्म झाला. 'विचारा बी. बी.' म्हणून ब्रेख्टनं स्वतःविषयी एक कविता लिहिली आहे. या कवितेत तो म्हणतो—

'मी, बरटॉल्ट ब्रेख्ट, किर्र काळोख्या अरण्यातून आलो आहे
माझ्या आईनेच मला घाईघाईने या शहरातून आणून
सोडले आहे—
मी तिच्या देहात पहुडलो असतानाच. आणि त्या अरण्यांच्या
थंडीचा कडाका
माझी सोबत करील माझं आयुष्य संपेपर्यंत...'

ब्रेख्टच्या जन्मस्थानाचा त्याच्या नाटयलेखनावर कुठे परिणाम झालेला दिसत नाही असे एक टीकाकार म्हणतो. मला तसे वाटत नाही. उलट त्याच्या कवितांतून, नाटयांतून आणि गीतांतून जो एक धीटपणा, उघडा बेरडपणा, हिंस्रपणा दिसतो तो या प्रदेशातलंच पाणी दाखवतो. 'बॅल' या त्याच्या पहिल्यावहिल्या नाटकाचा नायक जे मुक्त, नीतिअनीतीच्या पलीकडचं जीवन जगतो, ते जीवन, तसलं बेगुमान जीवन ब्रेख्टनं बव्हेरिआतच पाहिलं असलं पाहिजे. हा नायक बॅल जसा कवी आहे तसा खुनीही आहे. जसा गमत्या आहे तसा प्रेम आणि प्रणयाच्या बाबतीत पशू शोभावा इतका मुक्त आहे (तो एकाच वेळी दोन दोन स्त्रियांबरोबर झोपतो, मित्राचा खून करतो, आकाशातल्या चांदण्या पाहिल्यावर उघड्यावर—रंगभूमीवर—लघवी करतो!)

आपल्या जन्मगावाबद्दल ऑक्सबर्गबद्दल एक कथा (ही बहुतेक हकिकत असावी) ब्रेख्ट नेहमी आपल्या शाळासोबत्यांना सांगत असे. ऑक्सबर्गच्या लोकांना एका माणसाबद्दल भलताच प्रेमोत्साह वाटायचा, अगदी पूजनीय, वंदनीय वाटायचा तो माणूस त्या गावाचा कित्येक वर्षं तो एक 'हीरो'च होऊन गेला होता आणि असा तो माणूस होता तरी कोण?—तर तो होता एक अट्टल गुन्हेगार—एक निर्दय खुनी! दुसऱ्याला यातना देण्यात (सॅडिझम्) किंवा स्वतःलाच यातना करून घेण्यात (मॅसोकिझम्) माणसाला जे सुख होतं ते या लोकांच्या प्रवृत्तीत ब्रेख्टला दिसलं, आणि सबंध व्यक्तिपूजेबद्दलच त्याच्या मनात एक खोल किळस निर्माण झाली. ब्रेख्टनं नाटयप्रयोगांची एक नवी शैली निर्माण केली. तिचं वैशिष्टच आहे दूरीकरण—'distancing', परकीयीकरण—'estrangement', या नव्या शैलीचं मूळसुद्धा या घृणेत, या किळसभावनेत आहे. प्रेक्षकांनी नाटकात दाखवलेल्या भावनांबरोबर वाहवत जाऊ नये, ते सत्य नसून नाटक आहे हे नेहमी ध्यानात ठेवावं असं त्याचं सांगणं असे. म्हणून 'ड्रम्स इन द नाइट्' या त्याच्या नाटकाचा पहिलाच प्रयोग म्युनिकमध्ये १९२२ साली झाला तेव्हा नाटयगृहात सगळीकडे फलक लावून ठेवले होते—'उगीच भावविवश होऊन टकाटका बघू नका...'

'ड्रम्स इन द नाइट' या नाटकालासुद्धा कुर्टवीलचं संगीत होतं—आणि नेपथ्य होतं ब्रेख्टचा कॉलेजमित्र कास्पर नेहेर याच. या नाटकाला विख्यात नाटयसमीक्षक हर्बर्ट झेरिंग यानं त्या सालचं क्लाइस्ट पारितोषिक बहाल केलं. या झेरिंगनं ब्रेख्टला आयुष्यभर साथ, सहकार्य केलं. नाटककार म्हणून त्याला नावारूपाला आणण्यात झेरिंगचा सिंहाचा वाटा आहे. क्लाइस्ट पारितोषिक मिळालं आणि ब्रेख्टच्या नाटयलेखन प्रवासाला एकदम गती आली.

'ड्रम्स इन द नाइट' या नाटकाचा विषय आहे युद्ध. प्रीती आणि नीती! हे विषय ब्रेख्टच्या अनेक नाटकांचे कथागर्भ (Themes) झाले आहेत. १९१८ मध्ये, वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी, ब्रेख्टला शाळा सोडून सैन्यात भरती व्हावं लागलं होतं. पहिल्या महायुद्धाचं ते शेवटचं वर्ष होतं आणि भयंकर अमानुष प्रकारांनी सगळा युरोप खदखदत होता. जर्मन सैन्याच्या आरोग्य विभागात ऑर्डर्ली म्हणून ब्रेख्टनं काम केलं माणुसकी, दया, सहानुभाव, नीती, सत्य इत्यादी सगळ्या मानवी नीतीमूल्यांचे सडून गेलेले मुडदे त्यानं कोवळ्या डोळ्यांनी पाहिले. राजपुत्र सिद्धार्थासारखंच त्याचंही मन हेलावून गेलं आणि म्हणून 'ड्रम्स इन द नाइट' या नाटकात नायक केला अशा एका जवानाला की, ज्याचा संपूर्ण भ्रमनिरास झालेला आहे

---

पाश्चात्य रंगभूमी हलवून आणि हादरवून सोडणाऱ्या एकूण सहा नाटककारांची ओळख प्रा. शांताराम शिंदे करून देत आहेत. लुइजी पिरँदेलो आणि जाँ अनूई या नाटककारांची ओळख गेल्या दोन अंकात त्यांनी करून दिली. बरटॉल्ट ब्रेख्टवरील हा तिसरा लेख. यानंतर आता काही काळ विश्रांती. पुढील तीन लेख लवकरच प्रसिद्ध होतील.

---

आणि जो युद्धाला आणि कोणत्याही प्रकारच्या संघर्षाला पुरा कंटाळून गेलेला आहे.

परंतु हे नाटक त्या वेळच्या जर्मनीतल्या आविष्कारवादी ( expressionist ) नाटकासारखं साचेबंद नाही, किंवा हुळहुळीत हळवं वास्तववादी नाही. रंगभूमीच्या प्रवासातला पिरँदेलोचा टप्पा ब्रेख्ट विसरला नव्हता. म्हणून त्यानं युद्धावरून परत आलेल्या जवानापुढं—नाटकाच्या नायकापुढं—उभी केली त्याची वाग्दत्त वधू. जिनं त्याच्या गैरहजेरीत एका काळाबाजारवाल्याबरोबर संबंध ठेवले होते. त्याच्यापासून तिला दिवसही गेलेले होते. चिडून नायक तिचा त्याग करतो, तिच्या बापाबरोबर आणि दारू पिऊन तर्र झालेल्या तिच्या काळाबाजारवाल्याबरोबर भांडतो. अचानक ड्रम वाजू लागतात आणि वर्तमानपत्रांच्या कार्यालयावर धडक देण्यासाठी संतप्त तरुणांचा मोर्चा रस्त्यातून धावत निघतो. नायक त्यांच्यात सामील होतो. त्याची प्रेयसी त्याच्या मागे जाते, कारण घडीभर प्रतारणा केली असली तरी, तिचं खरं प्रेम त्याच्यावरच असतं. पहाटे पहाटे दोघांची रस्त्यातच गाठ पडते आणि तो संघर्षाला कंटाळून परत फिरतो. ती दोघं मग परस्परांना प्रेमालिंगन देतात आणि घरी परत जातात.

या नाटकाचा विषयच सांगतो की, त्या वेळच्या सर्वच बुद्धिवादी तरुणांप्रमाणं ब्रेख्टचा कलसुद्धा हळूहळू नव्या नीतीमूल्यांच्या, नव्या राज्यव्यवस्थेच्या, नव्या समाजव्यवस्थेच्या शोधाकडं झुकू लागला होता. स्टीफन स्पेंडर या इंग्रज कवीनं 'वर्ल्ड विदिन वर्ल्ड' या आपल्या आत्मचरित्रात तत्कालीन जर्मन तरुणांच्या मनोवृत्तीचं नेमकं चित्र रेखाटलेलं आहे. तो म्हणतो, 'आमच्या माहितीतले जवळ जवळ सगळेच जर्मन तरुण डाव्या विचारसरणीचा स्वीकार आणि प्रचार करू लागले होते. या डाव्या प्रवृत्तीचा परिणाम नाट्य, चित्रपट आणि कादंबरी यांच्यावर तर झालाच परंतु त्यातून चित्र आणि संगीत या कलाही सुटू शकल्या नाहीत...माझ्यापुरतं सांगायचं तर, मीसुद्धा बेकारांची कीव करायचा, मला सामाजिक अन्यायांची खंत वाटायची, युद्धापेक्षा शांतताच हवी असं ठामपणानं वाटायचं, आणि माझी मतं समाजवादी प्रणालीची होती...' ( अर्थात् स्टॅलिनची राजवट सुरू होऊन पोलादी पडद्याआडचं राजकारण रशियात सुरू होताच, यातल्याच ख्यातनाम झालेल्या बुद्धिवाद्यांनी 'द गॉड दॅट फेल्ड '(' न पावलेला देव ')या पुस्तकात साम्यवादाचा आणि डाव्या मतप्रणालीचा निषेध नोंदवून ठेवला आहे हे इथे लक्षात ठेवले पाहिजे.)

परंतु ब्रेख्टनं १९२९ पर्यंत साम्यवादी विचारसरणीचा स्वीकार केल्याचं दिसत नाही. तो सच्चा कलावंत होता, अस्सल प्रतिभावंत होता. कोणत्याही गोष्टीचा किंवा तत्त्वाचा नीट पारखल्याशिवाय, त्याच्या पोटात खोल शिरून ते पक्के तपासल्याशिवाय स्वीकार करावयाचा नाही ही खऱ्या प्रतिभावंताची जन्मजात प्रवृत्ती त्याच्याही अंगीमनी होती. १९२४ मध्ये तो म्युनिक सोडून बर्लिनमध्येच कायमचा राहायला गेला तेव्हा त्यानं मार्क्स वाचायला आणि मार्क्सवादाचा गंभीरपणानं अभ्यास करायला सुरुवात केली हा सुद्धा पारखण्याचाच एक ठामठोक प्रकार होता.

ब्रेख्ट बर्लिनमध्ये गेला तो मात्र वेगळ्याच कारणासाठी. नाटककार म्हणून तो तिथं गेला. बर्लिन हे जर्मन नाट्यव्यवसायाचं केंद्र होतं. तिथं आपल्या नाट्यलेखनाचा कस लागावा ही त्याची इच्छा होती. त्याचप्रमाणे नाट्यलेखन, अभिनय, प्रयोग आणि प्रेक्षकांचा प्रतिसाद यांविषयी जे नवे सिद्धान्त त्यानं कल्पून ठेवले होते त्यांना बर्लिनमध्येच पुरेसा वाव मिळेल हा हेतूही त्याच्या मनात होता. 'दी ड्रम्स इन द नाइट' या नाटकानं त्याला आघाडीच्या नाटककारांत मानाचं स्थान मिळवून दिलेलंच होतं. त्यामुळं बर्लिनमध्ये गेल्यावर मॅक्स राइनहार्ट या प्रसिद्ध निर्मात्याच्या कंपनीत— ड्यूशेस थिएटरमध्ये त्याला सहाय्यक नाटककार म्हणून काम करण्याची संधी मिळाली. १९२१ ते १९२४ या काळात त्यानं म्युनिकमध्ये 'म्युनिक थिएटर' या कंपनीत नाटककार म्हणून काम केलं होतंच. या तीन वर्षांत त्यानं आपल्या नव्या शैलीचे प्रयोगही तिथं केले होते. या बाबतीत त्याला त्याचा म्युनिच युनिव्हर्सिटीतला मित्र लायन फुश्टबॅंगर याची खूपच मदत झाली होती. लायन स्वतःच निर्माता झाला होता. त्यामुळं नाट्यव्यवसायातली अनेक प्रमुख मातब्बर मंडळी त्याच्या ओळखीची झाली होती. या ओळखीपाळखींचा उपयोग त्यानं ब्रेख्टसाठी केला...

## ब्रेख्टची मुक्त रंगभूमी ( Epic Theatre )

ब्रेख्टच्या तारुण्यात जर्मनीत आविष्कारवादी (Expressionist) आणि नैसर्गिकतावादी (Naturalist) रंगभूमी जोरात होती. कथावस्तू वास्तव असली पाहिजे, तिचा व्यवस्थित विकास तीन अंकांत दाखवला पाहिजे, नटांनी पात्राभिनय भूमिकेशी एकरूप होऊन केला पाहिजे, संवाद नीटस, प्रौढ सुसंस्कृत भाषेत लिहिलेले असले पाहिजेत, एकदा गद्य नाटक म्हटले की ते गद्यच असले पाहिजे— त्यात गीतसंगीत घालून खिचडीवजा लेखन करू नये, इत्यादी संकेतांनी बांधलेली ही रंगभूमी होती. या प्रकारच्या रंगभूमीचा जनक इब्सेन. जर्मनीत या प्रकारानं नाटकं लिहून श्रेष्ठ नाटककाराचा सन्मान पावलेला हॉपमान यानं नोबेल पारितोषिक मिळवलेलं. या प्रकाराला प्रेक्षकांची प्रतिक्रिया कशी ? तर— 'वा ! काय अभिनय केलाय ! तो नुसती भूमिका करीत नाही तर ती भूमिका तो जगतोय, अक्षरशः जगतोय !'... 'माणसं थेटरात ढसढसा रडली राव !'... 'नटी काय देखणी आहे यार ! अभिनय फारसा येत नाही, पण दिसते काय ! फ्रीजमधून काढलेलं सफरचंद कसं असतं ? बास्स ! तशी ताजी, टवटवीत,... ' वगैरे वगैरे ! अशा प्रकारच्या नाट्यप्रयोगांना पहिला धक्का दिला पिरँदेलोनं ! तो धक्का पुरेसा झाला नाही म्हणून की काय, ब्रेख्टला पुन्हा एकदा माचाण ठोकून बंदूक ठासावी लागली. त्यानं सरळ सरळ बंडाचा झेंडाच फडकवला. काव्यशास्त्रात आणि नाट्यशास्त्रात गुरूंचा गुरू म्हणजे ॲरिस्टॉटल. शोकान्तिका हा ॲरिस्टॉटलच्या दृष्टीनं सर्वश्रेष्ठ नाट्यप्रकार, आणि शोकान्तिकेमुळं दया आणि भीती या दोन भावनांचं विरेचन झाल्यानं होणारा आनंद हा सर्वश्रेष्ठ कलात्मक आनंद. ब्रेख्टनं इथंसुद्धा बंदूक ठासून बार उडवला. त्यानं शोकान्तिकाच अमान्य करून टाकली. नाटकं सुखान्तच असली पाहिजेत असा त्यानं सप्रयोग आग्रह धरला. या बाबतीत भारतीय नाट्यशास्त्राच्या जवळपास, भरतमुनींच्या नाट्यशास्त्राच्या जवळपास त्याचे विचार आलेले दिसतात.

नटांनीसुद्धा आपण भूमिका जगतो बिगतो असला खोटेपणा सोडून द्यावा. स्वतःला विसरू नये. उलट अधूनमधून प्रेक्षकांशी बोलावे, स्वतःच्या रूपात, लेखकाचे संवाद म्हणताना अधूनमधून 'असे हा नायक म्हणतो' 'असं ती म्हणाली' असं म्हणावं आणि भूमिकेपासून स्वतःला अलग ठेवावं. नेपथ्य अगदी साधं, प्रतिकात्मक असावं—

घबघबा म्हणजे अगदी घबघबाच, तुलसीवृंदावन म्हणजे हुबेहूब तुलसीवृंदावन असं असू नये, ('कॉकेशिअन चॉक सर्कल'मध्ये नदी दाखवताना रंगमंचावर लव्हाळ्यांच्या दोन ओळी ब्रेख्टनं ठेवून दिल्या होत्या, त्यांच्या डावीकडे ग्रुशा आणि उजवीकडे तिचा प्रियकर असे दृश्य मांडले होते,) नाटक चालू असताना प्रेक्षकांनी नाटकातल्या भावदर्शनात स्वतःला विसरू नये म्हणून ब्रेख्ट अगदी महत्त्वाच्या प्रसंगी वरून मोठेमोठे फलक रंगमंचावर सोडत असे, त्यावर चालू घडामोडी लिहिलेल्या असत किंवा बायबलमधल्या दहा आज्ञांपैकी एखादी आज्ञा लिहिलेली असे, किंवा एकदम लाउडस्पीकरवरून एखादे पात्र नाटकातल्या प्रसंगावर भाष्य करू लागत असल्याचे दाखवून प्रसंगाची उत्कटता खंडित करीत असे, किंवा निवेदक उत्कट प्रसंगी आपले निवेदन उच्च स्वरात करीत असे, किंवा रंगमंचावर लावून ठेवलेल्या पडद्यावर फिल्मचे तुकडे दाखवले जात—

('सेंट जोन ऑफ द स्टॉकयार्ड्स्') या नाटकाच्या शेवटी जोआना डार्क मरते. परंतु शोकान्तिकेचा परिणाम खोडून टाकण्यासाठी ब्रेख्टने शेवटी लाउडस्पीकर वापरला आणि त्यांच्यावरून १९३० ते १९३५ मध्ये झालेल्या महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय घटना एकामागोमाग एक जाहीर केल्या— इंग्लंडच्या पौंडाचे अवमूल्यन, ब्राझीलमध्ये कॉफी फार झाली म्हणून जाळून टाकली, अमेरिकेत बड्या उद्योगपतींनी धान्याच्या बोटी समुद्रात बुडवून टाकल्या, वगैरे... जणू त्याला म्हणायचं होतं की, जोआना डार्क मेली म्हणून रडू नका! अहो ते तर नाटक! खोटं! तुम्हाला खरोखर रडाचिडायचं असेल तर, तुमच्या अवतीभोवती प्रत्यक्ष काय चाललंय ते पहा. ऐका!)

एकूण ब्रेख्टच्या मुक्त रंगभूमीची महत्त्वाची तीन वैशिष्ट्ये. (१) घाटबंद कथेऐवजी (Plot ऐवजी) कादंबरीतल्या पद्धतीनं प्रसंगांच्या साखळीतून, निवेदनाच्या पद्धतीनं पुढं सरकणारी गोष्ट (कथा नव्हे!), (२) स्वतःला न विसरता केलेला अभिनय, आणि (३) प्रेक्षकांनी कथेबरोबर वाहत न जाता 'अलिप्त राहून चिंतन करावे' अशी प्रक्रिया.

मुक्त रंगभूमीद्वारा साधावयाचा मुख्य परिणाम — 'दूरीकरण' — distancing किंवा estrangement.

म्युनिकमधल्या चार वर्षांत आपल्या मुक्त रंगभूमीच्या सिद्धान्ताचे प्रयोग करायला ब्रेख्टला भरपूर वाव मिळाला.

१९२४ साली तो बर्लिनला आला आणि तिथे मात्र त्याच्या 'मुक्त रंगभूमी'ची भरपूर टिंगलच झाली. राईनहार्टच्या कंपनीत त्याच्याच आगेमागे साहाय्यक नाटककार म्हणून लागलेल्या कार्ल झुकमेयरनं ब्रेख्टबद्दल १९४८ मध्ये एक लेख लिहिला. त्यात तो म्हणतो— 'ब्रेख्ट तिथे क्वचितच यायचा. अंगात नेहमी एक कातडी जॅकेट, त्याची बटनं लावली नसल्यानं त्याचे फडफडणारे पंखे, असा तो कधी आला की, एखाद्या ट्रकड्रायव्हरसारखा दिसायचा — किंवा एखाद्या जेसुइट धर्मपंथाच्या पुरोहितासारखा. सरधोपटपणानं बोलायचं, तर त्याला आमच्या कंपनीचा संपूर्ण ताबा हवा होता. अगदी सर्वाधिकार. त्याच्याच सिद्धान्ताप्रमाणं सगळे नाट्यप्रयोग झाले पाहिजेत असा त्याचा आग्रह असायचा. रंगभूमीला 'मुक्त—धूम्रपान—गृह' असं नवं नाव द्यावं असं त्याचं म्हणणं असायचं. प्रेक्षकांना धूम्रपान करायला परवानगी दिली म्हणजे ते कथाप्रवाहाबरोबर वाहवत न जाता, अलिप्त राहून विचार करू शकतील असं त्याचं म्हणणं असायचं. हे अर्थातच कुणाला मान्य व्हायचं नाही. आणि मग तो फक्त पगार घेण्यापुरता तेवढाच तिथं हजेरी लावायचा...'

याच वेळी बर्लिनमध्ये 'कोमोदी' हे नवं नाट्यगृह बांधून पूर्ण झालं आणि या नाट्यगृहात राइनहार्टन स्वतःच लागोपाठ दोन वर्षांच्या हंगामात नव्या पद्धतीनं नाटकं बसवली. त्यात शेक्सपीअरची नाटकं होती तशीच पिरँदेलोचीही नाटकं होती. या प्रयोगांचं वैशिष्ट्य म्हणजे नटनट्या मोकळेपणानं सर्व प्रेक्षकांसमोर प्रॉम्प्टरबरोबर गप्पा मारत. स्वतःच्या भूमिकेची चर्चा करीत. त्याचा दोस्त कास्पर नेहेर हाही आता तिथं नोकरीला लागला होता आणि त्यानं — विशेषतः शेक्सपीअर आणि पिरँदेलो यांच्या नाट्यप्रयोगांना दिलेलं नेपथ्य ब्रेख्टच्या कल्पनाशक्तीला नवं चैतन्य देऊन गेलं.

जर्मन रंगभूमीवरची ही दोन वर्षं ब्रेख्टच्या दृष्टीनं अगदी मस्त अशीच होती. राइनहार्टसारखा निर्माता नवं वळण स्वीकारू लागला होता हे एक कारण आणि दुसरं महत्त्वाचं कारण म्हणजे हेलन वीगल हिच्याशी ब्रेख्टचा झालेला परिचय. हेलन वीगल आंतरराष्ट्रीय कीर्तीची नाट्यतारका होती. तिची अभिनयाची समज, निर्मिती मूल्यांवरची पकड आणि पिरँदेलोनं जन्म दिलेल्या नव्या रंगभूमीची आजउद्याची वाटचाल याबद्दलची तिची श्रद्धा आणि निष्ठा अविचल आणि डोळस होती. अर्थातच ब्रेख्ट आणि हेलन विचारांची देवाणघेवाण करता करता हृदयमनांची देवाणघेवाण करून बसले — आणि १९२८ मध्ये विवाहबद्ध झाले.

यापूर्वी १९२५-२६ च्या सुमाराला ब्रेख्टनं क्रीडाक्षेत्राकडं मोर्चा वळवला. सॅम्सन-कोर्नर या विख्यात बॉक्सिंगपटूची आणि त्याची बघता बघता दोस्ती झाली. आणि बॉक्सिंगरिंगप्रमाणं आपली रंगभूमी असली पाहिजे असा त्यानं नवाच ध्यास घेतला. आपल्या मुक्त रंगभूमीबद्दल त्यानं बर्लिनच्या आघाडीच्या नियतकालिकातून लेख लिहिले आणि 'क्रीडाक्षेत्रातली उत्तम तत्त्वं नाट्यप्रयोगांना कशी लावावीत' या नावाचाही एक लेख लिहून नाट्यक्षेत्रात खळबळ उडवून दिली. बॉक्सिंगपटू सॅम्सन-कोर्नर, नेपथ्यकार कास्पर नेहेर, इलिसाबेथ हॉपमन यांना मदतीला घेऊन त्यानं आपल्या 'थ्रीपेनी ऑपेरा' 'दुसरा एडवर्ड' अशा नाटकांचे आणि इतर मित्रांच्या नाटकांचे आपल्या सिद्धान्ताप्रमाणे 'मुक्त' (epic) प्रयोग केले. साध्या कापडाचा अर्ध्या उंचीचा पडदा, प्रत्येक दोन प्रयोगांच्या मध्ये नाटकाची कथा सांगणारी गाणी, मोठमोठे मुखवटे लावलेले नट, त्यांच्या अंगावरचे धुळीनं, रक्तानं मळलेले डागळलेले कपडे, मंद प्रकाशाऐवजी रंगमंचावर प्रत्येक कानाकोपऱ्यात लख्ख उजेड. नटनट्या लाकडी घोड्यावरून चालत यायचे, त्यामुळं दहादहा फूट उंचीचे ते राक्षसी अवतारच वाटायचे. लाकडी घोड्यावरून चालताना तोल जाऊ नये म्हणून रंगमंचावर इथून तिथपर्यंत आडव्या तारा बांधलेल्या असायच्या आणि राक्षसकाय नट त्या तारांना लोंबकळत प्रवेश करायचे. 'सभ्य स्त्रीपुरुष हो — (की मायबाप प्रेक्षक हो?) — तुम्ही पाहताय ते फक्त नाटक आहे, खरं नाही, उगीच डोक्याला ताप करून घेऊ नका' असं ओरडून सांगणाऱ्या या सगळ्या 'मुक्त' युक्त्या होत्या. 'छाती दडपून टाकणारे प्रयोग' असं एका रशियन नाटककारानं त्यांचं वर्णन केलंय्.

या प्रयोगांच्या परीक्षणांनी स्पेनपासून सायबेरियापर्यंत एकच खळबळ माजवून सोडली. 'बर्ट ब्रेख्ट' हे नाव ज्याच्या त्याच्या तोंडी झालं. व्यावसायिक रंगभूमीवर समाधानानं, तृप्तीनं वावरणाऱ्या निर्मात्यांच्या, नटांच्या, नेपथ्यकारांच्या, संगीतकारांच्या पोटात गोळा उठला की, आता आपलं कसं व्हायचं? एका निर्मात्याला ब्रेख्टनं बजावलं—'सेटिंगबिटिंग विसरा आता. एक प्लॅटफॉर्म, चारदोन खुर्च्याटेबलं, पडदा अडकवायला एखादा लाकडी बांबू आणि

एखादं चित्र लावायला भिंतीचा एखादा तुकडा. एवढं बस्सं झालं. जपानी कंदिलासारखी स्वच्छ सुटसुटीत रंगभूमी मला पाहिजे. तुमच्या बटबटीत नेपथ्याची मला गरज नाही...'

ब्रेख्ट इकडं असा वाढत होता आणि तिकडं जर्मनीच्या राजकीय रंगमंचावर प्रचंड उलथापालथ होऊ लागली होती. हिटलर हळूहळू सगळी सत्ता काबीज करीत निघाला होता. चार्ली चॅप्लिनच्या 'द ग्रेट डिक्टेटर' या चित्रपटात हिटलर टेबलावर उताणा पडलाय आणि आपल्या पायाच्या बोटावर जगाचा मोठा गोल गरगरा फिरवतोय असं एक अत्यंत बोलकं दृश्य आहे. तशी स्वप्नं हिटलरला पडायला लागली होती यात शंकाच नाही. जर्मनीमध्ये डाव्या विचारसरणीच्या शक्तीसुद्धा हळूहळू जोर करू लागल्या होत्या. त्यांच्यावर हिटलर लक्ष ठेवून होता.

## साम्यवादी तत्त्वज्ञानाचा पुरस्कार

हेलन वीगलशी लग्न झाल्यानंतर दोन वर्षांच्या आतच ब्रेख्टनं मार्क्सवादी-साम्यवादी तत्त्वांची बांधिलकी स्वीकारलेली दिसते. तो पक्षाचा सभासद झाला नाही. झाला असल्यास त्याबद्दलचा पुरावा उपलब्ध नाही. परंतु १९२९ नंतर त्यानं बोधवादी नाटकं लिहून त्यांचे प्रयोग करायला सुरुवात केली. भांडवलशाहीच्या दुःखावर साम्यवाद हाच एकमेव इलाज आहे असं त्याकाळी सर्वांनाच वाटत होतं. म्हणून साम्यवादाचा—मार्क्सवादाचा प्रचार करणारी नाटकं ब्रेख्टनंसुद्धा लिहिली यात काहीच वावगं झालं नाही. मॅक्झिम गॉर्की या श्रेष्ठ रशियन लेखकाच्या 'द मदर' या कादंबरीवर आधारित 'द मदर' याच नावाचं नाटक ब्रेख्टनं लिहिलं. त्यातली प्रमुख—'मदर'ची—भूमिका हेलन वीगलनं केली. साम्यवादी विचारसरणीचा प्रचार करण्यासाठी हे नाटक जरी लिहिलं असलं, तरी त्यातल्या रुक्ष शब्दाशब्दांतून ब्रेख्टचं कविमन, त्याची प्रतिभा आपल्या चैतन्यमय स्पर्शखुणा उमटवून गेलेली आहे. याच काळातलं त्याचं आणखी एक महत्त्वाचं नाटक म्हणजे 'सेंट जोन ऑफ द स्टॉकयार्डस्' या नाटकाचा प्रयोग लगेच झाला नाही, परंतु ते बर्लिन रेडिओवरून ध्वनिक्षेपित करण्यात आलं. शिकागोमध्ये साम्यवादी पक्षाचे लोक बंडाळी करून तिथले सगळे कारखाने बंद करण्याचा प्रयत्न करतात. जोआना डार्क ही तरुण मुलगी ते बंड मोडून काढते. परंतु शेवटी—मरण्यापूर्वी चार-दोन घटका—तिला कळून चुकतं की, भांडवलशाही-मध्येच जास्त भ्रष्टाचार आहे. यातला नाझीविद्रोह स्पष्ट होता. त्यामुळेच १९३३ मध्ये ब्रेख्टला हद्दपार व्हावं लागलं आणि १९३५ मध्ये हिटलरनं त्याचं जर्मन नागरिकत्व रद्द करून टाकलं.

हद्दपारीच्या काळात ब्रेख्टनं जी नाटकं लिहिली त्यानं जागतिक नाट्यक्षेत्रात एक महान नाटककार असा लौकिक त्याला मिळवून दिला. 'मदरकरेज आणि तिची मुलं', 'गॅलिलिओ', 'सेत्झुआन येथील एक सज्जन व्यक्ती', आणि 'हर्र पंटिला आणि त्याची नोकर मॅटी' ही ती चार नाटकं.

'मुक्त रंगभूमी'च्या त्याच्या कल्पनेला जपानी नाटकांनी जसं खतपाणी घातलं तसंच एका चिनी नटाच्या परिचयानंही त्या कल्पनेला बळकटी आणली. १९३५ मध्ये ब्रेख्टनं (हद्दपारीच्याच काळात) मॉस्कोला भेट दिली. तिथे प्रख्यात चिनी नट मेई-लॅन-फँग याची आणि त्याची ओळख झाली. मागे फक्त एक पडदा अशा उघडयाबोडक्या रंगभूमीवर मेकअप वगैरे न करता मेई-लॅन-फँग भूमिका करीत असे. त्याच्या भूमिका आणि त्यानं बसवलेले नाट्य-प्रयोग पाहून 'मुक्त रंगभूमी'च्या कल्पनेबद्दलचा ब्रेख्टचा विश्वास दुणावला.

हद्दपारीच्या काळातली शेवटची वर्षं ब्रेख्टनं अमेरिकेत घालवली. या काळात चॅर्ली चॅप्लिनच्या उपहासगर्भ शैलीचा त्याला जवळून अभ्यास करता आला. तसेच चार्लस लाफ्टन या प्रख्यात चित्रपट-अभिनेत्याची आणि त्याची दोस्ती झाली. लाफ्टनच्याच बंगल्यात तो कितीतरी महिने राहिला होता. लाफ्टनला बागकामाचं वेड होतं. रोज सकाळचे प्रहरचे प्रहर ब्रेख्ट आणि लाफ्टन बागेत हिंडत, फुलं कशी उमलतात, फुलझाडं कशी तरारतात याचा अभ्यासानंद अनुभवीत. ब्रेख्टच्या 'गॅलिलिओ' या नाटकाचा प्रयोगही दोघांनी मिळून बसवला आणि लाफ्टननं त्यात गॅलिलिओची प्रमुख भूमिका करून अमेरिकेत आणि साऱ्या जगात त्या नाटकाला लोकप्रियता आणि मान्यता मिळवून दिली. 'गॅलिलिओ'च्या पहिल्या प्रवेशात गॅलिलिओ आपल्या शिष्याला—आंद्रिया सार्ती या कोवळ्या पोराला—आपले सिद्धान्त समजून सांगतो आहे असे दृश्य आहे. हे नुसतेच पंतोजी-पद्धतीचे दृश्य लाफ्टनने बदलून टाकले. त्याने या दृश्यात गॅलिलिओ आंघोळ करतो आहे आणि आंघोळ करण्याइतकं सुख अनुभवता अनुभवता आपले विचार आंद्रिया सार्तीला सांगतो आहे, असा बदल केला आणि हे दृश्य एकदम हिट होऊन गेलं. चिंतनातल्या वैचारिक आनंदाबरोबरच शरीरसुखाच्या आनंदाचं दृश्य दाखवल्यानं त्या प्रसंगाला एकदम अनेक पातळ्यांवरचे अर्थ आणि संदर्भ आले. त्यातून लाफ्टनचा श्रेष्ठ अभिनय! दोन्ही खिशांत हात घालून रंग-मंचावर येरझारा घालणारा गॅलिलिओ लाफ्टननं उभा केला तेव्हा त्यात गॅलिलिओच्या लैंगिक भुकेचं दृश्यही अनेकांना प्रतीत झालं. आणि तो श्रेष्ठ शास्त्रज्ञ एक सामान्य माणूस होऊन गेला. गॅलिलिओची चौकशी, तुरुंगवास आणि त्यानं तुरुंगात चोरून-लपवून ठेवलेला आपला नवसिद्धान्त लेख, यांतून ब्रेख्टला स्वतःच्या हद्दपारीतल्या स्थितीचंही विदारक चित्र रंगवता आलं.

तसंच शेवटचं दृश्य. आंद्रिया आता मोठा झालाय. स्वतः शास्त्रज्ञ झालाय. आणि शास्त्राच्या अधिक अभ्यासासाठी परदेशात निघालाय. त्याच्यासमोर गॅलिलिओनं केलेलं शेवटचं भाषण हे शेक्सपीअरच्या नाटकातल्या अजरामर भाषणाइतकंच सुंदर आणि परिणामकारक आहे. गॅलिलिओ आपली नवसिद्धान्ताची लपवून ठेवलेली चोपडी आंद्रियाला देतो आणि ती परदेशांत घेऊन जायला सांगतो. आंद्रियाची अशी समजूत झालेली असते की, गॅलिलिओनं चर्चची क्षमा मागितली आणि आपल्या शास्त्रज्ञाच्या ब्रीदाला काळिमा लावला. पण आता त्याचा हा गैरसमज दूर होतो. तो काही बोलणार एवढ्यात गॅलिलिओची मुलगी येते आणि त्याचं जेवणाचं ताट टेबलावर नेऊन ठेवते! 'अहा! मी जेवतो आता' असं म्हणून गॅलिलिओ आंद्रियाला निरोप देतो. नंतर जेवतो. त्याचं जेवण लाफ्टननं जे उभं केलं त्यातला अधाशीपणा, त्यातली मजा, दुसऱ्या कोणा अभिनेत्याला दाखवता आली असती की नाही शंकाच आहे. जणू त्याला सांगायचंय की, माणसाला या जगात काय हवंय, तर 'अधिक आयुष्य, अधिक अनुभव, अधिक मौज!'

'मदर करेज'मध्ये ब्रेख्टच्या प्रतिभेचं भीषण तांडव दिसतं. नाटकाचा विषय आहे युद्ध—युद्धावर जगणारी माणसं, आणि माणसां-वर जगणारं युद्ध! मदर करेज हे पात्र तर ब्रेख्टनं आर्त स्वानुभवा-तून निर्माण केलेलं आहे. दिसायला विषय जरी युद्ध असला, तरी त्याचा कथागर्भ (theme) आहे—'सद्गुण.' आपल्या या मानवी जगात सद्गुणांची गरजच काय? खावं, प्यावं, मजा करावी, हे सोडून सद्गुणांची पूजा करीत बसण्याची माणसांला गरज काय? 'जेव्हा जेव्हा म्हणून सद्गुणांची गरज भासू लागते, तेव्हा तेव्हा काहीतरी खूप बिघडलेलं आहे असं समजावं' असं मदर करेज म्हणते. (म्हणजे

'यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत–' या गीता श्लोकाचीच ही जर्मन आवृत्ती म्हणायची ! ) एलिफ् आणि स्विसचीज या आपल्या दोघा मुलांना ती म्हणूनच 'धैर्य, शौर्य, त्याग' अशा सद्गुणांविरुद्ध सतत जागरूक करीत राहते. 'चांगल्या देशात सद्गुणांची जरुरीच राहणार नाही' असं तिचं म्हणणं.

नाटकात एक गाडी दिसते. छोटी गाडी. कापड टाकून झाकलेली. तिचे दोन मुलगे ती गाडी ओढतात. गाडीवर मदर करेज आणि तिची मुकी मुलगी कतरीन बसून असतात. मग युद्धात एक मुलगा बळी पडतो, तेव्हा मदर करेज दुसऱ्या मुलाबरोबर गाडी ओढते. तोही मरतो तेव्हा ती आणि मुलगी कॅतरीन गाडी ओढतात आणि शेवटी कॅतरीनसुद्धा युद्धात बळी पडते–तेव्हा एकटी मदर करेज कष्टानं गाडी ओढीत ओढीत निघून जाते. ब्रेख्टनं स्वतः जेव्हा हा प्रयोग बसवला तेव्हा त्यानं फिरत्या रंगमंचाचा उपयोग केला. रंगमंच फिरतो आहे आणि उलट दिशेनं मदर करेज गाडी ओढते आहे, या दृश्यामुळं हे गाडी ओढणं कधीच संपणार नाही असं वाटतं आणि आतडी पिळवटून जातात. युद्ध सुरू आहे म्हणून आपला माल खपतो आहे आणि आपल्याला पोटाला मिळते आहे ही तिची समजूत. परंतु एका मागोमाग एक तिचे मुलगे मरतात, शेवटी मुलगीही बळी पडते तेव्हा तिला कळून चुकतं की, आपण युद्धावर जगत नाही तर युद्धच आपणावर, सामान्य माणसावर, जगत आहे. कॅतरीन एखाद्या वीरांगनेसारखी बलिदान करते. आपल्या मुलांचा बळी घेणारं युद्ध आपल्या मुक्या, निष्पाप, निरुपद्रवी मुलीचासुद्धा बळी घेईल हे मदर करेजला अशक्य वाटतं. 'तो मेली नाही, झोपलेय्–' असं म्हणून ती अंगाईगीत म्हणते. कॅतरीनच्या मृत्यूचा हा प्रसंग जागतिक नाटयकृतीतला एक तेजस्वी, अविस्मरणीय, अमर प्रसंग आहे. या ठिकाणी 'मुक्त रंगभूमी' 'दूरीकरण' या कल्पना क्षणभर बाजूला राहून ॲरिस्टॉटलच्या वास्तव रंगभूमीवर शोभेल अशी भव्य शोकान्तिका ब्रेख्टनं निर्माण केली आहे.

'द कॉकेशिअन चॉक सर्कल' या नाटकातसुद्धा चांगुलपणाचा आणि सद्गुणांचा चिखल झालेला दाखवला आहे. (या नाटकाचा गेल्या महिन्यात अकाली कालवश झालेल्या मराठीतल्या श्रेष्ठ प्रतिभाशाली कवि–नाटककार चिं. त्र्यं. खानोलकरांनी 'अजब न्याय वर्तुळाचा' या नावानं दृष्ट लागावी इतका सुंदर अनुवाद केला आहे.) नाटकाच्या शेवटी ॲझडकसारखा संपूर्ण भ्रष्ट माणूस न्यायाधीश झालेला दाखवून ब्रेख्टनं आपल्या तीक्ष्ण उपहासशस्त्राचा अर्वाचीन पाश्चात्त्य संस्कृतीवर उग्र प्रहार केला आहे. तसेच नाटकाच्या शेवटी मुलाला सांभाळणारी ग्रुशा आणि मुलाची खरी आई यांच्यातल्या संघर्षाचा दावा या भ्रष्ट ॲझडकपुढं मांडून ब्रेख्टनं नाटक विलक्षण रंगतदार केलं आहे. खडूनं जमिनीवर एक वर्तुळ काढून त्यात त्या मुलाला ठेवण्यात येतं. खरी आई क्रांतीत मारल्या गेलेल्या राज्यपालाची पत्नी. त्यामुळं इस्टेटीसाठी तिला मुलगा हवा असतो. तर ग्रुशाला खरोखरीच त्या मुलाबद्दल अपत्यप्रेम वाटू लागल्यानं तिला तो मुलगा हवा असतो. वर्तुळात ठेवलेल्या मुलाला दोघींनी दोन्हीकडून हात धरून ओढायला सांगण्यात येतं. मुलाचा हात दुखावेल म्हणून ग्रुशा जोरानं ओढत नाही, तर इस्टेट मिळाली पाहिजे म्हणून खरी आई हात्तविन दुखावला तर दुखावला म्हणून खच्चून ओढते–(अर्थपिपासू–किंवा अर्थपिसाट पाश्चात्त्य संस्कृतीवर केवढी विदारक टीका आहे ही ! )–परंतु ॲझडक ओळखतो की खरं प्रेम ग्रुशाजवळच आहे. तो मुलगा ग्रुशालाच देऊन टाकतो. सद्गुणांचा, सौजन्याचा, सत्प्रीतीचा हा विजय ब्रेख्टनं पहिल्यांदाच या नाटकात दाखवलाय.

ब्रेख्टच्या शेवटच्या सर्वच नाटयकृतीतून सद्गुणांवर नीतितत्त्वावर परखड अशी टीका आहे. एक नवीच नीती या जगासाठी बनवली पाहिजे असं मत तो व्यक्त करतो. 'सेत्झुआनची सज्जन व्यक्ती' या नाटकात तीनही देव जगाच्या अवस्थेबद्दल दुःखित होऊन चर्चा करतात. त्यावेळी एक देव ('तिसरा देव') म्हणतो–

'मला वाटतं आमच्या सगळ्याच आशा घातक ठरू लागलेल्या आहेत. आपण निर्माण केलेली सगळी नीतीतत्त्वं रद्द करण्याची वेळ आली आहे. साधं जिवंत राहण्यासाठीसुद्धा लोकांना केवढा खटाटोप करावा लागतोय. चांगली तत्त्वं अशा लोकांना टकमक टोकावर आणून उभं करतात, आणि चांगली कृत्यं तर त्यांचा कडेलोटच करतात. हे असलं जग जगण्याच्या लायकीचं राहिलंच नाही.'


या जगातली एकमेव सज्जन व्यक्ती देव शोधून काढतात. एक वेश्या ! आणि तिलासुद्धा चांगलं जगणं, चांगलं होणं, परोपकार करणं अशक्य होऊन बसतं. तेव्हा ती वेषांतर करून स्वतःचाच चुलतभाऊ शूता होते आणि सर्वांशी क्रूरपणानं वागते. नाटकाच्या शेवटी देव शूताने शेनतेला ठार मारले, तिचा खून केला म्हणून शूताची चौकशी करतात. तेव्हा पुरुषवेष फेकून देऊन शेन ते प्रकट होते. देव आश्चर्यानं म्हणतात–'कोण ? शेन ते ?' तेव्हा ती उत्तर देते–

'होय, मीच. शूता आणि शेन ते दोन्ही मीच आहे,
तुमची पहिली आशा
चांगलं होण्याची, जिवंतपणाची
याचि देही, चांगलं होण्याची,
ती कोसळली विजेसारखी माझ्यावर
आणि मला असं दुभंग करून टाकलं.
काय झालं ते मला सांगता नाही येणार,
परंतु दुसऱ्यावर आणि स्वतःवर एकाच
वेळी उपकार करणं मला जमलं नाही...
देवा, तुमचं जग फार तापदायक आहे.
किती गरजा ! किती निराशा केवढा
वैताग ! ......... परंतु मग
मी नियम मोडले, होय, चांगलं होण्याचे
सगळे नियम मोडून टाकले, आणि मग मात्र
मला नाक वर करून रस्त्यातून मिरवता आलं
पोटभर खाता आलं.
या तुमच्या जगात
कुठंतरी काहीतरी फार फार बिघडलंय !
दुष्टपणाला अशी वारंवार बक्षिसं का मिळतात ?
आणि सज्जनांचा इतका छळ का होतो ?...
देवांनो, तुमच्या योजना फार विशाल आहेत
आणि मी तर एवढीशी, फक्त माणूस आहे...'

भारतीय संस्कृतीच्या, समता, प्रीती, भूतदया, या चिरंतन सत्–तत्त्वांच्या किती जवळचे वाटतात हे शब्द ! यांना 'साम्यवाद' कोण म्हणेल ? 'मार्क्सवाद' असं कोण हिटाळील ? श्रीज्ञानेश्वरांच्या पसायदानाच्या जवळ येणारे शेन ते चे शब्द पहा–

'कुणालाही वाया जाऊ देऊ नये, स्वतःलासुद्धा,
सर्वांसाठी सुख आणावं, स्वतःसाठीसुद्धा,
– याचं नाव सज्जनपणा !'

परंतु या आजच्या अर्थपिसाट, लिंगपिसाट– ('बॅल' आणि 'हर्र पंटिला' या नाटकाचा विषय), अशा या क्रूर, हिंस्र, रक्तलांछित जगात अशा सगळ्या सद्गुणांचा, नीतितत्त्वांचा, सज्जनपणाचा चिखल चिखल आणि चिखल झालाय ! या भीषण अवस्थेचं नाटयचित्र ब्रेख्टइतकं प्रभावीपणानं अलीकडच्या काळात कुणीही रंगवलेलं नाही. हीच त्याची नाटककार म्हणून महात्मता ! □



# लालकिल्ल्यातील अभियोगाची कहाणी १९४८-४९

## पु. ल. इनामदार

### १२. सावरकर

लालकिल्ल्यातील अभियोगपर्वाच्या निमित्ताने मला ज्या पुष्कळशा संधी मिळाल्या त्यांतली एक संधी म्हणजे मला स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर तथा तात्याराव सावरकर यांच्या बचावामध्ये सहयोग देण्याला मिळालेली संधी होती. मी सावरकरांच्यावतीनं काम करायला बोलावलेला असा नव्हतो, परंतु कटाच्या आरोपाविरुद्ध बचाव करायचा होता आणि विशेषेकरून जेथे महात्मा गांधींच्या हत्येच्या कटाचा आरोप सगळ्याच अभियुक्तांनी स्पष्टपणे नाकारला होता त्यांपैकी एक सावरकरही होते; म्हणून माझ्या पक्षकारांचा–गोपाळ गोडसे आणि डॉक्टर परचुरे यांचा–बचाव करताना मी श्री सावरकरांचाही बचाव अशा अर्थाने करीत होतो की, माझ्या पक्षकारांनी, नथूरामशी किंवा इतर कुणाशीही हत्येबाबत कट केला नाही; श्री. सावरकरांशीसुद्धा नाही.

सावरकरांना मी दिनांक २७ मे १९४८ ला जेव्हा लालकिल्ल्यात गेलो तेव्हा प्रथमच पाहिले. त्यापूर्वी मी कधीही त्यांना पाहिले नव्हते. मी या कहाणीत इतरत्र सांगितलेच आहे की, या अभियोगातल्या कुणाही अभियुक्ताला मी त्यापूर्वी बघितले नव्हते.

अर्थात माझ्या शालेय विद्यार्थीदशेमध्येच सावरकरांनी केलेल्या व त्यांच्याविषयी घडलेल्या रोमांचकारी घटनांबाबत पुष्कळ माहिती झाली होती. आणि मी तर म्हणतो की, त्या काळातला असा कोण भारतीय असेल की, ज्याने सावरकरांविषयी काही वाचले किंवा ऐकलेही नसेल ? माझ्या अल्पवयातच मला आवडलेल्या ज्या काही कविता, गाणी वगैरे मला मुखोद्गत झाली होती त्यांपैकी सावरकरांची कविता 'की घेतले व्रत न हे अम्ही अंधतेने ! लब्धप्रकाश– इतिहास निसर्गमाने । जे दिव्य दाहक म्हणून असावयाचे । बुध्याचि वाण धरिले करिं हे सतीचे ।। ही एक होती. इंग्रजांच्या कैदेतून सुटून फ्रान्सच्या भूमीवर पाय ठेवण्यासाठी मार्सेलिस या फ्रेंच बंदरात इंग्रजांची बोट उभी असताना शौचकूपाच्या गोल खिडकीतून समुद्रात उडी मारून पोहत फ्रेंच किनाऱ्यावर पोचण्याच्या सावरकरांच्या शौर्याचे वर्णन आम्हा विद्यार्थ्यांना पाठ असे. कायद्याचा अभ्यास करताना आम्हांला शिकविलेल्या प्रामाणिक निर्णय दृष्टान्तांपैकी एक व्ही. डी. सावरकर व्हर्सस रेक्स हा अभियोग दृष्टान्तही आम्हांला परकीय सत्तेशी अभियुक्तांची देवाणघेवाण करण्याच्या आंतर्राष्ट्रीय विधिनियमांच्या संदर्भात माहीत झाला होता. सावरकरांची भाषणे पुढे पुढे छापून येत तीही मी वाचीत असे. आणि पन्नास वर्षांच्या जन्मठेपेची व काळ्या पाण्याची शिक्षा मिळून अंदमानच्या तुरुंगात वर्षानुवर्षे राहून आलेली व्यक्ती !

ह्या व्यक्तीला मी पहिल्यांदा पाहिले ते लालकिल्ल्यातील न्यायालयाच्या अभियुक्तांच्या पिंजऱ्यामध्ये भिंती जवळच्या लाकडी बांकावर, आरोपपत्रकातल्या अभियुक्तांच्या अनुक्रमाप्रमाणे सातव्या क्रमांकावर बसलेले, त्यांच्या उजव्या हाताशी शंकर किस्तय्या व डाव्या हाताशी डॉ. परचुरे नि त्या दोघांमध्ये ही वामन मूर्ती बसलेली होती. मी डॉक्टर परचुऱ्यांजवळ जाऊन त्यांच्याशी बोलायला लागताच ते माझ्याकडं बघत आहेत हे माझ्या लक्षात येऊन मी त्यांच्याकडे बघून मान नम्रतेने लवविली होती व तोंडाने नमस्कार हळूच म्हटला होता. कोर्टातली रीतच तशी आहे. कुणालाही हात जोडून नमस्कार करायची पद्धत नाही. माझे अभिवादन सावरकरांनी आपली मान किंचितशी हलवून निर्विकार मुद्रेने स्वीकारले होते व लगेच ते कोर्टाकडे बघावयास लागले होते.

अभियोगपर्वातली दुसरी तारीख लागताच, मला वाटते सावरकरांचे वकील श्री. भोपटकर किंवा बॅरिस्टर जमनादास मेहता यांनी केलेल्या विनंती अर्जामुळे असावे बहुतेक, पण जज्ज आत्मचरणजींनी सावरकरांना बसण्यासाठी निच बैठकीची, मान टेकायला मिळेल अशा पाठीची, वेताच्या विणीची हातांची खुर्ची आणून ती अभियुक्तांच्या पहिल्याच ओळीत न्यायाधीशांच्या व्यासपीठाला लागूनच अशा जागी, पहिल्या क्रमांकाने ठेवायची जागा नेमून दिली व त्यावर सावरकर बसलेले आम्हाला पाहायला मिळू लागले.

सावरकर कोर्टात धोतर नेसलेले, अंगात शर्ट व उघड्या गळ्याचा पांढरा शुभ्र कोट, डोळ्यांवर सोनेरी चष्मा, डोक्यावर उंच दिवाळीची काळी टोपी व पायांत वहाणा, अशा वेशात येत. हिंवाळ्याच्या दिवसांत उघड्या गळ्याचा गर्द रंगाचा कोट घालून व मफलर गुंडाळून यायचे. सावरकर कोर्टात खुर्चीवर मुकाट बसलेले असायचे. कधी कधी श्री. भोपटकरांशी किंवा श्री. गणपतरायजींशी बोलताना दिसायचे. मुकाट बसले असताना ते कधी कोर्टाकडे, तर कधी साक्षीदारांच्या पिंजऱ्यातल्या साक्षीदारांकडं, तर कधी वकिलांकडे, तर कधी प्रेक्षक श्रोतृवर्गाच्या बाजूलाही बघत. पण ते ज्या अभियुक्तांच्या पिंजऱ्यात बसत त्याच पिंजऱ्यात बसलेल्या इतर अभियुक्तांकडे कधीही बघत नसत. लालकिल्ल्यातील अभियोगपर्वाच्याकाळात मी सावरकरांना केव्हाही, एकदाही त्यांनी त्यांच्याजवळच डाव्या हाताशी बसलेल्या नथूरामकडे मान वळवून बघितलेले पाहिले नाही, नथूरामशी बोललेले पहायचे नावच नको. अभियुक्तांच्या पिंजऱ्यात बसलेले इतर अभियुक्त एकमेकांशी मोकळेपणी बोलत, एकमेकांशी विचारविनिमय करीत, एकमेकांची थट्टामस्करी करीत नि हसतही, पण सावरकर हे आपल्या आसनावर स्फिंक्स पुतळ्याच्या दगडी चेहऱ्याने शेजारीच कोणी आहे की नाही याची मुळीच वार्ताही नसल्यासारखे बिनचूकपणे नि शिस्तीने मुकाटपणे बसलेले असायचे. कोर्टामध्ये ते माझ्याशी कधीच बोलले नाहीत. फक्त एकदा माझ्या एका प्रश्नाला उत्तर म्हणून बोलले. त्याबद्दल मी पुढे सांगेनच. येथे मला सांगायचे ते असे की, मला तर वाटायचे, सावरकरांनी, त्यांचा 'मी नथूरामशी किंवा इतर कुणाही अभियुक्तांशी खुनाचा कट केला नाही!' ह्याबचावाचा अभिनयही कोर्टात करून दाखविण्याचे इतर अभियुक्तांच्या संबंधातच नव्हे, तर ह्या अभियुक्ताच्या अभिवक्त्यांच्या संबंधातही, इतरांच्या सहज लक्षात येईल अशा रीतीने करून दाखविण्याचे ठरविले असावे!

महात्मा गांधी खून खटल्याच्याकाळात नथूरामशी या संबंधांत मी पुष्कळ बोललो. त्या प्रत्येक वेळी नथूरामने त्याच्या 'तात्यारावांच्या' या 'या माझा नथूरामशी काहीसुद्धा संबंध नाही त्याच्याबद्दल मला यत्किंचितही सहानुभूती नाही, हे, अशा योजनाबद्ध आणि नाटकी आविर्भावाने लालकिल्ल्यातील कोर्टातच काय, पण लालकिल्ल्यातील बंदीगृहासारख्या एकान्त जागीदेखील दाखवीत रहावे, याचे त्याला भारी वाईट वाटल्याचे मजजवळ बोलून दाखवले. त्याच्या 'तात्यारावांच्या' एखाद्या हस्तस्पर्शासाठी, एखाद्या सहानुभूतीच्या शब्दासाठी एखाद्या करुणेच्या दृष्टिक्षेपासाठीही नथूराम किती तळमळत असे याबद्दलचा उल्लेख नथूरामने मजजवळ, त्याच्या माझ्या सिमला येथे झालेल्या शेवटच्या भेटीतही केला होता. लालकिल्ल्यातील अभियोगपर्वात नथूराम आपल्या बचावाचे ९ तासांपेक्षा अधिकच चाललेले भाषण करीत असता, विशेषेकरून अभियोगपक्षाने किती असमर्थनीय आधारावर सावरकरांना या अभियोगात गोविले आहे याबद्दल चीड व्यक्त केलेली ऐकताना किंवा मातृभूमीच्या निर्घृण विभाजनाबद्दलचे आपले अपार दुःख बोलून दाखवलेले ऐकताना कोर्टामधल्या साऱ्या प्रेक्षक श्रोतृवर्गाची साहानुभूती त्यांच्या डोळ्यांतून पाझरताना दिसली होती. एवढेच काय, पण न्यायाधीश महोदय नि ॲडव्होकेट जनरल महोदयही मुक्या मनाची वेदना डोळ्यांनी बोलून दाखवताना क्वचितप्रसंगी दिसले. पण त्या त्या वेळीही सावरकर आपल्या आसनावर स्फिंक्स पुतळ्याच्या निर्विकार दगडी चेहऱ्याने बसलेले होते!

सावरकरांनी आपल्या बचावाचे लेखी निवेदन स्वतःच लिहिले होते नि त्या निवेदनाला वर्तमानपत्राची कात्रणेही डझनावारी जोडली होती. ते सगळे निवेदन व ती कात्रणेही कोर्टामध्ये सावरकरांनी सराईत वक्त्याच्या सगळ्या लकबी प्रभावीपणे दाखवीत वाचली होती. विशेषतः 'महात्मा गांधीजींच्या व्यक्तित्वाविषयी आपल्या आदरभावाचे प्रदर्शन वारंवार बोलून—लिहून दाखवलेल्या मलाच स्वतंत्र भारताच्या शासकांनी महात्मा गांधींचा हत्यारा म्हणावे?' याबद्दलचे निवेदन वाचून दाखवताना, सावरकरांनी नुसता हताश चेहऱ्याने दीनवाणा आवाज लावला होता एवढेच नव्हे, तर महात्मा गांधींवर दोन अश्रू ढाळल्याचेही उलट्या मुठीने आपले गाल पुसून कोर्टाला—सर्वांनाच दाखविले होते

अभियोगपक्षाने सावरकरांना महात्मा गांधींच्या हत्येच्या कटामध्ये गोवण्यासाठी जे काही करता येणे शक्य होते ते सर्व केले होते. पण त्यांनी मिळविले काय, तर कर्णपरंपरा या श्रुतीचे प्रामाण्य सांगणारा माफीच्या साक्षीदाराचा लंबाड पुरावा आणि मराठी रजतपटावरच्या चित्रतारकेचा वाटसरू पुरावा. माफीचा साक्षीदार बडगे सांगत होता की, तो, नथूराम व आपटे एके दिवशी सावरकर सदनात गेले असता नथूराम आणि आपटे सावरकरांना एकटेच भेटून माडीवरून खाली आले त्यावेळी तात्याराव म्हणाले की, 'शुभास्ते पंथानः संतु!' आणि साक्षीदाराच्या पिंजऱ्यात चित्रपटतारका मान वेळावीत सांगत होती की, तिच्या भावाने आपल्या मोटरमध्ये एके दिवशी नथूराम व आपटे यांना दादर स्टेशनवर लिफ्ट दिला होता तेव्हा नथूराम व आपटे सावरकर सदनाच्या फाटकाजवळ उतरले! हे सांगायला ती चित्रपटतारका न येता तिचा भाऊ येता तरी काय फरक पडला असता? पण मग त्याने रजतपटावरची झगझगीत नाट्यमयता कोर्टाच्या डोळ्यांना कशी दिपवून टाकली? तात्पर्य एवढेच की, अभियोगपक्षाने सावरकरांच्या विरुद्ध आणलेल्या हिणकस पुराव्याला रंगरूप देण्याचे सगळे नेपथ्य दाखवले होते! अभियोगपक्षाच्या सगळ्या पुराव्याचे यथोचित रसग्रहण स्वतःच करण्याइतके विधिज्ञ आणि वक्ते सावरकर निश्चित होते. त्यामध्ये हातभार

## ....पण त्यावेळीही सावरकर स्फिंक्स पुतळ्याच्या निर्विकार चेहऱ्याने बसले होते.

लावायला पुण्याचे नामवंत फौजदारी वकील ल. ब. भोपटकर व मर्मभेदक तर्कपद्धतीने व वाभाडे काढणाऱ्या, विनोदाने प्रतिपक्षाच्या आडंबराची लक्तरे बनवणारे मुंबईचे बॅरिस्टर जमनादास मेहता, हे दोघे त्यांचे खास वकील होते. सावरकर स्वत: मी पूर्णतया निर्दोषी आहे असे छातीवर हात ठेवून सांगत होते. १९४८ च्या त्या दिवसांत सावरकर आपल्या जीवनातल्या कोणच्या अवस्थेप्रत पोचले होते याचीही मला पूर्ण कल्पना त्यावेळीच होती. तरी पण मी पहात होतो की, जसजसे दिवस जात होते नि जसजसा अभियोगपक्षाचा पुरावा उलगडत होता तसतसे सावरकर अधिकच अस्वस्थ झाल्यासारखे दिसत होते आणि हे बघून मला त्यावेळी विलक्षण वाटत होते. अशाच परिस्थितीत एके दिवशी—सप्टेंबर १९४८ च्या सुरुवातीलाच मला भोपटकरांकडून सांगून आले, की मला सावरकर लाल किल्ल्यातील बंदीगृहात भेटू इच्छितात व तसे मी भेटायला त्यांनी कोर्टाची अनुज्ञाही मिळविली आहे. भोपटकर, मेहतांसारख्या ज्येष्ठ नि नामवंत वकिलांच्या कामात माझ्यासारख्या गावगन्ना नि बाल बुद्धी वकिलाने ढवळाढवळ करावी हे मला अवघडून टाकणारे होते व तसे मी बोलून दाखवलेही. पण शेवटी माझ्या शहाणपणावर माझ्या अहंकाराने कुरघोडी केली नि मी सावरकरांना भेटायला जायचे कबूल केले. मी सावरकरांना १९४८ च्या सप्टेंबर महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी लालकिल्ल्यातील बंदीगृहात सकाळी भेटलो. सावरकरांनी उघड्या डोक्याने नि धोतर शर्टच्या वेशात खोलीच्या दाराशीच माझे स्वागत केले नि मला आत नेले. १२"×१२" फूट लांबीरुंदीची कोठडी असावी. कोठडीच्या मध्यभागी एक जुनी सतरंजी पसरलेली होती व त्यावर कोर्टकामाच्या कागदपत्रांच्या फायली ठेवल्या होत्या. खोलीच्या एका कोपऱ्यात छोटेसे मेज व त्यावर कागदाच्या फायली, लिहिण्याचे साहित्य, पुस्तकांची रांग आणि वाचायला दिवा होता. टेबलाशी बसायला खुर्ची व निजायला पलंग व अंथरूण होते. एका कोपऱ्यात स्टूल व त्यावर मातीची सुरई व त्यावर काचेचा ग्लास उपडा घातलेला होता. इतर काही उपकरणे व उपयोगी वस्तूही होत्या. मी पायातले दाराशीच काढून ठेवले नि सावरकरांबरोबर सतरंजीपर्यंत गेलो व तेथे सावरकरांची पदधूली घेऊन, स्वत:च्या कपाळाला लावीत त्यांना खाली वाकून नमस्कार केला आणि तोंडाने माझ्या नम्रतेची, आनंदाची, अहोभाग्याची सूचक अशी काही वाक्ये बोललो. सावरकर मला म्हणाले, 'इनामदार, तुम्ही माझ्याकडे आलात याने मला फार बरे वाटले, बसा.' त्यानंतर त्यांनी मला का बोलावले आहे ते सांगितले. त्यावर 'वडीलधाऱ्या मंडळींपुढे मी काय बोलणार? ज्येष्ठ सहयोगी मंडळींच्या कामाची चर्चा करणे मला शोभून दिसणार नाही' वगैरे म्हटले. त्यावर सावरकर मला म्हणाले, 'तुमचे थोडक्यात नि योग्य शब्दांतले बोलणे मला फार आवडले. तुमचे कूटपरीक्षण सर्वांत चांगले झाले आहे. हा, तुम्ही सर्वच मंडळी आपापल्या परीने फार चांगले काम करीत आहात. पण तुम्ही—तुमच्या कामामुळे मी फार प्रसन्न झालो आहे. मला तुमचे मत नि साहाय्य हवे आहे. तुम्ही ते द्यायला अनमान करणार नाही असे मला वाटते.'

'अहो, असे काय म्हणता! हे तर माझे अहोभाग्य वाटते मला!' मी उत्तरलो नि त्यानंतर आम्ही कोर्टात आलेल्या पुराव्याबद्दल बोलायला लागलो. विशेषेकरून सावरकरांच्याविरुद्ध आलेल्या पुराव्याबद्दल व सामान्यत: सर्वच पुराव्याबद्दल बोललो. सावरकरांना त्यांच्याविरुद्ध असलेल्या साऱ्याच घटनांची—त्या होत्या अगदी मोजक्याच पण त्यांची—चांगली समज आहे असे मला जाणवले. त्या घटनांबद्दल सावरकर अगदी निष्णात वकिलाच्या भाषेत वकिली थाटाने बोलत होते, अगदी कर्णपरंपरयाश्रुत साक्षीची पहिली श्रेणी, दुसरी श्रेणी अशा साक्ष्यविधानामधील भाषेत ते बोलत होते. सावरकरांचे ते बोलणे ऐकून मला 'आपला तर्क अगदी योग्य आहे—आपली पुराव्याची मीमांसा अगदी अचूक आहे' असे बोलण्यापलीकडे काही उरतच नव्हते. काही काही ठिकाणी मी काही फेरबदल, वाक्यप्रयोग सुचवले, काय व का टाळायचे ते सांगितले. त्यांची त्यांनी चटकन टिपणे लिहून घेतली. हे सर्व करीत असताना त्यांनी वारंवार 'काहो, मी सुटेन का? अगदी मनापासून सांगा, तुम्हाला काय वाटते या पुराव्याबद्दल! हे जज्ज आत्मचरण मला सोडतील का?' असे म्हणावे नि मी, 'नक्की सुटाल! अगदी मुळीच काळजी वाटण्याचे कारण नाही!' असे त्यांना सांगावे, असे चालले होते व बऱ्याच वेळाने मला हे जाणवले की, त्यांनी मजजवळ माझ्या पक्षकार अभियुक्तांबद्दल, नथूरामसमवेत इतर अभियुक्तांबद्दल एक चकार शब्द काढला नाही की, त्याविषयी विचारले नाही. माझ्या स्वत:बद्दलही काही विचारले नाही. मी त्यांच्याजवळ कमीअधिक तीन तास बसलो होतो. मी त्यांचा निरोप घेतला नि खाली वाकून त्यांच्या पायांना स्पर्श करून नमस्कार केला. त्यांनी मला 'धन्यवाद' म्हटले नि मी हिंदुमहासभा भवनात परत आलो ते अशा जगविख्यात पुरुषसिंह सावरकरांसारख्या स्वातंत्र्यवीरांच्या अति निकट सान्निध्यात माझ्या आयुष्याचा एक प्रहर घालविल्याचे तेजोवलय माझ्या उत्फुल्ल मुखावर मिरवीतच! आणि त्यानंतरही कोर्टामध्ये रोज आदराने सावरकरांना वाकून नमस्कार करताना सावरकरांच्या विश्वासाचे विरूद मी ल्यालो आहे या विचाराने माझे शरीर प्रफुल्लित होत असे!

लालकिल्ल्यातील अभियोगपर्वाच्या शेवटच्या आठवड्यात कोर्टामध्ये आम्ही एकमेकांच्या संपर्कात आलेल्या सर्वांच्या स्वाक्षऱ्या घेण्याचे ठरविले होते व त्या कामाला सुरुवात करायची म्हणून मी एक कोरी स्वाक्षरी पुस्तिका घेऊन कोर्टात सावरकरांजवळ गेलो नि त्यांना त्या पुस्तिकेच्या पहिल्याच पानावर 'आपण येथे स्वाक्षरी करून मला धन्य करावे' असे विनविले. त्यावर सावरकरांनी मला काय म्हणावे? सावरकर मला म्हणाले, 'क्षमा करा हं, इनामदार! तुम्हाला माझी स्वाक्षरीच हवी आहे ना? मग असे करा ना! माझे एखादे पुस्तक मुंबईच्या पुस्तकविक्रेत्याकडून विकत घ्या. माझ्या स्वाक्षऱ्या असलेली पुस्तके त्यांच्याकडे हवी तितकी मिळतात!'

या अपकर्षी प्रतिसादाने अति निरुत्साह होऊन मी उभ्या पावलीच परतलो. माझा सगळा उत्फुल्लपणा पूर्णतया ओसरला होता नि भारी उदास वाटले मला! त्यानंतर जेव्हा कोठे जज्ज श्री. आत्मचरणजी, अॅडव्होकेट दफ्तरी, भोपटकर, एक एक सहयोगी, अभियोगपक्षातले सहकारी, पोलिस अधिकारी फार काय नथूराम आदि करून सगळ्या अभियुक्तांच्या स्वाक्षऱ्या मी घेतल्या व त्या सर्वांनी काही ना काही

माझ्याशी बोलून मला हसविले, मला सुखविले तेव्हा कोठे मला माझे मन सावरता आले.

अभियोगपर्वातील तर्कनिवेदनांच्या सत्रात माझा क्रमांक शेवटचा होता. त्यावेळी माझ्या भाषणांचा समारोप करताना दिनांक ३०–१२–४८ ला तिसऱ्या प्रहरी लालकिल्ल्यातील कोर्टात मी म्हटले होते की, 'असेही होईल की, आपल्या मातृभूमीच्या पहिल्याच स्वातंत्र्यसंवत्सरात उभे राहिलेले हे ऐतिहासिक अभियोगपर्व, मातृभूमीसाठी स्वातंत्र्य मागण्याची घोषणा पन्नास संवत्सरापूर्वीच ज्या तिच्या मानी सुपुत्राने केली व तिच्या स्वातंत्र्याचा ध्वज उंच लहरत ठेवण्यासाठी ज्या तिच्या सुपुत्राने अगणित हालअपेष्टा भोगल्या, त्या सुपुत्राला येथे आपल्या भाग्याबद्दल अश्रूंचे काही थेंब ढाळण्याची वेळ आली, यासाठीच हे पर्व लक्षात राहील.'

माझ्या भावफुलाची एक पाकळी लालकिल्ल्यातील न्यायालयात स्वातंत्र्यवीरांच्या पदकमलांवर अर्पण करण्याची माझी अल्प सेवा होती ती !

१० फेब्रुवारी १९४९ रोजी लालकिल्ल्यातील अभियोगपर्वाचा निर्णय घोषित करण्यात आला होता. त्या दिवशी मी व माझे सहयोगी, दोघांना फाशी–पाचजणांना आजन्म कारावासाची शिक्षा अशा घणाघाती घोषणेच्या माराखाली भोवंडून गेलो होतो, त्यावेळी सावरकर अभियुक्तांच्या पिंजऱ्यात उंच होऊन उभे राहिल्यासारखे ताठ मानेवर स्वातंत्र्यवीरांचे मुखमंडळ मिरवीत, विजयानंदी वकिलांच्या घोळक्यात केव्हा कोर्टाबाहेर निघून गेले हे मला कळलेच नव्हते. कोर्टाबाहेरच्या सावरकरांच्या भक्तगणांच्या तारस्वरातल्या 'स्वातंत्र्यवीर सावरकर झिंदाबाद !' च्या घोषणांच्या किंकाळ्यांनीच ते आमच्या लक्षात आले. त्या दिवशी महान स्वदेशाभिमानी स्वातंत्र्यवीर सावरकरांचे मी घेतलेले दर्शन माझे शेवटचेच ठरले. खरे सांगायचे म्हणजे मी प्रार्थना करूनसुद्धा त्या दर्शनाचा अलभ्य लाभ मला देण्यात आला नव्हता !

पूर्व पंजाब उच्च न्यायालयामधल्या महात्मा गांधी खून खटल्याच्या अपिलांच्या निर्णयाच्या घोषणेनंतर मी मे १९५० मध्ये मुंबई येथे गेलो होतो. अपिलामध्ये माझे ग्वाल्हेरचे पक्षकार डॉक्टर परचुरे सहीसलामत सुटले होते, पुण्याचे पक्षकार गोपाळ गोडसे याला अपील न्यायालयाच्या तिघाही न्यायमूर्तींनी आपल्या स्वाक्षरीने शिक्षा कायम ठेवूनही अभियुक्ताला दया दाखवून मुक्त करावे अशी सूचना भारतीय शासनासाठी लिहिली होती. या विचारांनी वेढलो असताना मी मे १९५१ मध्ये एके दिवशी सकाळी सावरकर सदन, शिवाजी पार्क, मुंबई येथे गेलो होतो. माझे स्वागत तळमजल्यावरच्या दर्शनी दिवाणखान्यात सौ. माई सावरकरांनी केले होते. मी आपले ओळखकार्ड देऊन 'तात्यारावांच्या दर्शनासाठी आलो आहे' असे सांगितले. सौ. माई सावरकर माडीवर गेल्या व सुमारे दहा मिनिटांनी परत येऊन म्हणाल्या, 'हे फारच–त्यांना मुळीच बरे नाही. ह्यांची भेट होऊ शकणार नाही. क्षमा करा हं !'

त्या दिवशी सावरकर सदनातून परत येताना माझ्या मनातले विचार कसे होते म्हणून सांगू ? महान मानवाच्या मनस्वी मनाचा थांग माझ्यासारख्या पामराला लागणार नाही हेच खरे ! तरीपण ह्या पामराचा वकिलीचा व्यवसाय अनेकांना अनेक परीने उपयोगी ठरला होता–अगदी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकरांनाही, या विचाराने अजूनही मला समाधान वाटते. ◻

## १३. अभियोग निर्णय

लालकिल्ल्यातील अभियोग 'महात्मा गांधी खून खटला' १९४८ याचा निर्णय जज्ज श्री. आत्मचरणजीद्वारा दिनांक १० फेब्रुवारी १९४९ ला लालकिल्ल्यातील कोर्टात सुरुवातीसच घोषित करण्यात आला. त्यादिवशी कोर्टातले वातावरण साहजिकच सुरुवातीला तीव्र संदेहाचे, आशाआकांक्षेचे नि समर्पणाचेही होते. मला जिकडे तिकडे उदास, ओढलेल्या चेहऱ्याचे, गंभीर, संसक्त चेहऱ्याचे लोक दिसत होते. जज्ज आत्मचरणजी कोर्टात आले ते हातात कागदांची एक चळत घेऊन उग्र गंभीर चेहऱ्यानेच. ते रोड झालेले दिसले. नुकतेच केस कापून घेतलेले नि दाढी केलेली होती म्हणून तसे दिसत होते बहुतेक, असे मला वाटले. त्यांच्या दृष्टीला दृष्टी भिडवून काही आशा दिसते का हे शोधायचा मी प्रयत्न केला. तर ते माझ्याकडे बघतच नव्हते. बघण्याचे टाळत होते असे वाटून मी निराश व्हायला लागलो. तसे जज्ज आत्मचरणजी कुणाकडेच बघत नव्हते. प्रत्येक न्यायाधीशाचा, निर्णय घोषित करण्याच्या वेळी, अशाच रीतीने वागण्याचा माझा अनुभव आहे. जज्ज आत्मचरणजींनी समोरचे कागद चाळले, शेवटचे पान काढून हातात धरले नि मान वर उचलून अभियुक्तांच्या पिंजऱ्याकडे बघितले. सगळी अभियुक्त मंडळी आपापल्या जागी बसलेली आहेत की नाही हे पाहिले व मग खाली बघून हातातल्या कागदावर काही तरी लिहिले व त्यावर स्वाक्षरी केली आणि शेवटचे दोन तीन कागद हातात घेऊन वाचावयास सुरुवात केली. निर्णयपत्रकाचा शेवटचा परिच्छेद वाचून दोषमुक्ती, दोषसिद्धी व शिक्षा याबद्दलच्या प्रवर्तक आज्ञा वाचीत होते, जरा मोठ्यानेच स्पष्ट शब्दोच्चाराने वाचीत होते. अखेर त्या दिवशी त्यांच्या समोरच्या ध्वनिग्राहक यंत्रामध्ये ते बोलत होते ! नि त्यांचा आवाज ध्वनिविस्तारक भोंग्यामधून कसा तळपत्या सुऱ्याच्या वारासारखा भेदक नि छेदक वाटला होता मला ! मी मुकाट नि अधिकाधिक हताश मनाने ऐकत होतो. सुऱ्यांचे वार नेम धरून केल्यासारखे, जाणूनबुजून केल्यासारखे वाटत होते. जज्ज आत्मचरणजींनी आरोपपत्रकाच्या क्रमाने प्रत्येक अभियुक्ताची दोषसिद्धी नि त्याला दिलेली शिक्षा वाचून दाखविली. नथूराम व आपटेकरता प्राण जाईपर्यंत फाशी व करकरे, मदनलाल, शंकर किस्तय्या, गोपाळ गोडसे व डॉक्टर परचुरे यांना आजन्म कारावासाची शिक्षा दिली गेली होती ! सावरकरांविषयी दिलेली कार्यवाहक आज्ञा जज्ज आत्मचरणजींनी सर्वात शेवटी वाचून दाखवली असावी बहुतेक. मला ती ऐकल्याचे मुळीच जाणवले नाही ! अजूनसुद्धा जज्ज महोदयांनी तो भाग केव्हा नि कशा स्वरात वाचून दाखवला ते मुळीच स्मरत नाही. मी डॉक्टर परचुरे व गोपाळ गोडसे यांच्या विरुद्ध दिलेल्या निर्णयाने सुन्न होऊन गेलो होतो नि जज्ज आत्मचरणजींकडे भकास चेहऱ्याने बघत स्वतः

लाच विचारीत होतो की हेच का ते जज्ज आत्मचरण, ज्यांनी एके दिवशी मला म्हटले होते की, ' विश्वास ठेवा, तुम्ही आपल्या पक्षकाराचा बचाव इतक्या पटुतेने मांडला आहे. मी त्याचा सर्वपरीने योग्य न्याय करीन ! म्हणून ? आणि मी चिडून स्वतःलाच म्हणत होतो की, ' तुझ्या समारोपाच्या भाषणाच्या शेवटच्या भागाचे आत्मचरणजींनी दिलेले हे उत्तर आहे ! ' बधीरमनाने नि बथ्थड चेहऱ्याने मी नथूरामकडे बघितले. त्याच्या चेहऱ्यावर आत्मसमाधानाचे स्मित दिसत होते. मधून मधून ओठ टोकाशी अवघडल्यासारखे वाटत होते. आपटेने मान खाली घातली होती. चेहरा काळवंडला होता, की स्वतःच्याच सावलीत आला होता ! दुसऱ्या कोणाही अभियुक्तांकडे गोपाळ गोडसे नि डॉक्टर परचुरे यांच्याकडेही बघण्याचे मला धैर्य होत नव्हते. माझ्या लक्षात येण्यापूर्वीच जज्ज आत्मचरणजी उठून कोर्टातून निघून गेले होते. मला उठून उभे राहायलासुद्धा सुचले नाही. नथूराम म्हणत होता नि नथूरामला साथ देत सगळे अभियुक्त ओरडत होते, ' अखंड भारत अमर रहे ! '

मी पुन्हा अभियुक्तांच्या पिंजऱ्याकडे बघितले तर कोर्टाचे शिरस्तेदार व काही लिपिक नि पोलीस कर्मचारी एकेक शिक्षा झालेल्या अभियुक्तांचे बोटांचे ठसे वगैरे कागदावर घेण्याच्या कार्यवाहीत गुंतलेले होते. श्री. डांगे नि मी आमचे विचार एकमेकांना बोलून दाखविण्याचा प्रयत्न करीत होतो. लवकरच सगळ्या अभियुक्तांना गोळा करून एकेकाच्या हातात हातकडया घालीत त्यांना कोर्टाबाहेर नेण्याची तयारी सुरू झाली. मी उठून नथूरामकडे बघत तोंडाने ' नमस्कार ' पुटपुटलो नि सगळ्यांकडे बघत, आम्ही तुम्हाला लवकरच जेलमध्ये येऊन भेटतो. ' असे मोठ्याने म्हटले. शिक्षा झालेल्या बंद्यांना कोर्टाबाहेर नेण्यात आले. आम्ही कोर्टाबाहेर येतो तो सावरकर दूर रस्त्यावर भक्तगणांच्या घोळक्यात नि ' स्वातंत्र्यवीर सावरकर झिंदाबाद 'च्या घोषणात मिरवणुकीने जात होते.

मी दुसरे दिवशी दि. ११ फेब्रुवारीला रात्रीच्या गाडीने दिल्ली सोडली व दुसरे दिवशी पहाटे ग्वाल्हेरला पोचलो ! माझ्या रिक्षाचा आवाज ऐकून दाराशीच माझ्या पत्नी माझी वाट पाहत उभ्या होत्या. त्यांनी पाठीवर हात ठेवून मला घरात नेले. त्यांच्या एकाच हाताचा आधार मिळून माझा तोल मी सावरू शकलो होतो !

दिल्ली सोडायच्या पूर्वी ११ तारखेला दुपारी आम्ही लालकिल्ल्यात, बंदीगृहात गेलो होतो. तेथे सगळ्या अभियुक्तांना पायात दंडाबेडी घातलेली पाहिली. डॉक्टर परचुऱ्यांनादेखील ! ते पाहून मी अक्षरशः शहारलो होतो. तेथे मी एका वकीलपत्राचा लेख लिहिलेल्या कागदावर अपिलासाठी नथूराम, गोपाळ गोडसे नि डॉक्टर परचुरे यांच्या स्वाक्षऱ्या घेतल्या होत्या. (नथूरामसाठीसुद्धा अपिलात मी वकील रहावे अशी नथूरामची इच्छा होती.) अपील सिमला येथे पूर्व पंजावच्या उच्च न्यायालयापुढे दाखल करायचे निश्चित झाले होते. मी सकाळीच गोपाळ गोडसे व डॉक्टर परचुरे यांच्या वतीने दाखल करावयाच्या अपीलांचे मसुदे तयार करून ठेवले होते. ते त्या त्या पक्षकारांना दाखवले होते व आमचे दिल्लीचे सहयोगी श्री. गणपतरायजी यांच्या जवळ दिले होते. दिल्लीला असताना माझ्या लक्षात आले नाही, पण ग्वाल्हेरला आल्यावर लगेच जाणवले की, मला शिंदे सरकारच्या ग्वाल्हेर संस्थानातला वकील म्हणून पूर्व पंजाबच्या उच्च न्यायालयामध्ये काम करण्याची त्या न्यायालयाच्या नियमाप्रमाणे मोकळीक नव्हती. पण अपराधासंबंधी अपील होते व प्रारंभिक न्यायालयात कामही केले होते. म्हणून मी लवकरच पूर्व पंजाब उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींच्या सेवेसी तेथील कोर्टाच्या रजिस्ट्रारद्वारा एक निवेदन रीतसर पाठवून दिले व माझ्या तिघाही पक्षकारांसाठी त्यांच्या वतीने अपिलात काम चालविण्याची अनुमती मला देण्याची कृपा करावी असे निवेदन केले. पूर्व पंजावच्या उच्चन्यायालयीन न्यायमूर्तींनी मला तशी अनुमती दिल्याचे कळवून तत्पर सौजन्य दाखविले. येथे मला हेही लिहावेसे वाटते की, माझ्या माहितीत ग्वाल्हेरच्या संस्थानी हायकोर्टाचा वकील म्हणून भारतीय हायकोर्टात काम चालविण्याची संधी मिळालेला मी ग्वाल्हेरचा त्यावेळी एकटाच पहिला वकील होतो !

त्यानंतर सुमारे दीड महिन्याने मला अपिलाच्या सुनावणीची तारीख कळविणारे व उच्च न्यायालयात डॉ. परचुरे, गोपाळ गोडसे व नथूराम या तिघांच्याहीवतीने अपिलात काम चालविण्यासाठी अनुमती देणारे आज्ञापत्र डाकेने मिळाले, नि त्याबरोबरच लालकिल्ल्यातील ' महात्मा गांधी खून खटला १९४८ ' या प्रकरणाच्या छापलेल्या कागदांची जवळजवळ हजार पानांची सहा पुस्तके विषयवारीने बांधलेली मला पाठवून दिली होती ती मिळाली. यांमध्ये एक पुस्तक लालकिल्ल्यातील अभियोगपर्वाचे–जज्ज आत्मचरणजींच्या निर्णयाच्या साद्यंत प्रतिलिपीचे–होते.

अपिलाचे काम चालविण्याची तयारी म्हणून त्या छापील पुस्तकांवरून तर्कनिवेदनाच्या मुद्यांची टाचणे लिहिण्याची मी तयारी सुरू केली. लालकिल्ल्यांतील कामाची सर्व टाचणे मजजवळ होतीच. त्याच अनुषंगाने छापील पुस्तकांच्या पानावरच संदर्भित जागी परस्पर उल्लेखाची टाचणे लिहायला मी आरंभ केला. अपिलाच्या तयारीचा आरंभ म्हणून मी सुरुवातीस जज्ज आत्मचरणजींच्या निर्णयाचे पुस्तक घेऊन ते वाचायला लागलो. दहा पंधरा पाने वाचताच ते वाचणे मला नकोसे व्हायला लागले. तो निर्णयलेख माझ्याने वाचवेना – वाचावासाच वाटेना ! ओळीच्या ओळी वाचून काय लिहिले आहे ते लक्षात येत नव्हते. शेवटी त्रासून मी तो निर्णयलेख वाचण्याचेच सोडून दिले. ते निर्णयाचे पुस्तकच मी बाजूला ठेवून दिले. मी बाकीच्या पुस्तकांवरून व माझ्याजवळच्या कागदांवरून डॉ. परचुरे यांच्याविषयीची, गोपाळ गोडसे यांच्याविषयीची मुद्यांची टाचणे करायला आरंभ केला नि लवकरच माझी कामाची गाडी वेगाने चालू लागली. जज्ज आत्मचरणजींच्या निर्णयाचे ते ' भयंकर ' पुस्तक मी माझ्या टेबलावर कागदांच्या ढिगाखाली बंदोबस्ताने ठेवून दिले आहे या विचारानेच मला किती मोकळे मोकळे वाटायला लागले होते. जणू माझ्या अपील तयारीच्या मार्गावर धोक्याचा लाल कंदिल कोठेही नसून हिरव्यागार आशांचे हिरवे दिवेच ठिकठिकाणी मला दिसत होते नि माझा मार्ग निर्वेध, निष्कंटक आहे याचा विश्वास वाटत होता मला !. प्रिय वाचक, मी मोकळ्या मनाने कबूल करतो नि मी सांगतो त्यावर आपण विश्वास ठेवावा. अजूनही जज्ज आत्मचरणजींचा तो निर्णय माझ्याने सगळा नि एकदम कधीच वाचवला नाही. त्या अपिलाच्या तयारीच्या दिवसांत मी खरोखरीचा भित्रा झालो होतो का – अजूनही खरा भित्राच आहे का ?

या दिवसांतले आणखी एक आत्मनिवेदन मला सांगायला हवे नि ते मी अति अनिच्छेने सांगत आहे. त्या १२ फेब्रुवारी १९४९ ला ग्वाल्हेरला परत आल्यापासून ते २५ एप्रिलला सिमल्याला जाण्यासाठी निघेतोवर ग्वाल्हेर येथे माझी पत्नी, माझे ज्योतिषी मित्र नी बाररूममधले एक दोन सज्जन सहयोगी यांच्या सहानुभूतीशिवाय महात्मा गांधी खून खटल्याबद्दल किंवा अपीलाबद्दल माझ्याशी कोणीही काहीही बोलले नाही. मी करीत असलेल्या प्रयत्नात धीर द्यायला म्हणून किंवा महात्मा गांधी खून खटल्यामध्ये बचावपक्षाचे काम करण्याचे पत्करून मिळविलेल्या अपयशासाठी वाक्ताडन म्हणूनही कोणी माझ्यासमोर ब्रसुद्धा उच्चारला नव्हता. वाळीत टाकलेल्याच्या तिरस्कृतीच्या वेदना माझ्या अपयशाच्या दिवसात मला अधिकच तीव्रतेने जाणवत होत्या! सर्व शक्तिमान नि सर्वसाक्षी परमेश्वराच्या निर्मळ न्यायनिवाड्यावर विश्वास ठेवून त्याच्याजवळ करुणा याचना करूनच मला अजूनही काही प्रयत्न करण्यासाठी धीर मिळत होता! ¤

## १४ : श्री. आत्मचरण आय. सी. एस.

मी श्री. आत्मचरण आय. सी. एस. यांना प्रथम दि. २७ मे १९४८ रोजी लालकिल्ल्यातील अभियोगपर्वात कोर्टाच्या विस्तीर्ण दिवाणखान्यात न्यायपीठाच्या मध्यभागी पीठासीन स्पेशल जज्ज म्हणून बसलेले पाहिले. आत्मचरणजींची लालकिल्ल्यातील अभियोग-पर्वासाठी स्पेशल जज्ज म्हणून नियुक्ती भारतीय शासन गॅझेट दि. १५-५-४८ मध्ये प्रकाशित आज्ञापत्रकाद्वारा प्रभावित दिल्ली प्रांताला लागू केलेल्या मुंबई सार्वजनिक सुरक्षा कायद्यान्वये झालेली होती. ते उत्तर प्रदेश शासनाच्या न्यायिक सेवा श्रेणीमधले डिस्ट्रिक्ट अँड सेशन्स जज्ज श्रेणीचे न्यायाधीश असून त्यांना ही बदलीची जागा मिळाली होती. त्यापूर्वी ते कानपूर येथे डिस्ट्रिक्ट अँड सेशन्स जज्ज म्हणून काम करीत असत. आत्मचरणजींचे घराणे उत्तर प्रदेशातील आग्र्याचे.

आत्मचरणजी हे वयाने मध्यम प्रौढ, अंदाजे ५ फूट ६ इंच उंचीचे, काळसर गव्हाळी वर्णाचे, डोक्यावर दाट काळे केस, चेहरा गुबऱ्या-गालांचा साफ श्मश्रू केलेला, नाकावर जाड भिंगांचा चष्मा नि त्या भिंगांमधून डोळे लकाकत असलेले असे दिसायला होते. ते कोर्टात स्वतःच चालवीत असलेल्या मोटारीने, कंबरेवर इस्त्रीची विजार, अंगात स्वच्छ पांढरा शर्ट, नि गळ्यासोबती टाय व उघड्या डोक्याने येत आणि तरतरीत चालीने कोर्टाच्या पायऱ्या चढून आपल्या विश्रान्तीकक्षेत जात. ते न्यायालयातल्या न्यायपीठावर भिंतीवरच्या घड्याळाच्या दहा ठोक्यांच्या पहिल्याच मात्रेवर आणि कोर्टातल्या शिरस्तेदाराच्या 'अटेन्शन प्लीज' च्या ललकारीपाठोपाठ पाऊल टाकीत. त्या ललकारीमुळेच आम्ही सर्वजण 'बाअदब बामुलाहिजा होश्शार' होऊन उभे राहत असू व जज्जमहोदयांची स्वारी पीठासीन झाली की मग बसत असू. आत्मचरणजी कोर्टात काळा कोट — काळा झगा घालून व गळ्यात श्वेतबंद — बॅण्डस् — बांधून उघड्या डोक्याने येत व आसनावर बसताच कोर्ट काम आरंभ करायला मुळीच उशीर लावत नसत. कामामध्ये मोजकेच व आवश्यक तेवढेच बोलत. इतर, अवान्तर बोलणे क्वचितच. कोर्टामध्ये रीतसर काम सुरू झाल्यानंतर जज्जमहोदयांच्या डाव्या बाजूला शिरस्तेदार बसलेले असत आणि हे शिरस्तेदार एकसारखे एका टाचणवहीमध्ये काहीतरी लिहीत असत. संभवतः कोर्टात जे काही, ज्या क्रमाने घडत असे त्याबद्दल बखरीवजा वृत्तान्त लिहित असावेत. संभवतः यासाठी की, आम्ही इच्छा दाखवूनसुद्धा शिरस्तेदारबाबू आम्हाला त्या रजिस्टर-मधले काहीही वाचू देत नसत. फारच पिच्छा पुरवला तर, हवी असलेली माहिती बऱ्याच वेळाने आठवल्यासारखे दाखवून — पण खरे म्हणजे चुपचाप रजिस्टरमध्ये पाहूनच — आम्हाला सांगायचे. जज्ज महोदयांच्या उजव्या बाजूला एक अतिशय कार्यकुशल असे टंकलेखक टंकलेखनयंत्र घेऊन व वही पेन्सिल घेऊन बसले असायचे. जज्जमहोदय सांगतील ते संपायच्या अगोदरच टंकलिखित झाल्यासारखे वाटायचे! जज्जमहोदयांच्या पाठीमागल्या प्रवेशदाराशी त्यांचा शिपाई जज्जमहोदय कोर्टात असेतोवर स्टुलावर 'हुश्शार' बसलेला असायचा.

मी इतरत्र यापूर्वीच्या कहाणीत सांगितल्याप्रमाणे जज्जमहोदयांच्या टेबलावर त्यांच्यासमोर एक ध्वनिग्राहक यंत्र ठेविलेले असायचे. त्याचे प्रयोजन एवढेच की, जज्जमहोदय जे काही बोलतील, आज्ञा देतील, टाईप करायला सांगतील ते सर्व आम्हा वकील मंडळींना, अभियुक्त मंडळींना श्रोतृवर्गालाही ध्वनिविस्तारक भोंग्यातून ऐकायला मिळावे. श्रोतृवर्गात बातमीदार मंडळीही असतच, पण जज्ज आत्मचरणजींची नेहमीची सवय अशी की, ते बोलायला लागले की, उजव्या हाताने ध्वनिग्राहक यंत्र जवळ ओढून त्याकडे तोंड करून बोलण्याऐवजी ते यंत्र डाव्या हाताने बाजूला सारीत. या सवईचा हेतू काय होता याचे समजण्यासारखे कारण आम्हाला कधीच कळले नाही. नेहमी त्रास मात्र असा होई की, आम्हा वकील मंडळींना जज्जमहोदयांचे बोलणे ऐकू यायचे नाही व पुष्कळदा त्यांनी ऐकलेले काय लिहवले याबद्दल वादावादी सुरू होई. आम्ही आडवळणाने जज्जमहोदयांना यंत्राकडे बघून बोलण्याबद्दल सुचवून पाहिले तरी, त्याचा परिणाम काही व्हायचा नाही. यामुळे आमचे काही काही वेळी कसे नुकसान होई याच्या काही गोष्टी पुढे संदर्भाने सांगेनच.

जज्ज आत्मचरणजी न्यायाधीशाच्या खुर्चीवर बसून दक्ष नि सरळ व्यवहाराचे जागृत दैवत असल्यासारखे वागत, पण त्याबरोबरच सहृदयता दाखविण्यास ते कधीच चुकत नसत. हा त्यांचा गुण आम्हाला सुरुवातीसच लक्षात आला. श्री. सावरकरांचे वयोमान व शरीरस्वास्थ्य याकडे बघून व त्यांच्याविषयींच्या भावनेने वकील मंडळींनी तसे सुचविताच जज्जमहोदयांनी सावरकरांसाठी आरामशीर अशी खुर्ची तावडतोब आणवून व ती खुर्ची अभियुक्तांच्या पिंजऱ्यातच, पण न्यायमंचाच्या शक्य तितक्याजवळ पहिल्याच क्रमांकावर ठेवून तेथे सावरकरांची बसण्याची व्यवस्था करून दिली. अशा रीतीच्या सौजन्यपूर्ण व्यवहाराची कितीएक उदाहरणे सर्वांच्या संदर्भाने अगदी नथूरामबद्दलचीही देता येतील. नथूराम आपले तर्कनिवेदनाचे भाषण कोर्टामध्ये देत असता ते जज्ज आत्मचरणजींनी कशा उत्सुकतेने लक्ष देऊन व एक दोन वेळी तर अश्रुभरल्या डोळ्यांनी बघत ऐकले होते, हे मी स्वतः डोळ्यांनी पाहिले

आहे. पण जज्ज आत्मचरणजींच्या सहृदय स्वभावाची तसेच व्यवहार-दक्षतेची एक आठवण अगदी स्वच्छ, डोळ्यांसमोर आताच घडल्या-सारखी, अजून आहे. आम्ही ऑगस्ट महिन्यातील एके दिवशी कोर्टात वेळेआधीच जाऊन दहा वाजण्याची वाट पाहत होतो. अजून पाच सात मिनिटे अवकाशच होता. इतक्यात जज्जमहोदयांचा शिपाई बावरलेल्या मुद्रेने धावतच कोर्टात आमच्याजवळ आला व त्याने श्री. दप्तरी यांना जे काही सांगितले त्याचा सुसंगत वृत्तान्त थोडक्यात असा की, जज्जसाहेबांचे वडील आज पहाटेच आग्रा येथे निवर्तले आहेत. त्याची तार जज्जसाहेबांच्या खिशातच आहे. तरीपण ते कोर्टात आले आहेत. आजचे ठरलेले काम करून मग आग्र्याला जायचे म्हणताहेत. साक्षीदार, वकील, अभियुक्त, कर्मचारी, श्रोते कुणाचेच नुकसान न व्हावे असे ते म्हणतात. तुम्ही काही तरी करा! जज्ज आत्मचरणजींचे स्वत:च्या साक्षात् पितृवियोगाच्या अतिदु:खद वेळीही 'इतके दक्ष नि स्वच्छ सरळ व्यवहारी' वागणे बघून आम्ही सर्वच स्तिमित होऊन श्री. दप्तरींबरोबर जज्जमहोदयांच्या विश्रान्तीकक्षेमध्ये भराभर गेलो. जज्जमहोदय खांद्यावर काळा कोट व झगा टाकून घड्याळाकडे बघत टेबलाजवळ गंभीर चेहऱ्याने बसले होते. आम्हा सर्वांना बघताच ते उठून उभे राहिले, नि काही बोलायला तोंड उघडणार तो, त्यांच्या तोंडातून हुंदकाच बाहेर पडला, नि डोळ्यांतून झरझरा अश्रू ओघळायला लागले! दप्तरींनी जज्ज आत्मचरणजींच्या पाठीवर हात ठेवून त्यांचे सांत्वन केले व त्यांनी जज्जमहोदयांनी तात्काळ आग्र्याला जावे असे आग्रहाने सांगितले. आम्ही सर्वांनीच निरनिराळ्या शब्दांत तेच म्हटले. शेवटी आत्मचरणजींनी शिरस्तेदाराला बोलावून आज प्रकरण स्थगित करून तारीख दुसरी दिल्याची आज्ञा लिहावयास सांगितले व ते स्वत: बाहेर जाऊन मोटारीत बसले नि कोर्टातून निघून गेले. पुढच्या सुनावणी तारखेवर आम्हाला कळले की, जज्ज आत्मचरण कोर्टातून निघून इतर कुठेही न जाता सरळ आग्र्याला निघून गेले होते!

जज्ज आत्मचरणजी कोर्टात अभियुक्तांशी कधीच अशिष्टतेने किंवा कठोरपणाने वागले, बोलले नाहीत. साक्षीदारांशीही रागावून किंवा कठोरपणे क्वचितच वागत. लालकिल्ल्यामध्ये आलेल्या नाना थरांतल्या नानावृत्तींच्या सगळ्या साक्षीदारांना सोडून जज्ज आत्मचरणजींचा राग एके दिवशी कोर्टात ग्वाल्हेरहून आलेल्या दोघा मॅजिस्ट्रेट महोदयांपैकी एका महाशयावर बरसलेला आम्हाला पाहायला मिळाला. प्रसंग असा होता की, मॅजिस्ट्रेट मजकुरांनी माझ्या प्रश्नाला दिलेले एक उत्तर कसे चूक आहे हे त्यांच्या गळ्यात घालण्यासाठी म्हणून मी मजजवळचे ग्वाल्हेर शासन गॅझेट दिनांक २९-१२-१९१७ मॅजिस्ट्रेट मजकुरांना दाखविले व त्यामध्ये दिलेल्या ग्वाल्हेर म्युनसिपल कमिटीच्या अधिकारक्षेत्राच्या सीमा बघून त्यात ग्वाल्हेरचा किल्ला कोठे येतो ते दाखवा असे म्हटले. ते गॅझेट वाचताच मॅजिस्ट्रेट मजकुरांना आपली चूक उमगली, पण सरळ उत्तर देण्याऐवजी त्यांनी गॅझेटच्या तारखेचा हवाला देऊन सांगितले की, २९-१२-१९१७ ला मी ग्वाल्हेर संस्थानच्या नोकरीत नव्हतो म्हणून हे गॅझेट मला माहीत नाही.' हे साक्षीदाराचे उत्तर ऐकताच मी काही बोलणार तोच जज्ज आत्मचरणजी गरजलेच, 'भलतेच काही तरी! मग तुमचे असे म्हणणे आहे की काय, की इंडिअन पिनल कोड जेव्हा शासकीय गॅझेटमध्ये प्रकाशित होऊन प्रभावित झाले त्या वर्षी आपणांपैकी बहुतेकांचा जन्मही झाला नव्हता, म्हणून इंडिअन पिनल कोडाचा कायदा-आपणा कोणाला लागू नाही? तुम्ही हे गॅझेटमधले नोटिफिकेशन पाहण्याची कधीच काळजी घेतली नाही ही तुमची चूक आहे, ती सरळ कबूल का नाही करीत? परंतु जज्ज आत्मचरणजींच्या रागाची अशी बरसात होऊनदेखील त्यांनी साक्षीदाराचे उत्तर म्हणून केवळ एवढेच लिहविले की, ग्वाल्हेर म्युनसिपल कमिटीच्या सीमारेषा सांगणारे ग्वाल्हेर शासन गॅझेट दिनांक २९-१२-१९१७ मधल्या नोटिफिकेशनची मला माहिती नाही.

जज्ज आत्मचरणजी कोणाही साक्षीदाराच्या वय, प्रकृतीस्वास्थ्य, स्त्रीपुरुषजाती, शिक्षण, वृत्ती मान्यता एवढेच काय, पण सामाजिक स्थानाबद्दलही विचार करण्यास तत्पर असत. जरूर तेव्हा साक्षीदाराला संरक्षण देण्याचा प्रयत्न ते नेहमी करीत.

मी लालकिल्यातील कडेकोट बंदोबस्ताच्या कोर्टात काम करायला लागल्यावर लवकरच तेथल्या कोर्टामधल्या व कोर्टाबाहेरच्या बंदिस्त वातावरणामध्ये मला अवघडल्यासारखे वाटायला लागले होते. कोर्टाभोवतीचे काटेरी तारांचे कुंपण मला बोचून खाईल असे वाटायचे. प्रत्येक दारापाशी कोर्टाच्या आतच उभे असलेले बंदूकधारी शिपाई, आम्हा वकिलांच्या मागेच बसलेले गणवेषातले नि साध्या वेषातले वरेचसे पोलिस अधिकारी बघून मला कोंडल्यासारखे वाटे. मी या सगळ्या व्यवस्थेतिरेकाबद्दल आक्षेप घ्यायला सुरुवात केली. मी व माझ्या सूचनेवरून माझे सहयोगी बॅनर्जी यांनी आक्षेप-अर्जही कोर्टात दिले. जज्ज आत्मचरणजींनी वकिलांची झडती घेण्याची प्रथा बंद केली आणि पोलिस आणि सी. आय. डी. अधिकाऱ्यांना आम्हा वकिलांपासून 'सप्रतिष्ठ अंतरावर' बसण्या-वावरण्याची सूचना दिली. दारावरच्या बंदूकधारी शिपायांबद्दलचा आक्षेपांचा गुंता जज्ज आत्मचरणजींनी त्या त्या शिपायांना दाराबाहेर, आम्ही त्यांना पाहू शकणार नाही अशा ठिकाणी, पहाऱ्यावर उभे राहण्याची सूचना देऊन सोडवला! मी समजून चुकलो की, हे 'स्पेशल जज्ज' महाशय भारत सरकारच्या गृहखात्याच्या 'आज्ञापत्राचे' उल्लंघन करण्याचे धैर्य दाखवणार नाहीत. तेव्हा सध्या गप्प बसून योग्य वेळी व योग्य संदर्भात याचा खरपूस समाचार घेणेच योग्य होईल. व तसेच केले. त्यावेळी आक्षेपांच्या नावाने आक्रस्ताळीपणा करून, अभियोगपर्वाच्या चालत्या गाड्याला खीळ घालण्याचा शहाणपणा करू नये, हीच माझी इच्छा व मत होते.

आम्हा वकिलांशी जज्ज आत्मचरणजी अतिशय सौजन्याने वागत नि आमच्यासाठी काहीतरी करण्याचा मार्ग काढीत व आम्हाला उपकृत करीत. जज्ज आत्मचरणजींच्या उजव्या बाजूला अभियोगपक्षाचे अधिवक्ते ॲडव्होकेट जनरल दप्तरी, जे. सी. शहा, एन. के. पेटीगारा, रायबहादुर ज्वालाप्रसादजी यांच्यासारखी मंडळी वसलेली असत; डाव्या बाजूला बॅरिस्टर जमनादास मेहता, ल. ब. भोपटकर, बॅनर्जी यांच्यासारखी निष्णात वकील मंडळी बसलेली असत. अशा मान्यवर मंडळींसमोर जज्ज आत्मचरणजी, हडेलहप्पीपणाने, कटुकर्कशपणाने तर राहूच द्या, त्रासिकपणेदेखील वागतील असे शक्यच नव्हते. ॲडव्होकेट जनरल दप्तरी हे तर प्रसन्न आणि सदय अधिवक्तृत्वाचे भांडारच होते. तंग आणि अवघडून टाकणाऱ्या कितीतरी •

वेळी त्यांनी आपल्या प्रसन्नतेने, चातुर्याने नि विनोदाने वातावरण कसे चटकन मोकळे करावे! परंतु मलाच एकदा जज्ज आत्मचरणजींच्या रोषाची शिकार व्हावे लागले. खरे म्हणजे त्यांच्या रोषाची प्रत्यंचा ताणली गेली ती माझ्या एका बचावपक्षाच्या सहयोगी वकिलाच्या अशिष्ट वर्तना–बोलण्याविरुद्ध. पण रोषाचा बाण लागला तो मला. माफीचा साक्षीदार बडगे याचे कूटपरीक्षण माझे नव्यानेच झालेले पक्षकार अभियुक्त गोपाळ गोडसे यांच्यावतीने करायला त्या दिवशी मी पहिल्यानेच उभा राहिलो होतो. साक्षीदाराला इंग्रजीत एक प्रश्न विचारताना माझी शब्दयोजना जितकी काटेकोरपणे व्हायला पाहिजे होती तितकी झाली नसावी किंवा काहीतरी झाले नि दफ्तरींनी 'या प्रश्नामध्ये आक्षेपित घटनेची कबुली आहे' असे म्हणून हा प्रश्न फायलीवर लिहून घ्यावा असा आग्रह केला व माझी चूक झाल्याचे लक्षात येऊन मी माझा प्रश्न अशा कबुली अर्थाचा मुळीच नव्हता असे कोर्टाला समजवून सांगत असतानाच, माझे सहयोगी तावातावाने जज्जमहोदयांना म्हणाले की, 'दफ्तरींनी मध्येच बोलून शब्द बदलून आपल्याला प्रश्न सांगितला नि आपण त्यांचा आदेश लिहून घेत आहात!' झाले! माझी समजावणी कुणीकडेच गेली! जज्ज आत्मचरणजींनी ओठ आवळून आम्हावर आपले डोळे वटारत माझा कथित प्रश्न फायलीवर लिहून घेतला. मी फारच ह्यांच्या पाठीमागे लागल्यासारखे केले. भोपटकरांनाही विचारले नि कमीत कमी या कबुलीच्या अर्थाने हा प्रश्न मी विचारला नव्हता असे माझे म्हणणे असल्याबद्दल तरी लिहून घ्या असे म्हटले व हा गैरसमज, कोर्टाच्या अनुवादकाने ऐकणे व त्याचे भाषांतर मराठीमध्ये करून बडगेला विचारणे व बडगेच्या उत्तराचा अनुवाद करणे यात अनुवादाचीही चूक झाली असण्याची शक्यता होती असे सांगितले तेव्हा कोठे जज्जमहोदयांनी त्या अर्थाचे माझे म्हणणे म्हणून लिहून घेतले नि त्या माझ्या कथित प्रश्नाचे उत्तर न घेता कूटपरीक्षण पुढे चालू झाले. पण आक्षेपजनक शब्दांचा प्रश्न फायलीवर गेलाच होता, याचे मला फार वाईट वाटले. माझे पुढले कूटपरीक्षण मी फार काळजीपूर्वक आणि दक्षतेने पुरे केले नि मी खाली बसलो. राहून राहून मला, इतके दिवस आपल्या कामाने आपण कोर्टावर व कोर्टामध्ये जे मत निर्माण केले होते ते सगळे व्यर्थ गेल्यासारखे वाटायला लागले नि पुढल्या साक्षीदारांचे जरूर असो नसो, काहीतरी प्रश्न विचारून त्यांची साक्ष माझ्या कूटपरीक्षणाने पाडण्याचा अट्टाहास करण्याचे टाळू लागलो. अर्थात आवश्यक तेवढे कसोशीने करीत होतोच. पण माझे हे हात राखून काम करणे जज्ज आत्मचरणजींच्या चाणाक्ष नजरेतून सुटले नाही. शेवटी न राहवून एके दिवशी त्यांनी भर कोर्टात माझ्या कूटपरीक्षणाला नकार देण्याबद्दल मला म्हटले, 'इनामदार! काय झाले आहे तुम्हाला? तुम्हाला बरे वाटत नाही का? तुम्ही असे उदास, खाली मान घालून का बसला आहात? अलीकडे तुम्ही कूटपरीक्षण करावयास नाखूश असता, असे का?' त्यांचे शब्द ऐकून मला मावरल्यासारखे वाटले नि मी त्यांचे ह्या चौकशीबद्दल आभार मानून मला काही त्रास होत नसल्याचे व 'मी आपले कर्तव्य मला शक्य होईल तितक्या चांगल्या तऱ्हेने करण्याचा प्रयत्न करीत आहे!' असे म्हटले व पुढे हळूहळू उत्साहाने काम करायला लागलो. माझ्या अशिष्ट वागण्याने मी कोर्टाचे मत खराब केले हे खरे नव्हे असे समजायला लागलो होतो नि मला मोकळे वाटले होते.

सप्टेंबरच्या दुसऱ्या पंधरवड्यात व ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात मला माझे पक्षकार गोपाळ गोडसे व डॉक्टर परचुरे यांच्याविरुद्ध ज्या काही पोलिस अधिकाऱ्यांनी चौकशी केली होती त्यांपैकी काहींचे कूटपरीक्षण करण्याची संधी मिळाली होती. सगळ्या अनुभवी वकिलांना ठाऊक असतेच की, या पोलिस चौकशीअधिकाऱ्यांचे कूटपरीक्षण करणे नि त्यांच्याकडून आपल्या पक्षकाराला उपयोगी अशी किंवा अभियोगपक्षाला हानिकारक अशी उत्तरे काढून घेणे हे महाकठीण काम असते! हे चौकशी अधिकारी नियमित प्रशिक्षण घेतलेले असतात आणि अनुभवाने तसेच अभियोगपक्षाच्या पोलिसवकील किंवा अधिवक्त्यांच्या सूचक सांगण्याने साक्ष द्यायला अगदी 'तय्यार' होऊन आलेले असतात. आणि त्यांच्याकडून काही काढून घेणे शक्य होत नाही. एवढेच नव्हे, ते वकिलाला व त्याच्या पक्षकार अभियुक्ताला खड्डयात ढकलण्याचा प्रयत्न करतात. पण अशा ठसकेबाज अधिकाऱ्यासाठीही काही मात्रांचे वळसे मी शोधून काढले होते व त्यांचा उपयोग करीत मी मला शक्य होईल तितक्या चांगल्या तऱ्हेने या महात्मा गांधी खूनकटाच्या चौकशी अधिकाऱ्यांचे कूटपरीक्षण करीत होतो. मी अभियोग साक्षीदार क्रमांक १२३ श्री. देऊळकर, त्यावेळचे पुण्याचे डेप्युटी सुपरिंटेंडेंट पोलिस यांचेही कूटपरीक्षण केले. त्यांनी डॉ. परचुऱ्यांचे प्रश्नपरीक्षण केल्याबद्दल व त्यांचा कबुलीजबाब लिहून घेण्याची व्यवस्था केल्याबद्दल सांगितले होते. मी कूटपरीक्षणासाठी उभा राहिलो व सहजगत्याच त्यांना 'तुम्ही प्रश्नपरीक्षण कसे करता' असा प्रश्न विचारला व मी असा प्रश्न विचारण्याचे कारणही सांगितले व मुंबई पोलिसांच्या हुशारीबद्दल चांगली तारीफ केली. देऊळकरांनी माझ्या प्रश्नांना मोकळेपणी उत्तरे दिली. ती येथपर्यंत की, 'तुम्ही साक्षीदाराला त्याच्या सगळ्या नातेवाईकांविषयी, शिक्षणाविषयी, त्याच्या राजकारणी मतांविषयीही विचारता हे खरे का?' या प्रश्नाला हो विचारतो असे उत्तर देऊन पुढे प्रश्नपरीक्षणाची ही माझी माझी पद्धत मी कायद्यानुसार व अनुभवाने बनविली आहे' असे उत्तर त्यांनी दिले. मी हा विषय तेवढ्यावरच सोडून पुढे इतर प्रश्न विचारत होतो नि देऊळकरही मोकळेपणी उत्तरे देत होते. मला आश्चर्य वाटले होते की, माझ्या अशा पुष्कळशा असंबद्ध प्रश्नांना अभियोगपक्ष किंवा कोर्ट आक्षेप कसे नाही घेत. पण मला याच असंबद्ध प्रश्नांच्या उत्तरांतून पुढे एक फारच उपयोगी मुद्दा माझे पक्षकार डॉक्टर परचुरे यांच्यावतीने कोर्टापुढे सांगता आला होता. असो. या साऱ्या सकृत्‌दर्शनी असंबद्ध घटनेची गोष्ट सांगण्याचे प्रयोजन येथे सांगायचे ते असे की, जज्ज आत्मचरणजींनी माझे सर्व कूटपरीक्षण काही काटछाट न करता पूर्णपणे व शब्दशः लिहून घेतले होते. नेहमीप्रमाणे 'जरुरीपुरते' लिहिण्याच्या पद्धतीने नव्हते.

## तुम्ही असे उदास, खाली मान घालून का बसला आहात?

त्यानंतर दुसरे पोलिस अधिकारी साक्षीला आले ते ग्वाल्हेरचे सी. आय. डी. इन्स्पेक्टर श्री. मंडलीक. त्यांनी डॉ. परचुरे यांच्याविरुद्ध बरेचसे चौकशीचे काम केले होते. त्यांचे परीक्षण सुरू झाले दिनांक १ ऑक्टोबर १९४८ ला. पण ते सुरू झाले होते तिसऱ्या प्रहरी व मुख्य परीक्षण पूर्ण होण्यातच त्या दिवशीचा कोर्टाचा वेळही पूर्ण झाला. तो दिवस होता शुक्रवार व त्यानंतर होती दोन दिवसांची साप्ताहिक सुटी. तिचा फायदा मी ग्वाल्हेरला न जाता श्री. मंडलिकांच्या कूटपरीक्षणाची तयारी करण्यासाठी घेतला आणि ४ ऑक्टोबरला सोमवारी सकाळी कोर्टात जाताच कूटपरीक्षण सुरू केले. साक्षीदाराने चौकशी करताना जे काही केले म्हणून मुख्य परीक्षणात सांगितले होते त्याबद्दल विचारत न बसता, त्यांनी काय करायला हवे होते त्याबद्दल विचारत न बसता, त्यांनी काय करायला हवे होते व त्यांनी काय काय केले नाही, काय काय जाणूनबुजून टाळले ते तेवढेच विचारायचे धोरण पाळले, नि तशा प्रश्नांची सरबत्तीच सुरू केली. मी सावकाश नि शांतपणे व मोजक्या शब्दांत प्रश्न विचारीत होतो नि साक्षीदाराला 'नाही बुआ, मी नाही केले हे–मला नाही सुचले–मला हे करणे आवश्यक आहे असे नाही वाटले' अशी उत्तरे देण्याशिवाय आपला शहाणपणा काहीच दाखवता येत नव्हता. केलेल्या तयारीच्या आधारावर जितके काही प्रश्न विचारणे शक्य होते ते सगळे विचारले व कूटपरीक्षण संपवले. पाहिले तो १२–४५ वाजून गेले होते. माझे कूटपरीक्षण जवळजवळ २ तास ३५ मिनिटे चालले होते! नि त्यामध्ये जज्जमहोदयांना किंवा श्री. दफ्तरींना आक्षेप घ्यायला कोठेही जागा सापडली नव्हती याने मला बरे वाटले होते. आम्ही मधल्या विश्रांतीसाठी उठून चहा प्यायला गेलो, पण तेथे जाऊन चहाचा कप हातात घेतो न घेतो तोच, जज्ज आत्मचरणजींचा शिपाई तेथे आला नि त्याने लवून सलाम करीत मला 'साहाबने आपको याद फरमाया है!' असे सांगितले. मी प्रथम दचकलोच आणि 'हे काय आणखी निघाले!' असे म्हणत उठलो. जज्ज आत्मचरणजींच्या विश्रांती कक्षेमध्ये थोडे घाबरतच गेलो. माझी कल्पना की, मी दिलेल्या नकलेच्या अर्जाच्या संबंधाने काही काम असेल. आत गेलो नि पाहिले तो जज्ज आत्मचरणजी आपला चहा पिऊन खुर्चीवर आरामात रेलून सिगरेट पीत बसले होते. मला पाहून ते उठून उभे राहिले नि त्यांनी मला अपेक्षेप्रमाणे माझ्या नकलेबद्दल काही–अगदी क्षुल्लकच–विचारले. ते मी सांगितल्यावर माझ्याशी हस्तांदोलन करीत मला म्हटले, 'बसा. माझे हार्दिक अभिनंदन तुम्हाला. तुमचे आजचे काम फारच चतुराईचे, चांगले झाले. तुमचे कूटपरीक्षण अडीच तास चालले होते पण ते लिहून घेताना मला फार मजा वाटत होती–आनंद वाटत होता. मला काही आक्षेप घ्यावा असे वाटलेच नाही. खरं सांगायचं म्हणजे सुरवातीपासूनच मी तुम्हाला एक सर्वांत चांगले कूटपरीक्षक म्हणून ओळखले आहे. तुम्ही बोलताना थोडे चाचरता हे माझ्या लक्षात आले आहे. पण तुमची शांतपणे, पद्धतशीर रीतीने साक्षीदाराला हाताळण्याची रीत, तुमचे विचारपूर्ण मुद्दे, आणि विशेषेकरून कोर्टासमोर वागायची तुमची रीतभात, ही फारच सौजन्याची व लक्षणीय अशी आहेत. तुमचे मी खरेच अभिनंदन करतो. तुमची माझी ओळख झाली याने मला फार बरे वाटते. मी आता हे संपल्यावर माझ्या प्रांतात परत जाईन तेव्हा तेथे सगळ्यांना तुमच्याबद्दल व तुमच्या रीतीभातीबद्दल सांगणार आहे.' आणि मग ते म्हणाले, 'आणि आज मला तुमची क्षमाही मागायची आहे. मी त्या दिवशी बडगेच्या कूटपरीक्षणाच्या वेळी तुमच्याविरुद्ध असे काही लिहिले ना, त्याबद्दल तुम्ही त्या दिवशी थोडे गडबडलाच होता. मला ते दिसत होते. एरवी मी त्याचे काही मानले नसते. पण तुमचे ते...महाशय! त्यांनी मधेच तोंड घातले. त्यांनी उर्मटपणे मी दफ्तरींचे हुकूम पाळतो आहे असे मला म्हटले, तेव्हा मी चिडलो. माझा राग होता त्या... महाशयांवर, पण मी कोर्टाच्या फायलीवर लिहिले ते तुमच्याविरुद्ध. सामान्यतः असे काही करण्याची माझी वृत्ती नसते. पण मी असे केले याचे मला वाईट वाटते. दुसऱ्यावरचा राग तुमच्यावर काढला याचे वाईट वाटते. पण त्याची काळजी करू नका हं! माझ्या शब्दांवर विश्वास ठेवा, तुम्ही इतक्या चांगल्या तऱ्हेने तुमच्या प्रकरणाचा बचाव मांडला आहे, त्याचा मी सर्व परीने योग्य तोच न्यायनिवाडा करीन' असे म्हणून श्री. आत्मचरणजींनी माझ्या आजवरच्या व वकिली व्यवसायाबद्दल, ग्वाल्हेरची बाररूममधली परिस्थिती, तेथले माझे श्रेष्ठ सहयोगी वकील नि ज्येष्ठ कुटुंबी या सर्वांबद्दल प्रश्न विचारले. आम्ही आमचे बोलणे संपवून एकमेकांचा निरोप घेतला तेव्हा दुपारचे २ वाजून १० मिनिटे झाली होती. तिसऱ्या प्रहराची सुरवातच झाली होती आणि बाहेर, कोर्टातली सगळी मंडळी 'जज्ज महोदय अजून कोर्टात का येत नाहीत, इनामदारांशी काय बोलत आहेत' याची काळजी करत वाट पाहत होती! मी परत कोर्टात येताच सगळ्यांनी माझ्यावर चौकशीचा भडिमार करायला सुरवात केली. पण त्यांची उत्तरे देण्याची मला वेळच आली नाही. कारण जज्ज महोदयही कोर्टात गंभीर चेहऱ्याने आले होते!

दुसरे दिवशी सकाळी कोर्टात येताना दफ्तरींची माझी गाठ जिन्यावरच पडली. मला पाहताच दफ्तरींनी मला हाक मारली व 'कालच्या माझ्या कामाबद्दल' माझे अभिनंदन केले नि हसत म्हटले, 'काल मी तुमच्यासाठी एक खड्डा करून ठेवला होता व मी मंडलिकांना, त्या खड्ड्यापर्यंत तुम्हाला आणून खड्ड्यात कसे पाडायचे हे सांगून ठेवले होते. पण तुम्ही माझ्यापेक्षा जास्त चतुर निघालात. तुम्ही त्या वाटेने गेलाच नाहीत. फारच छान काम केलेत हं तुम्ही!'

मी हे इतक्या दिवसांनंतर येथे एक गोष्ट सांगायची म्हणून काही तरी भरकटत लिहिले आहे असे नव्हे. या घटनेचा वृत्तान्त मी माझ्या नेहमीच्या सवयीप्रमाणे त्यावेळीच दिनांक ४ ऑक्टोबरला घरी पत्र लिहून 'शब्द नी शब्द' कळविला होता. आज पुन्हा ते सर्व येथे गोष्ट म्हणून सांगतो. कारण ह्या गोष्टी सांगण्यात माझा एक उद्देश, त्या वेळच्या लालकिल्ल्यातील अभियोगपर्वात मला ज्या निरनिराळ्या उत्कृष्ट माणसांच्या सहवासात येण्याचे भाग्य लाभले होते त्या सगळ्यांच्या आठवणी सांगून त्या सगळ्यांविषयी माझा आदरभाव व्यक्त करायचा, असाही आहे. या सगळ्या आठवणी कृतज्ञभावाने मी आजवर जपून बाळगल्या आहेत आणि अशा उत्कृष्ट माणसांचा सहवास वकिली व्यवसायातही मिळतो या विचाराने अजूनही मी सुखावत आहे.

त्यावेळी या अनुभवाने माझे आत्मशंकी मन पुष्कळच सावरले होते आणि जरी माझे त्या कामातले ध्येयलक्ष्य 'अजूनही आपल्या

आटोक्यात आले नाही' असें सारखे वाटायचे, तरी ते मिळविण्यासाठी आटोकाट प्रयत्न करण्याचा उत्साह पुन्हा मला वाटायला लागला होता. जज्ज आत्मचरणजी माझ्या बाजूचे आहेत–दप्तरींनाही माझ्याबद्दल साहानुभूती आहे असे वाटून त्या दोघांविषयी माझा आदरभाव वाढला होता !

मानवी स्वभावाचे असे उत्कृष्ट पैलू दाखवीत असता श्री. आत्मचरणजींचे कोर्टातले वागणे कसे काटेकोर, शिस्तीचे, आपण पत्करलेल्या वाटेने समोर बघून चालण्याचे, अगदी हाडाने गणिती असलेल्या विद्वानासारखे ! त्यांचे बोलणे–लिहिणे लफ्फेबाजही नसायचे, अघळपघळही नसायचे अगदी जरूरी पुरते ! असे वाटायचे की ते आपल्या न्यायदानाच्या कामात दयामाया, साहानुभूती, भावना, वगैरे गैरलागू विचार बुद्ध्याच बाजूला सारून काम करीत आहेत. यामुळेच की काय ते पुष्कळवेळी जड, कटुकर्कश आहेत असे वाटून आम्हाला रागही यायचा.

श्री. आत्मचरणजी सत्र (सेशन्स) न्यायालयात विशेष न्यायाधीश म्हणून काम करताना–अभियोग साक्ष ऐकताना सत्र न्यायालयातल्या प्रमाणपुरुषांचे – ज्यूरींचे डोळे, कान क्वचितच वापरीत. लाल-किल्ल्यांतील न्यायालयात त्यांच्यासमक्ष महात्मा गांधी खून खटल्यात 'महात्मा गांधीचा खून करण्याचा सगळ्या अभियुक्तांनी कट' केल्याच्या कथानाटयाचे कतिपय प्रवेश एकामागून एक उलगडले जात होते आणि ते सर्व जज्ज आत्मचरणजी पहिल्या रांगेतल्या सत्र न्यायाधीशाच्या खुर्चीवर बसून पाहत ऐकत होते. पण हा, हन्त ! जज्ज आत्मचरणजी सत्र न्यायाधीश होते, प्रमाण पुरुष – ज्यूरी थोडेच होते ? ज्यूरीचे डोळे, कान त्यांनी कशाला वापरावेत ! जज्ज आत्मचरणजींनी त्यांच्यासमोर उलगडत चाललेल्या अभियोगातले नाट्य, उत्कर्ष, कोर्टाच्या फायलीवर कधीच, कोठेच दिसू दिले नाहीत ! त्यांना लिहवलेला कोर्टातला पुरावा, आदेश सारे काही जरुरी पुरते लिहिण्याच्या कांटेकोर लेखणीने ठिकठिकाणी दुर्बोध वाटायचे, किंवा त्यांच्यासमोर घडलेल्या प्रसंगाचे चित्र रंगरूप हीन वाटायचे ! आणि या दुर्बोधपणा नि रंगरूपहीनता यात लपलेले सत्य कोणाला दाखवणे – सांगणे अति कठीण होऊन जायचे ! सत्य सिद्ध करायला कोर्टामध्ये काहीवेळा कोणकोणत्या गोष्टींची उणीव जाणवते हे विचार करण्यासारखे आहे ! जज्ज आत्मचरणजी हे सारे समजते तर ? अभियोग साक्षी ग्वाल्हेरचे ठाकूर जगन्नाथसिंग यांच्या साक्षीत काय किंवा इतर साक्षीत काय, जज्ज आत्मचरणजींनी कोर्टाच्या फायलीवर लिहिवलेले शब्द ना काही बोलत, ना काही दाखवत, सारे काही रुक्ष, रंगरूपहीन ! आमच्यापैकी एक ज्येष्ठ नि श्रेष्ठ अधिवक्ते जज्ज आत्मचरणजींचे हे वागणे – लिहवणे ऐकून दांत गच्च आवळून तोंडातल्या तोंडात 'डन्स' असा शब्द म्हणत तळमळायचे.

जज्ज आत्मचरणजींच्या या दुर्बोध नि 'जरुरी–पुरते' लिहिण्याने जो काही गोंधळ–कटकटी उभ्या राहत त्यांपैकी एक म्हणजे अभियोगपक्षाला नवा पुरावा, नव्या अर्थाने आणण्याचा अवसर मिळे, ठिकठिकाणी जाणूनबुजून गोंधळ निर्माण करून त्याचा फायदा घेता येई. जज्ज आत्मचरणजींच्या या 'जरुरी–पुरते' लिहिण्याच्या अट्टाहासाचे, व त्यामुळे त्याचा फायदा घेऊन अभियोगपक्षाला साक्षीदार नामसूचीमध्ये लिहिलेलाच पण त्याचा पुरावा सारांशात दाखविलेल्या पुराव्यातून वेगळाच असा देण्याला अवसर मिळविण्याकडे करून घेता येई, याचे एकच उदाहरण येथे सांगतोच. ग्वाल्हेरच्या गरीबा टांगेवाल्याच्या पुराव्यात त्याने त्याची 'सवारी' मुंबईकडून येणाऱ्या गाडीने ग्वाल्हेरला रात्री आली असे स्वच्छ सांगितले होते व हे त्याचे सांगणे अभियोगपक्षाच्या 'नथूराम व आपटे दिल्लीहून ग्वाल्हेरला आले' या कहाणीच्या अगदी विपरीत होते. पण जज्ज आत्मचरणजींचे म्हणणे 'मुंबईकडून येणारी व मुंबईला जाणारी असे लिहिण्याची गरज काय, अप नि डाऊन गाडी लिहिण्याची गरज काय ? माझे अमृतसर–मुंबई नि मुंबई–अमृतसर असे लिहिण्यात सर्व अर्थ स्पष्ट होतोच ! असे म्हणून त्यांनी माझे काही ऐकले नाही नि त्यांच्या म्हणण्याप्रमाणे 'जरुरी–पुरते' लिहिले. पण झालेला पुरावा काय किमतीचा उतरला हे लक्षात येऊन अभियोगपक्षाने त्या पुराव्याची चुकीची सारवासारव अशी केली की, अभियोग साक्षीदार मधुकर गोळवलकर बुकिंग क्लार्क रेल्वे स्टेशन ग्वाल्हेर याच्या साक्षीमध्ये त्याने केलेल्या तिकिटविक्रीची व ती तिकीटे कोणी घेतली याची साक्ष द्यायचे सूचित केले असताना त्याच्या तोंडून स्टेशनमास्तरच्या गाड्या येण्याजाण्याच्या वेळाची नोंद जी वही आणून त्यावरून रात्रीच्यावेळी मुंबई–अमृतसर एक्स्प्रेस व दिल्ली–मद्रास एक्स्प्रेस या दोन्ही गाड्या त्या दिवशी उशीराने धावत असल्याने एकाचवेळी आल्या हे साक्षीस आणले. असे करण्यात अभियोगपक्षाचा हेतु केवळ गरीबाच्या तथाकथित चुकीची सारवासारव करण्याचा स्पष्ट होता व ते कायद्याविरुद्धही होते. पण जज्ज आत्मचरणजींनी ते सगळे पचवले नि लिहवलेही ! साक्षीदार जे काही सांगतात ते त्यांच्याच शब्दांत लिहावे याबद्दल माझा आग्रह, माझी धडपड जज्ज आत्मचरणजींपुढे पालथ्या घागरीवर पाणी ओतल्यासारखी, फुकाची, व्हायची ! या अभियोगपक्षाच्या सारवासारवीवरही मी माझ्या उपयोगाची वाट काढली होती ही गोष्ट निराळी पण ती तितकीच महत्त्वाची नि मनोरंजक ठरली.

मी पूर्वी लिहिल्याप्रमाणे जज्ज आत्मचरणजींचे ध्वनिग्राहक यंत्रामध्ये न बोलणे आम्हांला त्रासदायक होण्याबद्दल उल्लेख केला आहे. जज्ज आत्मचरणजी टंकलेखकाला काय सांगत आहेत हे आम्हांला ऐकू यायचे नाही व टंकलेखक काय टकटकतो आहे हे न कळून कटकटी व्हायच्या यातूनही मार्ग म्हणून मी शेवटी मनाचा हिय्या करून टंकलेखकाने यंत्रावर काय लिहिले आहे त्याला वाचून दाखविण्यास सांगावे अशी जज्जमहोदयांना विनंती करायला सुरुवात केली. माझा उद्देश स्पष्ट पण जज्जमहोदयांनाच 'तुम्हीच ध्वनिग्राहक यंत्रामध्ये शुद्धलेखन सांगावे असे सुचविण्याचा होता. पण जज्ज आत्मचरणजी मला – एका कनिष्ठतम वकिलाला कसे बधणार ! मी विनंती केली की, त्यांनी तो स्वीकारून, टंकलेखकाला सर्व वाचायला सांगावे !

**त्यांचे वागणे काटेकोर, शिस्तीचे, अगदी हाडाने गणिती असलेल्या विद्वानासारखे !**

पण अशाने माझाच – आमचा सर्वांचाच – वेळ विनाकारण जायला लागला. त्याशिवाय कूटपरीक्षकाचे मनोगत सूत्र तुटून आमचीच गैरसोय व्हायला लागली. म्हणून शेवटी मी ते विनंती करणेही सोडून दिले. जज्ज आत्मचरणजींच्या तेही लक्षात येऊन काटेकोरपणे काम करण्याच्या खाक्यात पण माझी थट्टा करण्याच्याच हेतूने बहुतेक त्यांनी मला एके दिवशी कोर्टात म्हटले, 'काय इनामदार! टंकलेखकाला मी काय सांगितले ते वाचून दाखवायला त्याला सांगू का?' नुसते 'नको' म्हणण्याऐवजी मला ही थट्टा करण्याची उबळ आली व मी म्हटले, 'नको श्रीमानजी? माझ्या भाग्याने आपला टंकलेखक इतके सुंदर टंकलेखन करतो, अगदी शब्दाच्या उच्चाराप्रमाणे बरोबर ध्वनी काढत, विरामचिन्हांच्या आणि आवाजाच्या चढउतारांच्या तालसुरावर आपले टंकलेखन वाजवतो. त्याच्या टकटकीवरूनच आता सवयीने मला त्याचा रियाझ झाला आहे व मला तो काय टंकलेखन करीत आहे हे कळायला लागले आहे! आपल्या टंकलेखकाच्या कलापूर्ण मदतीबद्दल माझे कृतज्ञ आभार! माझ्या बोलण्यावर आमच्या वकीलबंधूंनी हात लांब करून मला 'टोकायची' दाद दिली. जज्ज आत्मचरणजी मात्र नुसते स्मित करीत गप्प बसले, पण त्यानंतरही त्यांचे डाव्या हाताने यंत्र बाजूला सारणे चालूच राहिले!

जसजसे दिवस जायला लागले तसतसे मला उमजायला लागले होते की, जज्ज आत्मचरणजी जरी तीव्र बुद्धी असलेले नि न्यायदानातल्या निष्पक्षतेबद्दल गाढ आस्था असलेले न्यायाधीश होते, तरी हाडाने ते ब्रिटिश शासनयंत्रणेतल्या आय. सी. एस. श्रेणीची मनोवृत्ती असलेले राजसेवकच होते. त्यामुळे त्यांचा स्वाभाविक कल आपले न्यायनिवाडे शासकांच्या बाजूला झुकू देण्याकडे असे. शासकीय अधिकाऱ्यांना सांभाळून घेण्याची त्यांची वृत्ती असे. आम्हाला बोचणारी त्यांची ही वृत्ती विशेषेकरून एकाबाबतीत फारच जाणवे. आम्ही तावातावाने चौकशी अधिकाऱ्यांनी किंवा अभियोगपक्षाने व्यवहारविधी संग्रहाच्या नियमाचे पालन कसे केले नाही, व्यक्तिगत स्वातंत्र्याचे सिद्धान्त कसे बुद्ध्याच डावलले व विशेषाज्ञांचा कसा गैरवापर केला याबद्दल बोलावे पण त्यावर जज्ज आत्मचरणजींनी सुशांत चेहऱ्याने व समजावणीच्या स्वराने, एखाद्या कुशल नि अनुभवी सचिवासारखे एवढेच म्हणावे की, 'अहो, त्या अधिकाऱ्याची ही भूल आहे – अधिकारीव्यक्तींची ही त्रुटी आहे हो!' तुम्ही मला सांगा, मी काय करू तुमच्यासाठी? आमचे सगळे तावणे–तापणे हिमवर्षावात सापडल्यासारखे थंडगार पडायचे!

मी नेहमी अनुसंधेय अपराधांच्या चौकशीतही अपराधांची सूचना मिळताच ती पोलिसांच्या रोजनिशीमध्ये न लिहिली गेल्याबद्दल पोलीस अधिकाऱ्यांना विचारायचा. माझ्या ग्वाल्हेरच्या उर्दू हिंदी सरावामुळे पोलीस रोजनिशीचा उल्लेख मी 'रोज़नामचा' या नावाने करी. इतक्यांदा हा शब्द माझ्याकडून म्हणला जाई की माझे त्या लालकिल्ल्यातील न्यायालयांतील उपनाम 'रोज़नामचा' म्हणून एका माझ्या व्यंगचित्रावर लिहिले गेले! मला सांगायचे ते असे की, शासकीय अधिकाऱ्यांच्या अशा चुकी–त्रुटीबद्दलच्या संतत धार आक्षेपांनीही शासनयंत्रणेच्या तालमीमध्ये आकारलेले आत्मचरणजींचे मन न्यायाधीशाच्या आसनावर बसूनही तसेच शासकाचे राहिले! बदलले नाही.

लालकिल्ल्यातील अभियोगपर्वाच्या शेवटच्या दिवसात आम्हाला कुणकुण लागली की, भारतीय गृहखाते जज्ज आत्मचरणजींना बढतीची जागा लवकरच देणार आहे. या कुणकुणीच्या पाठोपाठ शासकीय गॅझेटमध्ये आज्ञापत्रकही छापून आले की, ह्या अभियोगाचे काम संपल्यावर जज्ज आत्मचरणजींची नियुक्ती अजमेरमेरवाडा प्रांताच्या ज्युडिशिअल कमिशनरपदी केली आहे. अभियोगपर्व चालू असल्याच्या काळातच असे आज्ञापत्रक काढण्याची भारतीय गृहखात्याची ही अशोभनीय तत्परता मला तरी आवडली नाही. माझ्या मनातले सलणारे साचलेले सारे वेदनासंचित शेवटी माझ्या तोंडून बाहेर पडलेच. गृहखात्याच्या अश्लाघ्य तत्परतेचे निमित्त घेऊन माझ्या दिनांक ३० डिसेंबर १९४८ च्या समारोपाच्या भाषणाच्या शेवटी जज्ज आत्मचरणजींनाच संबोधून मी म्हटले होते की,

'मी आणि माझे नामवंत सहयोगीच काय, परंतु न्यायदानाची आस असणाऱ्या जगाच्या पिढ्यानपिढ्या, मान्यवरमहोदय, आपल्याकडून हीच अपेक्षा करतील की, निर्भीक मनाचे व देऊ केलेले कृपावंत आमिष विसरणारे व अभियुक्तांच्या पिंजऱ्यात बसलेल्या व्यक्तीचे पोलिसांच्या निरंकुश शासनापासून रक्षण करणारे आपण न्यायधीश आहांत.

परमपिता परमेश्वर या अभियुक्तांना न्यायदान करण्याचे काम आपल्या निष्पक्ष करकमलाद्वारे संपन्न करो!

दिनांक १० फेब्रुवारी १९४९ रोजी जज्ज आत्मचरणजींनी अभियोगाचा निर्णय वाचून दाखविला तेव्हा मला अति वाईट वाटले, ते माझ्या अभागी पक्षकारांबद्दल तितके नव्हते जितके जज्ज आत्मचरणजींबद्दल होते, जज्ज आत्मचरणजींची ती अभियोगपक्षाच्या साक्षीदारांवर निस्संदेह विश्वास दाखविण्याची तर्कमीमांसा वाचून मला गारठल्यासारखेच झाले होते. पुढे अपिलांचा विचार करायला लागल्यावर मला वाटायचे की, अपील न्यायालयाच्या पीठावर जर असेच आय. सी. एस. मनोवृत्तीचे न्यायाधीश बसले तर, आमचे कसे होईल? वयाची सत्तेचाळीस वर्षे उलटून गेलेले, दंडाबेडी पायांवर ठोकलेली व कंबरेला बांधलेली असे पाहिलेले डॉक्टर परचुरे मला आठवत. डॉ. परचुऱ्यांच्या नीलकंठचे अजून शिक्षण पूर्ण व्हायचे आहे हे आठवे नि मग जज्ज आत्मचरणजींनी मलाच कड्यावरून खाली लोटून दिल्यासारखे वाटे व हेच का ते जज्ज आत्मचरण? त्यांनीचना मला लालकिल्ल्यातील अभियोगपर्वात किती समजूतदारपणे व साहानुभूतीने वागवले होते असे वाटायचे. आणि मग, 'तूच ना शेवटच्या दिवशी आपल्या समारोपाच्या भाषणाने जज्ज आत्मचरणजींना दुखविलेस?' असे वाटून मला काही सुचेनासे होई.

पण मला येथे हेही सांगितले पाहिजे की माझे हे जज्ज आत्मचरणजीविषयीचे शंकेखोर मन उगोचच विवळत होते. पुढे काही दिवसांनंतर अजमेरहून मला मिळालेल्या वृत्तान्तावरून हेही कळले की, जज्ज आत्मचरणजींनी तेथे गेल्यावर कित्येकांना माझ्याबद्दल सांगितले नि माझी मुक्तकंठाने प्रसंशा केली होती.

जज्ज आत्मचरणजी नंतर लवकरच अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या न्यायपीठावरही पदोन्नत झाले. पण अकाली मृत्यूने त्यांच्या गाढ सहृदयता नि स्वच्छ निष्पक्षता यांच्या चाकांवर धावणाऱ्या यशोरथाला मध्येच खीळ घातली! [क्रमशः]

# परंतू दादा कोंडके सोंगाड्ये इतुके झाले!



नंदू राजे

## लेखांक अकरा

'अशा रीतीनं जग तरुण बनत जातं, वाढतच राहतं आणि वाजवीपेक्षा किंचीत जादा जगलेले आम्ही जगाला किंचितसे परके होत जातोय...'

तेव्हा ही माझी गाथा आता संपवायला हवी. मला ठाऊकाय काळ व घटनांच्या आलेखात मी फारच सुदैवी ठरलोय्...जगभरल्या कौतुकानं, प्रेमानं व क्वचितच्या हेव्या दुष्टाव्यानं मी अखंड भरून गेलोय. खरंच, जगानं मला त्यातलं सर्वोत्तम भरभरून दिलंय् न किंचितसा त्यांतला वाईट विखार...माझे दुर्दैवी क्षण काही असोत; पण मला वाटतं भल्याबुऱ्या घटना या आभाळात तरंगणाऱ्या ढगासारख्या बेहिशेबी असतात, म्हणूनच दुर्दैवी आघातांचं आश्चर्य नाही वाटत मला. वाटतं ते फक्त नशीब फळफळल्यावर सुखद आश्चर्य. जगण्यासाठी माझ्याजवळ कुठलंही तत्त्वज्ञान नाही—विद्वान असो वा मूर्ख—प्रत्येकाला आयुष्याबरोबर झगडावंच लागतंय...मी चंचल मनुष्य आहेय...क्वचित बारीकसारीक घटना मला हलवतात आणि परमदुःख मी कोरड्या नजरेनं पाहतो...माझी महत्त्वाकांक्षा अजून शाबूत आहेय्...अजून निवृत्त नाही झालोय् मी...मला अजून खूप काही करायचं आहे...शोपेन हॉवर म्हणतो की, तृप्ती, सुख ही उणी गोष्ट—मला नाही ते पटत. गेली वीस वर्षं मी अति तृप्त आहे... त्याबद्दल अधिक लिहायला मला आवडलं असतं पण सर्वांगीण प्रेम ही जगातली सर्व सुंदर वेदना शब्दातीत असायला हवी...

'उनाबरोबरील या राहाण्यातलं सुख, तिच्या स्वभावातलं सौंदर्य मला नेहमीच स्तिमित करत राहीलंय....तिच्या मागून चालताना...तिचं लयबद्ध साधं चालणं माझ्या डोळ्यांत मावत नाही...तिच्या घनदाट काळ्याभोर केसांवरली सूर्यझळाळी माझ्या नजरेत तरंगत राहते... आणि त्यातला क्वचित कुठला एखादा रुपेरी केस... आणि तिच्याबद्दलची सारी उत्कट प्रीती लाटांसारखी ओसंडून माझ्या काळजात भरून जाते...आणि माझ्या गळ्यात आवंढा उभा राहतो...दाटून येतं मला'

चार्ली चॅप्लीनच्या आत्मचरित्रातला हा शेवटला हृद्य भाग !

एकावन्नाव्या वर्षी चार्लस् चॅपलिननं, युजीन ओनिल या विख्यात नाटककाराच्या सतरा वर्षांच्या उना ओनिलशी विवाह केला न त्याला हवी ती मुक्ती मिळाली. अमेरिकेविषयी वाटणाऱ्या सर्व जळजळीचा 'किंग इन न्यूयॉर्क' सारख्या किंचितशा विकृत बोलपटात संपूर्ण निचरा झाला आणि 'कॉऊंटेस फ्रॉम हाँगकाँग' या बोलपटात सोंगाड्याशिवाय का होईना पण चित्रपट काढण्याची त्याची महत्त्वा-

कांक्षा लोप पावली. अखंड तृप्तीच्या शांततेत क्रिएटिव्हीटी अटळपणे दुय्यम ठरली.

पण शरीरमनाला पुरी शांती देणारा सहकारी मिळणं ही दुर्लभ गोष्ट आहे...त्याला जरूरी असते बेहिशेबी घटनांचं अनाकलनीय संगनमत...केवळ अपवादापुरतं खरं होणारं !

निष्ठा, जवळिक, दोस्ती, कौतुकादर, स्नेहाळ प्रेम देणारा सहकारी सवंगडी मिळणं हा चॅप्लिनला गवसलेला निखळ, निरभ्र मोक्ष !

ही असंभव मुक्ती मिळेपर्यंत दादाला सतत बरेवाईट चित्रपट काढत राहणं भाग आहे ! व्यावसायिक सिनेमात सोंगाड्याची गळचेपीच होत राहणार आहे आणि त्याचा सोंगाड्याचा बेभान आविष्कार कधी झालाच तर, दादाबरोबरील खाजगी बैठकीतच होऊ शकणार आहे. हीच दादाची, किंवा खरंतर दादाच्या सोंगाड्याची ट्रॅजेडी आहे. फक्त त्याचं ओझं दादाला वाटत नाही. ते त्याला अंतर्मुख-विव्हळ करत नाही. आणि ही पण दादाची ट्रॅजेडीच आहेय्...

'दादा, तुझ्या आयुष्यातली सर्वांत मोठ्ठी ट्रॅजिक घटना मला ठाऊक आहेय्. त्याबद्दल मी तुला काही विचारणारही नाही. पण ती का व कशी घडली याचा अंदाज मला आहे.'

दादा नुस्तच किंचित मान हलवून हसला. असं हसलेलं मी दादाला कधीच पाहिलेलं नाही. आयुष्य भोगलेल्या म्हाताऱ्याचा असणारा टॉलरंट उदासपणा त्या हसण्यात मला उगाउगा जाणवून गेला.

बाहेर धुवाधार वादळी पाऊस कोसळत होता. अंधार गच्च मिटून येत होता. मी उगाचच दादाच्या ऑफिसवर गेलो होतो. खरंतर दादाला काही विचारण्यासारखं उरलंही नव्हतं. होते फक्त माझ्याजवळच्या उत्तरांना शिल्लक नसलेले प्रश्न...

'तुझा सर्वांत जवळचा मनुष्य कोण रे ?' मी केवळ जुजबी विचारलं. उत्तर ठाऊकच होतं. हजरजबाबी दादा क्षणभर थांबला...

'तसं एकदम जवळचंफिवळचं कुणीच नाही बघ. हां ओळखी मातर मोप आहेत.' फक्त हे उत्तर लिहिलेलं वाचताना वाटतो तितका सिनिकल सूर दादाच्या बोलण्याला नव्हता. एक मॅटर ऑफ फॅक्ट. स्टेटमेंट फक्त.

'तशी दोस्तीबिस्ती होईल असं वाटायचं बघ कधी कधी. लय भेटले तशे. पण पण आपलं सगळं दुसऱ्याला ठाऊक आणि तो मात्र हात राखून वागणार, केवळ व्यवहारानं जवळ राहणार किंवा आपल्यावरच कुरघोडी करू पाहणार याला काय अर्थ नाय बघ.'

कुणीतरी दादाच्या चित्रपटाच्या वितरणासंबंधी दादाला भेटायला आलेलं असतं, दादा त्याच्याकडे वळून पाहताना म्हणतो, 'बघितलंस, दोस्ती करायला बि लय टाईमबिईम असायला लागतोय.'

मागं एकदा दादाकडल्या सहाव्या किंवा सातव्या फेरीत मी दार उघडून दादाच्या ऑफिसात शिरलो...'तर साल्या तू अजून आहेसच का जिवंत ?' अशी दादानं टेर काढली होती. 'दादा तुझ्यासारखी पाचपंचवीस गुणी माणसं मला ठाऊक आहेत आणि माझ्यावाईज् त्यांना गाडल्याशिवाय माझ्या पिंडाला कावळा शिवणार नाय' असा लंबा डायलॉग मी फेकला तेव्हा दादा मनमोकळा हसला होता. तर या शेवटच्या भेटीत 'आयला दादा तीन तास बसलोय तुझ्या ऑफिसात' असं म्हटल्यावर 'खरंच की काय ?' असं किंचीत अपराधी सुरात दादानं विचारलं होतं. तरीही दोस्तीसाठी दादाला आता टाईम् नाही–हे पण खरं.'

आलेल्यांना फुटवून दादा पुन्हा माझ्याकडे वळतोय्–'साला नंद्या हे लिहल्यामुळं माझ्यापेक्षा तुझंच कौतुक जास्त होणाराय्' दादा मला टोचतो.

'तर काय दादा, साला आयुष्यभर तू माणसांना वापरलंस. तुला कुणीतरी वापरायला हवं होतंच की नाही !'

दादा कौतुकमाखला हसतोय. तसा बोलायला विषयही नाही. बाहेर पाऊस धुवाधार कोसळून आहेय्.

पण मी दादाला थोडफार का होईना पण निश्चितपणे वापरलं हे किंचित सत्यच. अमाप टॅलण्ट असताना दादा सोंगाड्याचं देणं देऊ शकला नाही. किंवा व्यवहारी चौकटीत देऊ शकत नाही. फक्त मी; दादाचं त्याच्यातल्या सोंगाड्याचं देणं लागतोय. ते बरीक मला देऊन टाकायचं आहे ते माझ्यापरीनं मी दिलं असा मला अहंकार आहे.

दादाकडे आणिक कुणी टपकलंय्. बाहेर पाऊस कोसळतोच आहे. अंधार गच्च होतोय्. दादा म्युझिक रूममध्ये गेल्यानंतर बाहेरलं ऑफिस भलतंच पोकळ, निर्जीव वाटतंय, आणि आजूबाजूस बसलेली माणसं–सामान्य. या सामान्यांबद्दल, सुपरस्टार्सना असणारी अगतिक तुच्छता दादाकडे नाही किंवा व्यवहारापायी जमलेल्या यांच्याबद्दल भाबडी आपुलकी. आपुलकी, तुच्छता जवळच्या माणसांबद्दल वाटायची असते. दादाला तर माणसांपेक्षा मेंढरंच बरी वाटतात. हे त्याला वाटण्याचं, माझ्या अंदाजानं सर्वांत मोठं कारण–त्यानं बायको व पोरीपासून घेतलेली फारकत–आणि त्याचा आत्ताच्या दादावर झालेला आत्यंतिक प्रभाव, याची मला असलेली जाणीव ही या लिहीण्याबाहेर नसती तर, त्याचा उल्लेखही मी टाळला असता. नवरा–बायको हे एक अत्यंत खाजगी नातं आहेय्. खरंतर त्यांच्यातलं सत्य हे तिसऱ्याला सर्वस्वी कळणं जवळपास शक्यच नाहीय्. कुठल्याही दोन माणसांमधल्या युनिक नात्याबद्दल बोलायचा तिसऱ्याला हक्कही नाही जरूरीही नसावी. पण...

विच्छाचे हजारभर प्रयोग व सोंगाड्याची पूर्वतयारी यांच्या दरम्यानची ही फारकत-ट्रॅजेडीनं दादाला संपूर्ण बदललं–किंवा आडव्या वगबोर्डावरून उभ्या पडद्यावर सोंगाड्याला न्यायला परावृत्त केलं असं मला ठामपणे वाटतं. सोंगाड्या चित्रपटाची निर्मिती ही स्वतःला कशात तरी संपूर्णपणे झोकून, गुंतवून टाकण्याची वैयक्तिक जबाबदारी दादाला वाटली असावी असं मला वाटतं. ती जरूरी सोंगाड्याची नव्हती तर दादाची

खाजगी निकड होती.

'चलरे नंद्या, तू घरीच जाणार न ? शिवाजीपार्कपर्यंत सोडतो चल'

धुवाधार पाऊस बरसतोच आहे. मोटरच्या काचा वर करायला हव्यातच. दादाचं त्याच्या पुढल्या वीसकलमीबद्दल बोलणं चालू आहे. त्यातले पंचेस, घटना, खास करून त्यातली गाणी म्हणून दाखवणं. चाली तर दादाच्या डोक्यात फिट्ट आहेतच. त्या आता तो म्युझिक डायरेक्टराच्या डोक्यात उतरवणार आहे. शब्दही मौजूद आहेत. खरं तर दादानं कथा, पटकथा, संवाद, गाणी, संगीत दादा कोंडके असंच पडद्यावर लिहायला हवं. इतरांना क्रेडिट देण्याऐवजी. पण या इतरांच्या क्रेडिटवरच सोंगाड्या कदाचित तरत राहणार आहे. माझं लक्ष आहेही आणि नाहीही. जास्त करून बाहेरील पावसावरच नजर खिळून राहिलीय माझी. दादाकडे अर्धवट जुजबीच कान आहेत. शिवाजीपार्क आलंय. माझी बस समोर दिसते.

मी अकारण उदास आहेय्.

'अच्छा रे, पुन्हा केव्हा भेटतोस ?' दादाच्या गाडीचं दार बंद होतंय. गाडीत कुणी दोन किलबिल पोरंही आहेत. 'माझी अनौरस संतती' दादा म्हणाला होता.

बस पकडण्याच्या धावाधावीत, तिकीट काढण्याच्या व्यवहारी जरुरीत दादाची पहिलीवहिली भली थोरली फोर्ड गाडी कधी पुढं सरकतेय हे लक्षातच येत नाही. त्यानंतर दादा कुणा आशाला पिक-अप करणार होता, सोडणार होता; मागाहून कुठल्याशा सहकारी भांडाराच्या उद्घाटनाला जाणार होता.

सोंगाड्या इतर गोष्टी करत होता. फक्त पाऊस स्वतःसारखा धुवाधार कोसळत होता.

हे लिहिताना दादाला, सोंगाड्याला पुढल्या लेखांकात संपवू, दोन लेखांत संपवू असं सारखं वाटायचं. दादा संपला नाही. वाढतंच राहिला. 'बाबारे काळाबरोबर वाढणं हा माणसाचा खरा धर्म असायला हवा' बाबांनी, भालजी पेंढारकरांनी, दादाला सांगितलं होतं. उद्या सोंगाड्याला चंद्रावरही जायला लागेल मग आणखीन पुढं...वाढायला लागेल. लिहिणं संपत आलं तरी दादा संपत नाही... सदर त्यांच्यातला सोंगाड्या संपत नाहीय्.

संपणारी गोष्ट खरी कशाला असेल ?

असंच धुवाधार आभाळ बरसत असतंय्. विलायतखाँ मियाँ मल्हारमध्ये घुसलेला असतोय. डोक्यात शराब गेलेली असतेय... नवीन भाषा बोलत असते. त्याची स्वतःची हवाँभी कुछ गवाँर है... गालीब म्हणाला होता. माझ्या व्हरांड्यात तुरुंगी ग्रीलगजापलीकडे पाऊस कोसळत असतोय्...झाडं न्हाऊनमाखून डुलत असताहेत...

काळोख गच्च दाटून मनात मावतो आहे.

माणसापेक्षा मेंढरं बरी. त्या मेंढरापेक्षा ही पावसात डुलणारी झाडं जास्त बरी असतील. त्यापेक्षा त्यापलीकडले न दिसणारे तारे बारे...कशापेक्षा काय बरं हे कुणीही सांगू नये. ज्याचं त्याचं त्यानंच ठरवावं.

अशा वेळी तुरुंगी ग्रिलगजावर हात ठेवून मी हरवून जातो. मला नको नको त्या गोष्टी आठवतात... व्हिलखुर्चीत बसलेला म्हातारा चॅर्ली चॅपलिन. बर्फदुधाळ केसांचा... स्पेशल ऑस्कर घेऊन अमेरिकन मंडळींना थँक्यू म्हणणारा... रक्तदाबानं मेलेला ऑलिव्हर हार्डी – ऑली... कॅन्सरनं पछाडलेला, भुवया उडवणारा स्टॅन लॉरेल... पोकर फेसड्, अगतिक,... अशा वेळी मला फारफार... फारच आठवतं... सूर न सापडलेला बस्टर किटन... किंवा माझ्या जवळचं त्याचं शेवटलं चित्र... उदासपणे बघणारं... हा दुसऱ्या दिवशी मेला म्हणतात. हा फोटो काढल्यानंतर... मला आठवतं लखनौच्या टॅक्सीच्या टपावर चढवलेलं बेगम अख्तरचं प्रेत... अख्तर लखनौवाली !

अशा वेळी मला आठवतं... आठवतं !

विच्छातल्या लगबग लग्नाची तयारी करणारा सोंगाड्या... चार्लीचा गोल्डरशमधला बुटाची नाडी काट्या चमच्यांनी खाणारा सोंगाड्या... किटनचा हार्डीचा, लँग्डनचा, हॅरॉल्ड लॉईडचा...

आणि दादा कोंडकेचादेखील.

पाऊस कोसळत असतोय. झाडं डुलत असतात.

'तर काय होतं नंद्या... सदाशिव गावाला परततो. आयला शहरातली खरी आई, काय मुलाबाळांना संभाळू शकत नाहीच. तो गावाला परततो... म्हणतो... माझी आय् कुठं गेली... तर मेली... बाप पण मेला... उलथला... आणि आपली ती पोरगी ती – उषा चव्हाण – तिचं काय झालं. ती हूभी. वळते तर गळ्यात मंगळसूत्र· तिच्या आयला. आपलं कुणीच नाय. तर सदाशिव मेंढरांच्या कळपाकडे जातो. त्यांच्याबरोबर राहातो. 'सदाशिवचा' दादाला हवा होता तो भन्नाट शेवट.

'ते कोंबड्या उबवतात त्याला काय म्हणतात ?'

'इनक्यूबेटर.'

'हां. तेच सालं. आपलं इंग्लीश लई कच्च हाय्.'

अशा धुवाधार पावसाच्यावेळी, शराबी क्षणाला स्वतःच्या एकलेपणाची बोज न करणाऱ्या सदाशिवचं; खरंतर दादा कोंडकेचं ओझं, अल्लद माझ्या खांद्यावर थोडंसं विसावतं...

दादा कोंडके संपला नाही. आय् होप. सोंगाड्या संपायला नको. अगेन आय होप !

मग मला इतर गोष्टी आठवतात... आणि मी पावसात... न्हाऊन माखून डुलणाऱ्या झाडांकडे मनःपूर्वक पाठ फिरवतो.

**स मा प्त**

मराठी चित्रपट

## अखंड गरिबीचा संदेश :

# चोरीचा मामला

शिरीष सहस्रबुद्धे

निर्माते यासीन एस्. फत्तेलाल आणि निर्माते –संगीतकार राम कदम यांनी 'सुगंधी कट्टा' या चित्रपटानंतर सादर केलेला हा दुसरा चित्रपट. 'चोरीचा मामला'चे दिग्दर्शक आहेत बाबासाहेब एस्. फत्तेलाल. त्यांचं हे पहिलच चित्र. यासीन आणि बाबासाहेब एस्. फत्तेलाल हे दोघेही 'प्रभात'च्या पांडवांपैकी एक कै. एस्. फत्तेलाल यांचे पुत्र. हे सांगायचं कारण एवढंच की, चित्रपटाच्या जाहिराती किंवा Previews मध्ये प्रभातच्या परंपरेचं पुनरुज्जीवन करण्याच्या घोषणा बऱ्याच झाल्या होत्या त्या त्यामुळेच. मुळात आपल्या लोकांना जुन्या परंपराच पुन्हा उकरून काढायचा छंद का असावा हे कळायला मार्ग नाही. काही नवं करायची एवढी धास्ती का ?

'चोरीचा मामला' हे चित्र एरवी कथाचित्र, प्रचारचित्र वगैरे अनेक चित्रपटसाच्यात मोडण्यालायक असलं तरी, प्रामुख्यानं ते कलाकारांचं चित्र आहे. त्याचं यश शंकर पाटलांच्या कथा – पटकथा – संवादापेक्षा 'निळू फुले आणि कं.'च्या खाती जास्त जमा आहे. हातगाडीवाल्या चंदर ढमालेची मध्यवर्ती भूमिका करणारा निळू फुले आणि त्याला साथ देणारी यशवंत दत्त (गुरखा), ललिता पवार (चंदरची आई) आणि रत्ना (उषा चव्हाण) ही मंडळी यांच्या कसदार अभिनयाची पावती रसिक प्रेक्षकांनी वारंवार द्यावी, इतका त्यांचा प्रभाव चित्राच्या शेवटी राहतो.

निळू फुले ही तर मराठी रंगभूमीवरची आणि आता चित्रपटातलीही एक विलक्षण 'घटना'च आहे. 'सखाराम' असो वा हिंदुराव धोंडे पाटील. हा अभिनेता आपली प्रत्येक भूमिका सर्वस्वी आपली स्वतःची बनवतो. त्याला मग पर्याय राहत नाही. तशी कल्पनासुद्धा त्याचे चाहते करू शकत नाहीत. त्याच्या भूमिकांवर खास त्याचाच असा एक शिक्का, एक ठसा, हमखास उमटलेला असतो.

निळूभाऊमध्ये असं काय आहे की ज्यामुळे हे घडावं ?

म्हटलं तर खूप काही आहे आणि नाहीही. निळूभाऊ दिसतो कसा हे बारीक नजरेनं पाहिलं तर मी काय म्हणतो ते लक्षात येईल. कपाळावर सत्रा आठ्या, वाळलेल्या गोवरीगत खप्पड खरबरीत चेहरा, जाड पापण्या आणि खोबणीतून किंचित सुजून आल्यासारखे डोळे, क्लोजअपमध्ये न पाहवणारे जाड ओठ आणि चेहऱ्यावरच्या गाल–मान–गळ्यापर्यंतच्या सुरकुत्या; आणि मुख्य म्हणजे चांगल्या कपड्यातनंही न लपणारा हाडांच्या सापळ्यासारखा वाळकुडा देह, या सगळ्या वर्णनाचा मालक नाट्य–चित्रपटसृष्टीत मध्यवर्ती भूमिकांतून मानाचं पान पटकावील ही गोष्ट स्वप्नातसुद्धा अशक्य वाटेल अशी. पण नेमक्या त्याच कारणासाठी त्याला प्रेक्षकांनी डोक्यावर घेतला आहे. एखादा 'चॉकलेट हीरो' थोड्या प्रेक्षकांना काही काळ भुरळ घालीलही, पण सर्वच प्रेक्षकांना तो सदासर्वकाळ गुंगवू शकत नाही. 'अँटिहिरॉईक किंवा अँटिरोमँटिक स्पिरिट'ची ओढही किती म्हटलं तरी प्रेक्षकाला असतेच. दादा कोंडकेचा सोंगाड्या क्लिक झाला तो या anti–heroism मुळेच आणि निळूच्या हिट भूमिकांचं काही श्रेयसुद्धा त्यालाच आहे. जी फीचर्स एरवी एखाद्याला नायकाच्या भूमिकेसाठी disqualify करतील ती निळूभाऊंच्या बाबतीत क्वालिफिकेशन्ससारखी शोभतात. दादा काय किंवा निळू फुले काय, दोघांच्याही सर्वसामान्य दिसण्याचा आणखी एक फायदा आहे. आपल्या ओबडधोबड मराठी रसिकाला ते एकदम आपले – आपल्यातलेच वाटतात. देव आनंद झोपडपट्टीत रहायला येणं हा एक विनोदमिश्रित कौतुकाचा विषय ठरतो. (पहा : अमली नकली), पण चोरीचा मामला मधला चंदर ढमाले झालेला निळू झोपडपट्टीतलं आयुष्य जगतो, तेव्हा तो खऱ्या झोपडवासियांपेक्षासुद्धा असली वाटतो आणि वागतोही.

निळूभाऊचा मुद्राभिनय आणि त्याचं स्वतःला भूमिकेत झोकून देणं ही मला जाणवलेली त्याची दोन अविभाज्य वैशिष्ट्यं. चेहऱ्याच्या स्नायू–नसानसांवर असणारी त्यांची विलक्षण हुकुमत, विशेषतः नजर आणि ओठांच्या हालचालींवर असणारा त्याचा ताबा यांची दाद न देणं कठीण होतं. त्यातला तोचतोचपणा त्याला टाळता येत नाही असा त्याचे टीकाकार दावा करतात, ते वरवर पाहता खरं वाटतंही. पण एक तर त्याच्या अभिनयाच्या ताजे-शिळेपणाचा निकाल काळच करू शकेल, आणि दुसरं असं की, निळूभाऊ किती प्रकारे हलवू शकतो यापेक्षा तो भूमिकेशी किती इमान राखतो आणि सखाराम किंवा हिंदुरावासारख्या खास भूमिकांत स्वतःला किती आवेगानं झोकून देतो ही गोष्ट अधिक महत्त्वाची आहे, असं मला वाटतं. 'चोरीचा मामला'मध्ये या आवेगाला फारसं स्थान नाही, तर एका हातगाडीवाल्याचं आयुष्य मनापासनं जगण्याची गरज आहे आणि निळूभाऊ या गरजेला पुरे पडले आहेत. चित्राच्या सुरुवातीलाच 'कोल्हापूरची लवंगी मिरची न्हवं मी' अशा कितीतरी शब्दांतलं एक लावणीनृत्य आहे. त्यावेळी बारीच्या कनातीत शंभरजणांमध्ये बसून त्यांच्यासारखी दाद देणारा चंदर आणि पैसाच पैसा मिळाल्यावर नायकिणींच्या कोठ्यांवर रुबाब (आणि नोटा; त्याही शंभराच्याच; शिवाय सोन्याच्या चिपा !) फेकणारा चंदर हे दोघेही एकाच निळूनं रंगवले आहेत, ही गोष्ट त्याच्या अभिनयातल्या विविधतेसंबंधी पुष्कळ काही सांगून जाणारी आहे. विशेषतः सकाळी हातगाडीवाला आणि रात्री ऐयाश दौलतवाला अशा दुहेरी जीवनाच्या कात्रीत सापडलेला चंदर उभा करताना त्याच्या मूळ प्रकृतीचं जे एक बेअरिंग निळूनं कायम राखलं आहे, ते त्याच्यातल्या खऱ्या टॅलेंटेड ॲक्टरचंच कर्तृत्व आहे.

'चोरीचा मामला'ची कथाकल्पना एखाददुसऱ्या वाक्यात संपेल एवढीच आहे. चंदर ढमाले, हा हातगाडी ओढून आपल्या आणि आईच्या पोटात कष्टाची मीठभाकरी घालणारा एक सामान्य झोपडीवासी. एका स्मगलरच्या बंगल्यावरच्या राखणदार गुरख्याशी संधान बांधून तो लाखो रुपयांचा

ऐवज पळवतो. पण ही चोरीची श्रीमंती त्याला पचत नाही. गरिबीचं नाटक चालूच ठेवावं लागतं–संशय येऊ नये म्हणून. आई आनंदातिशयानं झटका येऊन जीव सोडते. रत्ना दुरावते. पैशासाठी त्याच्यावर हल्ला होतो आणि गुरख्याचा खूनच होतो. काळजी तर अखंड पोखरीतच असते. हे सगळं असह्य झाल्यावर 'खायला कोंडा अन् निजायला धोंडा' देणारी गरिबीच बरी, अशा क्रांतिकारक निष्कर्षाप्रत आलेला चंदर संपत्ती परत करून शिक्षा भोगण्यासाठी निघून जातो. लेखक–दिग्दर्शकांनी ही साधी कथा सरळसोट धाटणीनंच पडद्यावर मांडली आहे. पण त्या प्रवासात प्रत्येक कॅरॅक्टर त्यांनी बऱ्याच प्रमाणात जिवंत, वास्तव केली आहे. इतके सलग आणि बरेचसे सुसंगत पण तरीही मानवी व्यक्तिचित्रण चित्रपटात क्वचितच आढळतं. वास्तवाचं भान त्यांनी ठेवल्यामुळंच, विनाकष्ट पैसे घेताना चलबिचल होणारी पण अखेरीस घेण्याच्या बाजूनं कौल देणारी गुरखा, चंदर आणि चंदरची आई ही पात्रं तुमच्याआमच्यातलीच वाटतात, देवलोकातून थेट अवतरल्यासारखी वाटत नाहीत. त्यांची आणि त्यांच्या जगातली गरिबीसुद्धा genuine वाटते, फिल्मी वाटत नाही. त्या गरिबीत आणि नंतरच्या छुप्या श्रीमंतीतही होणारी त्यांची विलक्षण कुतरओढसुद्धा खरी वाटते, शक्य कोटीतली वाटते. लेखक–दिग्दर्शकांचं आपल्या विषयाशी आणि 'थीम'शी असलेलं इमान अशाच ठिकाणी दिसतं असं वाटतं. दिग्दर्शक बाळासाहेब एस्. फत्तेलाल यांचं हे पहिलंच चित्रं, पण पहिलेपणाच्या चुकाढाका टोचू नयेत इतक्या सफाईनं त्यांनी ही चोरी पेलली–हाताळली आहे. चंदर चोरी करतो तो प्रसंग आणि त्याच्या आईचा मृत्यू, मर्तिकाची तयारी हे दोन 'पीसेस्' त्यांची दिग्दर्शनातली प्रतिभा जाणवून देतात. अर्थात दिग्दर्शनातल्या नागव्या धंदेवाईक धडपडीसुद्धा काढून दाखवता येतील. आईच्या मृत्यूनंतरची रत्नाची खास फिल्मी किंचाळी आणि नंतरची रडारड किंवा चंदरनं रत्नाला सगळी कर्मकथा सांगताना सगळ्या सिनेमाचा बुद्धिमंद प्रेक्षकांसाठी काढलेला सारांश ही दोन उदाहरणं विरुद्ध बाजूची. 'हातात पैसे आल्यावर चांगले कपडे चढवून चंदर नायकिणींची खानेसुमारी करीत हिंडण्याची एकमेवच चैन करू शकतो' असं त्यांनी का गृहीत धरावं?' याचं उत्तर एवढंच की, राम कदम आणि डान्सिंग पार्टीला मोकळं रान देण्याचा हाच एकमात्र मार्ग होता. यामुळे चित्रपटाच्या मध्यंतरानंतरचा अर्धा भाग हा महाराष्ट्रातील तमाशा बाऱ्या व नायकिणींच्या कोठ्या यांच्यावरल्या डॉक्युमेंटरीसारखा झाला आहे. मात्र हे असे तुकडे वगळता दिग्दर्शकांची कामगिरी समाधानकारक आहे, अनेक बारीकसारीक प्रसंगांतूनही दिग्दर्शनाची झलक डोकावते, सर्वांचाच उल्लेख करणं या मर्यादेत शक्य नाही. याच्या जोडीला तितक्याच तोलामोलाचे कलाकार लाभल्यानं चित्राची रंगत वाढली आहे. 'इमानदार' गुरख्याची यशवंत दत्तांची भूमिका त्यांच्या पुढील यशाची पायरी ठरावी. भूमिका छोटी असूनही संस्मरणीय करता येते याचा तो एक वस्तुपाठच. निळूभाऊंनी तळघरातल्या संपत्तीचं दर्शन घडल्यानंतर दिलेलं एक्स्प्रेशन आणि यशवंत दत्तचं 'सोना और चाँदी' सहजी विसरता येण्याजोगी नाहीत. उषा चव्हाण यांना रत्नाच्या भूमिकेत एकही नाचगाणं नाही हेच विशेष.

अस्सल वाटणारे संवाद आणि मराठी चित्रपटात क्वचितच आढणारी छायाचित्रणं–ध्वनिमुद्रणादि तांत्रिक बाबींची निर्दोषता या 'चोरीच्या मामल्या'च्या आणखी दोन जमेच्या बाजू. या चित्रपटात एखादं तत्त्वज्ञान, निदान तत्त्व तरी, मांडायचा conscious effort दिसत नाही, एरवी अखंड गरीब राहण्याचा जो संदेश लपूनछपून दिला गेला आहे, त्याची मी अधिक दखल घेतली असती. तूर्त एवढंच म्हणतो की, 'लबाडीचा पैसा पचत नाही, घाम गाळल्याशिवाय दामाची अपेक्षा करू नये' हा तुमचा संदेश एक वेळ मान्य, पण त्यासाठी गरिबीचे गोडवे गायची गरज नाही. गरिबीसुद्धा एक नशा असते आणि या देशातल्या गरिबांना ती अनंतकाळापासून चढून राहिली आहे. ती उतरवायचा प्रयत्न करायचा सोडून, त्यांच्या अल्पसंतुष्ट जिवांना गुदगुल्या करण्यासाठी गरिबीचं glorification – उदात्तीकरण – करण्याचा यातला अस्थानी खटाटोप बरा नव्हे.

□

# रजनीशांचा समाजवादविरोध

पृष्ठ ३ वरून

त्यावरून त्यांना समाजवादाची कळकळ आहे असे मानणे फार अवघड आहे. दारिद्र्य न आवडणे व श्रीमंतीत रमणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. बर्नार्ड शॉ दारिद्र्याची निर्भर्त्सना करतो असे ते म्हणतात. परंतु गरीबांविषयी असलेला शॉचा कळवळा त्यांना माहीत नसेल? त्या आत्यंतिक कळवळ्यातूनच 'कोण म्हणतो मला गरीब आवडतात? मला तर ते जगातून नाहीसे व्हावेत असे वाटते' असे उद्गार शॉने काढले ना?

समाजवाद म्हणजे लोकशाहीची गळचेपी असे त्यांना वाटते. आज ना उद्या विकसित भांडवलशाहीतून समाजवाद येणार हे माहीत असूनही लोकशाही जी भांडवलशाहीतच जगू शकेल असे त्यांना वाटते – त्या लोकशाहीच्या भवितव्याची एवढी चिंता कशाला? भांडवलशाहीबरोबरच तिला आधार देणारी मूल्येही नष्ट व्हावीत हे साहजिकच आहे. सरंजामशाहीतून लोकशाहीत येताना मूल्ये बदललीच ना? श्रीमंती व वैभव यांचे गोडवे त्यांनी जरूर गावेत पण संपत्ती आणि त्यामुळेच संधी यापासून वंचित राहिलेल्या समाजाच्या एका मोठ्या घटकाची वंचना करू नये. प्रशस्त बंगले, आरामशीर इंपोर्टेड मोटारी आणि संपत्तीने सुस्तावलेल्या शरीरांच्या घोळक्यात वावरताना झोपडपट्टीतल्या घाणेरड्या लोकांचे आयुष्यच डोळ्यांपुढे नको वाटले तर ते चूक नाही. पण डोळ्यांवर कातडे ओढून – झोपडीतले मूल टाहो फोडीत असताना आपण समृद्धीतून मोक्षाकडे म्हणत रहायचे व गरीबांना श्रीमंत व्हा, असा उपदेश करायचा यात काहीच चूक नाही? श्रीमंतीचा उद्घोष करता करता गरीब व गरिबीची थट्टा आपण करतो आहोत हे त्यांना कुणीतरी सांगायला हवे. चपखल वाटणारे दृष्टान्त, रसाळवाणी जोडीला, तत्त्वज्ञानाचा अभ्यास, मानसशास्त्राचे ज्ञान या सर्वांचे मोहक जाळे 'होय रे' वर्गाची जी वकिली या बाबांनी चालविली आहे तिच्याबद्दल सांगण्याची वेळ आली आहे की, बाबारे तुला प्रवचनच करायचे असेल तर रामायण–महाभारत आहे. राजकारणचं सांगायचे असेल तर फक्त सत्य आहे तेच सांग. समाजातल्या एका छोट्या वर्गाच्या पैशावर ऐषआरामी करायची आहे म्हणून त्याच्या प्रेमाखातर कोट्यावधी अभागी जीवांच्या गळ्यात आणखी कसले तत्वज्ञानाचे ओझे बांधू नका.

□

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

## १९।६।७६ ते २५।६।७६

**मेष : नव्या पर्वाची सुरुवात**

शनि–मंगळ सुखस्थान दूषीत करीत आहेत. काही केले तरी सुख व समाधान लाभत नाही. मन सतत व्यग्र असते. पण याचा अर्थ सध्या तुमची ग्रहदशा प्रतिकूल आहे असे मात्र नाही. एकटा तिसरा रवी तुमचे सारे मनोरथ पूर्ण करायला समर्थ आहे. जे जे ठरवाल त्याचा त्याला अनुकूल प्रतिसाद मिळेल. नोकरीत तुमच्यावर जर अन्याय झाला असेल तर त्यासंबंधी तुम्ही तुमची बाजू वरिष्ठांकडे मांडू शकता. यश आल्याशिवाय राहणार नाही. अनेक दिवस रेंगाळत राहिलेले प्रश्न निकाली निघतील. स्थावराच्या वादात सरशी होईल. घर–जमीन–जागा असा कोणताही प्रश्न सुटू शकेल. शुभ दिनांक १९–२२–२३

**महिलांना :** कौटुंबिक जबाबदारी अंगावर पडेल. पण ती पेलण्याचे सामर्थ्यही लाभेल. पैशाचा व्यवहार हाती येईल.

**विद्यार्थ्यांना :** शेती व तांत्रिक ज्ञानाचा अभ्यास करा. तशी संधी मिळेल. पैसा मिळेल.

**वृषभ : परिस्थिती सुधारेल**

तुमचे मन कधीच समाधानी नसते हा तुमचा स्वभावविशेषच आहे. त्यामुळे चांगल्या ग्रहांचा तुम्हाला फायदा मिळूनही तुम्ही योजनाबद्ध व्यवहार करीत नाही. हा आठवडा तुम्हाला यशाचे ध्वज फडकावयाला लावणार आहे. हाती घेतलेले कोणतेही काम पुरे होईल. उद्योगधंद्यात नवे धाडस करायला बरीच अनुकूलता आहे. चालू उद्योगमंदीने गोठला असेल तर त्याला उब मिळेल. नवीन असे कोणतेही धंदेविषयक काम असेल तर ते फलदायी होईल. व्यापार उदीम अडचणीतून बाहेर पडेल. नोकरीची परिस्थिती सुधारू लागेल. वरिष्ठांबरोबर आपुलकीचे संबंध जुळून येतील. बढती-बदलीचा प्रश्न सुटू शकेल. तब्येतीची काळजी घ्या. शुभ दिनांक २१–२३

**महिलांना :** नोकरीत शुभसूचक घटना घडतील. आर्थिक स्थिती सुधारेल.

**विद्यार्थ्यांना :** अभिनय गुणाचे दर्शन घडवू शकाल. अशा प्रकारे प्रसिद्धी मिळू शकेल.

**मिथुन : समस्या उद्‌भवेल**

तुमच्या आर्थिक स्थितीतील तणाव आता कमी कमी होऊ लागणार आहे. लॉटरीत अवश्य भाग घ्यावा. रेस खेळण्याची सवय असेल तर त्यांना यावेळी बरेच मोठे धन प्राप्त होईल. तुमच्यापैकी जे कुणी लेखक वा पत्रकार असतील ते बहुमानाचे मानकरी ठरतील. त्यांच्या ग्रंथांना प्रसिद्धीची अपूर्व लोकप्रियता लाभेल. पत्रकारांना उच्चपदस्थांच्या दौऱ्यांत सुखपभोग मिळतील. मात्र व्यसनाच्या आहारी जाणे टाळावे. नोकरी करणारे भाग्यवान ठरतील. सेवानिवृत्त लोकांना सरकारी मदत मिळेल. अनेकांची सहानुभूति मिळू शकेल. असे असले तरी एखादी समस्या डोकेदुखीचा विषय ठरू शकेल. शुभ दिनांक २३–२४

**महिलांना :** नोकरीत बढती मिळेल. चालू धंदा प्रगतीची झेप घेईल. एखादा लघुउद्योग सुरू करू शकाल.

**विद्यार्थ्यांना :** बौद्धिक प्रगतीत मोठे यश मिळवाल. लेखनाची सुरुवात करू शकाल. यश मिळेल.

**कर्क : सावध रहा**

शनी-मंगळाच्या प्रतापशाली सामर्थ्याने तुम्ही सध्या यशाच्या शिखरावर आरूढ झाला आहात. तुमचे हे यश कुणीच हिरावून घेऊ शकणार नाही. तुमच्या आशाआकांक्षा बहुत आहेत. महत्त्वाकांक्षा झेप घेत आहेत. असे असले तरी, तुम्ही साडेसातीच्या राशीत आहात हे विसरून चालणार नाही. रवी बारावा झाला आहे. तो बुधाच्या बौद्धिक राशीत आहे. त्यामुळे कोणत्या वेळी कोणती गोष्ट अनपेक्षित घडेल हे शेवटी दैवाच्याच हाती रहाणार आहे. सामान्यतः पैसा खर्च करताना जरा जपूनच राहावे. फसवणूक होणार नाही याकडे लक्ष ठेवा. लॉटरीत पैसे गेले तरी असमाधान मानू नका. पण रेसमध्ये भाग घेताना मात्र फार काळजी घ्यावी. मोहाला बळी पडून संकट ओढवून घेऊ नये. शुभ दिनांक २३, २५

**महिलांना :** घरगुती खर्चाला कात्री लावावी लागणार नाही. पण फॅशन्सचा मोह टाळणे मात्र आवश्यक आहे.

**विद्यार्थ्यांना :** 'पाण्याबरोबर खेळण्याचे' धाडस काळजीपूर्वक करा.

**सिंह : अनपेक्षित माघार**

अकरावा रवी हीच काय ती तुमच्या बाबतींत जमेची बाजू आहे. शनी-मंगळाची 'साडेसाती' अजून तरी काही काळ तुम्हाला पाऊल पुढे घालण्याची 'आज्ञा' देणार नाही. आशाआकांक्षा प्रफुल्लीत झाल्या तरी सारे काही मनासारखे घडेल अशा भ्रमात तुम्ही राहाणार नाहीतच. तुमची सावध-वृत्ती याचवेळी खऱ्या अर्थाने तुम्हाला हात देईल. राजकीय क्षेत्रांत तुमच्या बाबतीत अनपेक्षित माघारीची पाळी आणणारच नाही असे नव्हे तरी पण गुरू हा तुम्हाला हात देणार आहे. नोकरीत आपल्या मागण्या मांडताना वरिष्ठांचा कल लक्षात घ्या. शुभ दिनांक २१, २४

**महिलांना :** सार्वजनिक कामात फलाची अगर मानापमानाची अपेक्षा ठेवली नाही तर आठवडा तसा प्रतिकूल नाही.

**विद्यार्थ्यांना :** खर्चावर नियंत्रण ठेवा. उधळपट्टी चिंता निर्माण करील.

**कन्या : नोकरीत जैसे थे**

सेवावृत्ती जर सरळपणे पार पडली तर तुम्ही लोक खूष असता. सध्या तरी तुमच्यावर ग्रह खूष आहेत. दुय्यम व्यवसायाला पुन्हा गती प्राप्त होईल. असा अनुभवही येऊ लागेल. लेखनसाहित्य प्रसिद्धीच्या प्रकाशात चमकून निघेल. उत्तम कल्पना मनात घोळत राहातील. पण त्या प्रत्यक्ष कागदावर मात्र उतरणे जरा कठीणच. धावपळ, धांदल, गर्दी, श्रम यांत काही कमी होण्याची शक्यता नाही. रवी दहावा मिथून राशीत काही आर्थिक प्राप्ती करून देईल. परिस्थितीचा तणाव बऱ्याच प्रमाणात कमी होईल. नोकरीत वरिष्ठांवर चांगलेच वजन राहील. शुभ दिनांक १९, २१

**महिलांना :** तब्येतीची काळजी दूर होईल. गेले काही दिवस 'चांगले' नसले तरी आता 'चांगले' येतील.

**विद्यार्थ्यांना :** यावेळी तुमची कोणतीही चाचणी असो तुम्ही मोठे यश मिळवणार आहात.

## तूळ : भाग्यवर्धक

भाग्यस्थानी रवी आला आहे. तो तुम्हाला काही नवे देणार आहे. तुमच्या जीवनात सौंदर्य व आनंद निर्माण करणार आहे. तुमच्यापैकी जर कुणी कलावंत असेल, तर त्याला चांगले दिवस आहेत. भरपूर 'ऑफर्स' येतील. त्या पुरवताना तुमचा अभिमान जागा होईल. रेडिओ, चित्रपट, नाट्यसृष्टी याद्वारे तुमच्या आशाआकांक्षा सफल होऊ शकतील. तुमच्यापैकी कुणी परदेशी जाणार असेल तर त्याला खूपच अनुकूलता आहे. नोकरी–व्यवसाय प्रगतीचा टप्पा गाठील. प्रगतीत तुमच्या महत्त्वाकांक्षा सफल होऊन जातील. स्वतंत्र धंद्यात कापड, स्टेशनरी व सोने-चांदी हा धंदा तेजीत चालेल. शुभ दिनांक २२, २३, २४.

**महिलांना :** लघुउद्योग क्षेत्रात पाऊल टाका. पैशाची व इतर सर्व मदत मिळू शकेल.

**विद्यार्थ्यांना :** नाट्यसृष्टीत प्रवेश मिळेल. प्रसिद्धी मिळू शकेल.

## वृश्चिक : अनपेक्षित लाभ

बुधाच्या राशीत रवी ही स्थिती जरी तब्येतीच्या दृष्टीने तशी फार चांगली नसली तरी आर्थिकदृष्ट्या बरीच अनुकूलता दर्शवणारी आहे. रेस-लॉटरीसाठी प्रयत्न करा. कदाचित यश मिळून जाईल. जुने येणे वसूल होईल. आर्थिक बाजू बरीच सुधारेल. तरीपण हर्शल व राहू केव्हा एकदम एखादा नवा खर्च निर्माण करतील हे सांगणे कठीण. नोकरीत बढतीची शक्यता नाकारू नका. बेकारांना उद्योगातच प्राधान्य मिळेल. त्यांनी तेच स्वीकारण्याने भावी काळात त्याचा उत्तम लाभ मिळेल. शेतीचा व्यवसाय आशादायक ठरेल. शुभ दिनांक २२, २३.

**महिलांना :** भांडणाची प्रवृत्ती टाळणे आवश्यक आहे. स्वतःचे मन वाचनात रमवा.

**विद्यार्थ्यांना :** तांत्रिक शिक्षणाची इच्छा पुरी होईल. प्रवास घडेल.

## धनु : शनि-मंगळाचा उठाव

धनु राशीच्या व्यक्तीने अष्टमात शनि-मंगळ असेपर्यंत अत्यंत विचारपूर्वक आपले वागणे व पथ्य ठेवले पाहिजे. राशिस्वामी गुरु जरी तुम्हाला खाली येऊ देणार नाही तरीपण तब्येतीच्या बाबतीत सारे ठीक आहे असे समजून चालू नका. अशक्तपणा, रक्तदाब, सर्दी असे आजार ज्यांना वरच्यावर होतात त्यांनी जागरूक राहिले पाहिजे. रवी सातवा आहे. तो घरगुती अडचणी मधून मधून निर्माण करील. पण त्या निवारणही होतील. खर्चात बरीच वाढ होईल. अनपेक्षित खर्च अडचण निर्माण करील. कोणतेच काम अर्धवट राहील असे नाही. पण ते ठरलेल्या वेळी पार पडणे कठीणच. नोकरीत अडथळे नाहीत. मात्र एखादी अनपेक्षित समस्या निर्माण होऊ शकेल. शुभ दिनांक २२, २३, २४.

**महिलांना :** नोकरी व व्रतवैकल्ये यात बरीच धावपळ होईल. पैसा मात्र कमी पडणार नाही.

**विद्यार्थ्यांना :** शिक्षणात अनपेक्षित बदल होण्याचा संभव आहे. प्रवास होईल.

## मकर : धावपळ–धांदल

या आठवड्याची सुरुवात एखाद्या महत्त्वाच्या घटनेने होऊन ती आगामी प्रगतीला उपकारक ठरेल. नोकरीच्या बाबतीत बढती मिळून बदली होण्याची शक्यता आहे. स्वतंत्र उद्योगात लक्ष घाला. चालू धंद्याला गती मिळू शकेल. भांडवल-पुरवठा होऊ शकेल. तुम्ही त्यासाठी जर बँकेत अगर इतरत्र कर्ज मिळवण्याच्या प्रयत्नात असाल, तर या आठवड्यात तुमचे ते काम मार्गी लागेल. सामान्यतः खते, शेतीची अवजारे, औषधे, इंजिनिअरिंग उद्योग, स्टेशनरी व जमिनीची खरेदी-विक्री असे कोणतेही उद्योग भरपूर नफा देऊन जातील. बढती-बदलीची अपेक्षा पुरी होईल. आर्थिक बाजू एकदम भक्कम नसली, तरी गरज भागवण्याएवढा पैसा मिळू शकेल. शुभ दिनांक २२, २३.

**महिलांना :** तब्येतीची काळजी तुम्ही आता मुळीच करू नका. मन आनंदी राहील. उरक चांगला राहील.

**विद्यार्थ्यांना :** शिक्षणासाठी हव्या असलेल्या खर्चाची व्यवस्था सहज होऊ शकेल.

## कुंभ : नेत्रदीपक यश

परिस्थितीचे आकलन करून कोणत्याही क्षेत्रात धूर्तपणे पाऊल टाकणे हा तुमच्या स्वभावाचा एक खास असा विशेष आहे. याचाच प्रत्यय या आठवड्यात तुम्हाला येणार आहे. रवी पाचवा ही घटना तुमच्याबाबतीत आगामी घटनांचा अनुकूल नेत्र घेणारी ठरेल. सध्या तरी तुम्ही साध्या कारणामुळेदेखील थोडे फार निराश होता. पण ही स्थिती आता इतिहासजमा झाल्याचा प्रत्यय तुम्हाला येऊ लागेल. ज्यांच्यावर विश्वास ठेवून तुम्ही प्रतिष्ठेच्या दृष्टीने महत्त्वाचे निर्णय घेतले त्याचे चीज आता होईल. अनेक क्षेत्रांत तुमचा हेवा करावा असे यश पदरात पडणार आहे. नोकरी-धंद्याची परिस्थिती समाधानकारक राहील. अपेक्षापूर्तीचा आनंद पदरात पडेल. शुभ दिनांक २०–२१.

**महिलांना :** उद्योग व नोकरी या दोन्ही क्षेत्रांत यशाचे नवे टप्पे गाठू शकाल इतकी छान ग्रहदशा सध्या तुम्हाला आहे.

**विद्यार्थ्यांना :** संशोधनाच्या क्षेत्रात पाऊल टाका. अडचणी नाहीत. पैशाची काळजी नको.

## मीन : काळजी संपली

चौथा रवी मनःस्थिती जरी खळखळती ठेवीत असला, तरी त्यामुळे तुम्ही बिचकून जाण्याचे मुळीच कारण नाही. दुसरा गुरू, पाचवे शनि-मंगळ अशा महाप्रतापशाली ग्रहांची तुमच्यावर मर्जी असताना काळजी कशाला करता? कणखरपणे ठरवलेल्या योजना पार पाडण्याचे सामर्थ्य प्राप्त होणार आहे. मित्र, नातेवाईक व उच्चपदस्थ व्यक्तींचे सहकार्य तुम्हाला उपलब्ध होईल. तुम्ही लेखक असाल तर, त्यात परिणामक उतरू शकेल. आध्यात्मिक क्षेत्रात तुम्ही पूर्णपणे रमून जाऊ शकला नाही तरी, त्याचा आनंद मिळू शकेल. नोकरीत अडचणीच्या जागी झालेली बदली रद्द होऊन स्थैर्य येईल. धंदा मात्र जरा सावधगिरीने करा. शुभ दिनांक २०–२२–२३.

**महिलांना :** धार्मिक कार्य यथासांग पार पडेल. पाहुण्यांची गर्दी कौटुंबिक स्वास्थ्यात अडचणी आणू शकेल. पण ती तात्पुरतीच.

**विद्यार्थ्यांना :** व्यावसायिक शिक्षण यावेळी जर तुम्ही घेत असाल तर, यश मिळवून देईल. फार छान काळ आहे. ☐

# नमन !

- □ धर्म, अर्थ, काम यांना नमस्कार असो.
- □ कामशास्त्राला नमस्कार असो.
- □ कामशास्त्रावर ग्रंथ रचणाऱ्या
  पूर्वाचार्यांना नमस्कार असो.
- □ ( विशेषतः ) वात्स्यायनाला.
- □ या कथेचा विषय वात्स्यायन आहे म्हणून.

नमन पूर्ण होते
आणि मोकाशींचा वात्स्यायन
मल्लनाग वात्स्यायन
पत्नी माहेरी गेल्यामुळे
शोकाकूल होऊन
आपल्या घराच्या बागेत—बकुळीच्या छायेत—उभा आहे.
समोर फांदीला बांधलेला झोपाळा....

## ३ जुलै माणूस अंक